Complimentary Copy

HONORARY SECRETARY,
T. M. S. S. M. Library Committee.

60

MADRAS GOVERNMENT ORIENTAL SERIES

... Library,
Triplicane P.O., Madras

PUBLISHED UNDER THE AUTHORITY
OF THE
GOVERNMENT OF MADRAS

GENERAL EDITOR :
T. CHANDRASEKHARAN, M. A., L. T.,
Curator, Government Oriental Manuscripts Library,
Madras.

No. LVI

श्लोकबद्धरामायण.

Govt. Oriental Mss. Library,
Triplicane P.O., Madras.
60

TANJORE SARASWATI MAHAL SERIES NO. 30.

Govt. Oriental Mss. Library,
Triplicane P.O., Madras.

माधवस्वामीकृत

श्लोकबद्धरामायण

संपादक.

पु. दि. जोशी

SLOKA-BADDHA RAMAYANA

OF

MADHAVA SWAMI

EDITED BY
P. D. JOSHI

PUBLISHED BY
SRI. S. GOPALAN, B. A., B. L.,
Hony, Secretary for the Administrative Committee
T. M. S. S. Mahal Library, Tanjore.
1951

Price 1—8—0

GOVERNMENT ORIENTAL MSS. LIBRARY
17 JUL 1951
TRIPLICANE P.O., MADRAS

GENERAL INTRODUCTION

TO THE

Madras Government Oriental Series.

The Government of Madras took up for consideration the question of publication of the various manuscripts in different languages on subjects like Philosophy, Medicine, Science, etc., early in May 1948. Impo[illegible] manuscript libraries in the Madras Presidency were requested to send a list of unpublished manuscripts with them for favour of being considered by the Government for publication. The Honorary Secretary of the Tanjore Maharaja Serfoji's Sarasvathi Mahal Library, Tanjore, alone complied with this request. This list as well as a similar list of unpublished manuscripts in the Government Oriental Manuscripts Library, were carefully examined and a tentative selection of manuscripts suitable for publication was made. The Government in their Memorandum No. 34913/48-10 Education, dated 4-4-1949, constituted an Expert Committee with the Curator of the Government Oriental Manuscripts Library, Madras, as the Secretary, for the final selection of manuscripts suitable for printing and for estimating the cost of publication.

The following are members of the Committee:

1. Sri T. M. Narayanaswami Pillai, M.A., B.L.,
2. " R. P. Sethu Pillai, B.A., B.L.,
3. " C. M. Ramachandra Chettiar, B.A., B.L.,
4. Sri R. Krishnamoorthy, (Kalki)
5. Dr. N. Venkataramanayya, M.A., PH.D.,
6. Sri M. Ramanuja Rao Naidu, M.A., L.T.,
7. " V. Prabhakara Sastri,
8. " N. Venkata Rao, M.A.,
9. " H. Sesha Ayyangar,
10. " Masthi Venkatesa Ayyangar, M.A.,
11. " M. Mariappa Bhat, M.A., L.T.,
12. Dr. C. Achyuta Menon, B.A., PH.D.,
13. " C. Kunhan Raja, M.A., D. PHIL.,
14. " A. Sankaran, M.A., PH.D., L.T.,
15. Sri P. S. Rama Sastri,
16. " S. K. Ramanatha Sastri,
17. Dr. M. Abdul Haq, M.A., D. Phil. (Oxon),
18. Afzul-ul-Ulma Hakim Khader Ahamed,
19. Sri P. D. Joshi,
20. " S. Gopalan, B.A., B.L.,
21. " T. Chandrasekharan, M.A., L.T.

The members of the Committee formed into Sub-Committees for the various languages, Sanskrit, Tamil, Telugu, Kannada, Malayalam, Marathi and Islamic Languages. They met during the month of May, 1949, at Madras and Tanjore to examine the manuscripts and make a selection. The recommendations of the Committee were accepted by the Government in G.O. No. Mis. 2745 Education, dated

31-8-1949 and they decided to call these publications as the **"Madras Government Oriental Series,"** and appointed the Curator, Government Oriental Manuscripts Library, Madras, as the General Editor of the publications.

The following manuscripts have been taken up for publication during the current year:

"A" From the Government Oriental Manuscripts Library, Madras.

TAMIL

1. Kappal Sattiram
2. Anubhava Vaidya Murai
3. Attanakolahalam
4. Upadesa Kandam
5. Colan Purva Pattayam
6. Konga Desa Rajakkal
7. Sivajnana Dipam
8. Sadasiva Rupam, with commentary.

TELUGU.

1. Sangitaratnakaramu
2. Aushadha Yogamulu
3. Vaidya Nighantuvu
4. Dhanurvidya Vilasamu
5. Yoga Darsana Vishayamu
6. Khadga Lakshana Siromani.

SANSKRIT.

1. Vishanarayaniyam
2. Bhargava Nadika
3. Hariharacaturangam
4. Brahmasutravrtti—Mitaksara
5. Nyayasiddhanta Thattvamrtam.

MALAYALAM.

1. Garbha Cikitsa
2. a. Vastulakshanam
   b. Silpasastram
   c. Silpavishayam
3. Mahasaram
4. Kanakkusaram
5. Kriyakramam

KANNADA.

1. Lokopakara
2. Rattamata
3. Asvasastram
4. a. Aushadhagalu
   b. Vaidyavishaya
5. Sangitaratnakara
6. Supasastra.

ISLAMIC LANGUAGES.

1. Jamil-Al-Ashya
2. Tibb-E-Faridi
3. Tahqiq-Al-Buhran
4. Safinat-Al-Najat.

"B" From the Tanjore Maharaja Serfoji's Sarasvathi Mahal Library, Tanjore.

TAMIL.

1. Sarabhendravaidya Murai (Diabetes)
2. Do. (E N. & T.)
3. Konkanarsarakku Vaippu
4. Tiruccirrambalakovaiyar with Padavurai
5. Sarabhendra Vaidya Murai— (Anæmia & Jaundice)
6. Talasamudram
7. Bharatam
8. a. Pandikeli Vilasa Natakam
   b Pururava Cakravarti Natakam
   c. Madana Sundara Vilasa Natakam
9. Percy Macqueen's Collection in the Madras University Library on Folklore
10. Ramaiyan Ammanai
11. Sarabhendra Vaidya Murai — (Asthma, Cough and other lung diseases)

TELUGU.

1. Kamandakanitisaramu
2. Taladasapranapradipika
3. Raghunatha Nayakabhyudayamu
4. Rajagopala Vilasamu
5. Ramayanamu by Katta Varadaraju

MAHRATHI.

1. Natyasastrasangraha
2. a. Folk Songs

Note:—In list "B" above, No. 5 and 11 in Tamil, and No. 3 in Sanskrit were substituted for three works of the original list, which were found later. to be unsuitable for publication. The substitution awaits approval by the Government.

b. Dora Dharun Veni Paddhati
c. Asvasa Catula Dumani
3. Pratapasimhendra Vijaya Prabandha
4. a. Sarabhendra Tirthavali
b. Lavani
5. Devendra Kuravanji
6. Bhakta Vilasa
7. Sloka Baddha Ramayana

SANSKRIT.

1. Asvasastra with Tricolour Illustrations
2. Rajamrganka
3. Ananda Kandam
4. Ayurvedamahodadhi
5. Gita Govinda Abhinaya
6. a. Colacampu
b. Sahendra Vilasam
7. Dharmakutam-Sundara Kanda
8. Jatakasara
9. Vishnutattvanirnaya Vyakhya
10. Sangita Darpanam
11. Bijapallavam

It is hoped that the publication of most of the important manuscripts will be completed within the next four years.

Some of the manuscripts taken up for publication are represented by single copies in the Library and consequently the mistakes that are found in them could not be corrected by comparing them

with other copies The editors have however, tried their best to suggest correct readings. The wrong readings are given in round brackets and correct readings have been suggested in square brackets. When different readings are found, they have been given in the foot-notes except in the case of a few books, in which the correct readings have been given in the foot-note or incorporated in the text itself.

The Government of Madras have to be thanked for financing the entire scheme of publication although there is a drive for economy in all the departments. My thanks are due to the members of the Expert Committee who spared no pains in Selecting the manuscripts for publication. I have also to thank the various editors, who are experts in their own field, for readily consenting to edit the manuscripts and see them through the press. The various presses that have co-operated in printing the manuscripts in the best manner possible also deserve my thanks for the patience exhibited by them in carrying out the corrections made in the proofs.

MADRAS, 1951.

T. CHANDRASEKHARAN,
General Editor.

GOVERNMENT ORIENTAL MSS. LIBRARY
17 JUL 1951
TRIPLICANE P.O. MADRAS

GOVERNMENT ORIENTAL MSS. LIBRARY
17 JUL 1951
TRIPLICANE P.O., MADRAS

PREFACE

The present publication SLOKABADDHA RAMAYANA is a summarised version in Marathi verse of Srimad Ramayana of Valmiki, by Sri Madhava swami, who flourished in the court of King Shahji (1684 to 1711) of Tanjore. Madhava Swami who was the grandson of Ekanath, the famous Maratha saint, is the author of two great Marathi works in verse, namely, complete versions of the MAHABHARATA, and SRIMAD RAMAYANA, besides smaller works.

King Shahaji under whose reverential care the Swamiji lived, was highly accomplished in arts and sciences and was most liberal in his patronage of learning. He earned the name of 'Bhoja of Tanjore' which he richly deserved. He was deeply devoted to Lord Siva whom he adored in more than a thousand songs in Telugu, Marathi, Samskrit and Hindi. He was indeed a saintly King, and his biography has been written by Sridhara Venkatesa, another saint who is said to have made the Holy Ganges bubble forth in his well.

It is no wonder that saintly and talented men gathered round such a King. In fact, he established whole villages of learned men for whose up-keep he made munificent endowments. A number of Mutts of the Ramadas and Dattatreya line endowed by the King,

exist even now in Tanjore. Madhava Swami who was well taken care of by the King, lived a care-free life at Tiruvazhundur near Mayavaram on the banks of the Cuavery, and devoted his time and energy to spiritual and literary pursuits. His memory is even now cherished in the mutt where he lived.

The present work which gives the story of RAMAYANA in simple verse in a short compass is fit to be prescribed as a text book in schools and colleges. The older Marathi of the glorious days of Shivaji and Venkaji is said to be preserved in this work and is likely to bring before the reader the atmosphere of those heroic days.

Mr. P. D. Joshi, the Editor of the work, has spared no pains to present to us the correct text of the work and our thanks are due to him for his valuable services.

We are thankful to the Government of Madras for their liberal grants which have enabled us to publish this and other valuable manuscripts of this Library.

Saraswathi Mahal Library, Tanjore.
1951.

S. GOPALAN,
Honorary Secretary

EDITOR'S INTRODUCTION.

Samartha Ramadas, the great poet-saint of Maharashtra in the 17th century, established a number of Maths throughout India. He was the father of religious, social and political awakening in the country, and especially so in Maharashtra. He also took care to see that this awakening was not frittered away into a morbid emotional movement, but he turned it into a purposeful channel to active political freedom. These Maths were the centres of multipurpose activities and were in charge of his trusted disciples ; a long list of such disciples has been narrated in "Samartha Pratap" by Girdhar. Madhavaswami, the author of this work, "Sloka-baddha Ramayana," was the disciple of Raghavadas, one of Samartha's disciples in the South. Madhavaswami has also rendered Ramayana in Ovi meter, and he is the author of Bharata in the same meter. He has also translated several Akhyanas or stories from the great Epics of India, the Ramayana and the Mahabharata. Ovi Ramayana was written in the Saka 1615 and Ovi Bharata in Saka 1625 (1703 A.D.) which shows that Madhavaswami lived during the reign of Shahaji (1684—1710 A.D.) The Sloka-baddha Ramayana was written by him in Tiruvezhundur, on the banks of the Kaveri, near Mayavaram.

As Madhavaswami is related to Samartha Ramadas, his relationship can also be traced to another poet-saint of Maharashtra, Ekanath, who edited the great Marathi work on Bhagawadgita, the Dnyaneshwari, and who is also the author of Ekanathi Bhagwat, an able treatise on the 11th Skanda of Bhagwat in Ovi meter. Madhavaswami was the son of Umabai, Ekanath's daughter. Thus the author was closely related to the two great Marathi saints, poets and reformers. It might be mentioned in passing that another grandson of Ekanath, Mukteshwar, was also a renowned poet of Maharashtra, and his Bharata rendered in Ovi meter ranks high among Marathi poetical works.

Marathi readers will easily find that Sloka-baddha Ramayana follows what may be termed "Ramadasi Style." Although it is said to have been composed in Slokas, it actually contains various meters generally termed as Slokas. "Kodanda-dhari" Rama and his devoted Bhakta Hanuman were placed by Ramadas as the ideals before the down-trodden people of his times, who had lost their all, including self-respect. Several disciples of Ramadas have taken pride in writing the whole of Ramayana in a concise form or at least a few incidents from that great soul-stirring epic. Madhavaswami is not an exception.

While no extra-ordinary high literary excellence is claimed for this work, it may be stated here that Madhavaswami's Ramayana and Mahabharata are abridged versions of those complete epics in Marathi, though

Oriental Mss. Library, Triplicane P.O., Madras

not the earliest, at least among the earliest. Even Ramadas has not rendered the whole of Ramayana. Our author also lays stress, in traditional Ramadasi style, on Yuddha-kanda, as this Kanda alone contains 259 Slokas out of the total of 726. Probably the first signs of literary riddles and other ornamental and twisting construction, which was characteristic of the later Marathi poetry, are already beginning to show themselves in this work. These qualities in literature are acquired when poets and authors enjoy profound patronage, rendering them free from cares and wants that are generally associated with scholarly life. Perhaps the easy life in the fertile delta of the Kaveri and freedom from the anxieties of war and invasion gave the author a background similar to that assured by the establishment of Maratha kingdom in Maharashtra.

To the Marathi linguist, this work will be of considerable interest. Many words aud phrases used in this work have changed in form with the development of Marathi language, especially prose. But in this process one does find that certain words which are allowed to go out of usage could have been retained for the merit of their expressiveness and worth of origin.

The great Saraswati Mahal of Tanjore is really vast with hidden treasure of several works, in Sanskrit, Marathi, Telugu, Tamil, Kannada, Malayalam and also western languages. Since the loss of royal patronage which is quite necessary for such institutions, the traditional lack of love between Lakshmi and Saraswati threw

the Mahal into financial difficulties. As the sceptre was about to pass into popular hands, it was but quite appropriate that the Education Minister of the Madras Government, Mr. Avinashalingam Chettiar, turned his attention to this "Palace of Learning," and appointed a Committee, in June 1947, under the chairmanship of Mr. Sadagopachariar, to make recommendations for reorganising the library and making it more useful to everybody. Among the many recommendations of this committee one was to have rare manuscripts in various languages published. Several committees were subsequently appointed by the Government to select manuscripts from various languages for the purpose of publication.

The present editor had the honour to serve on the first committee as well as on one of the latter concerning Marathi section. He is grateful to the Government of Madras, to the members of both the committees mentioned above, and also to Mr. Gopalan, the Hon. Secretary of the Saraswati Mahal and to Mr. Chandrasekharan, Curator of the Oriental Manuscripts Library, for their hearty co-operation and worthy guidance. The work of editing this book could certainly have been entrusted to abler hands, but the present editor accepted it as a tiny bit of service to the mother tongue. His thanks are also due to that veteran Marathi scholar of Tanjore, Mr. Ramachandra Rao Narasinhapurkar, who once carried out the tremendous task of cataloguing the Marathi manuscripts in the Saraswati Mahal, and also to his friend, Mr. Rajaramrao Pingale, whose intense love for and deep

scholarship in Marathi can hardly be exaggerated, and without whose assistance full justice could not have been accomplished.

The author has compared the story of Ramayana to the holy Ganga, which starts from Mount Valmiki, which finally joins the Ocean of Rama, whose water is nectar itself, being capable of ending sufferings of all of us and before whom even God Shankara lays prostrate. It is the pleasant duty of the editor to show the way to this Ganga and to request Marathi readers to join God Shankara and to enjoy a plunge!

MADRAS
MARCH 2, 1951
DASA NAVAMI

P. D. JOSHI.

Govt. Oriental Mss. ...
Triplicane P.O., Madras

॥ प्रस्तावना ॥

ऐका कथा सर्वहि तापभंगा,
रामायणी अमृतसारगंगा ;
वाल्मीक अद्रीहुनि रामसिंधीं,
जे मीनली शंकर जीस वंदी.

बालकांड श्लोक २.

या श्लोकबद्ध रामायणाचे कर्ते श्रीमाधवस्वामी यांनीं रामायणकथेचें माहात्म्य वरील श्लोकांत सुंदर व चटकदार रीतीनें वर्णिलें आहे. वाल्मीकिऋषिरूपी पर्वतांत उगम पावून अमृतानें भरलेली ही रामायणकथारूपी गंगानदी आपल्या दोन्ही थडी पावन करीत व तीरांवरील लोकांच्या तापाचा नाश करीत रामरूपी सागरांत अंतीं विलीन होत आहे. हिच्या तीरांवरील जे लोक पावन होत आहेत त्यांत भगवान शंकरांचाहि अंतर्भाव कवीनें केला आहे. भगवान शंकरांसह मराठी वाचकांनींहि या गंगेंत अवगाहन करून पावन व्हावें अशी त्यांस प्रार्थना आहे.

माधवस्वामींनीं हें जसें श्लोकबद्ध रामायण लिहिलें तसें एक ओवीबद्ध रामायणहि केलें आहे. त्याचप्रमाणें भारतहि त्यांच्या लेखणींतून उतरलें असून अनेक उपाख्यानां-

चे ते लेखक आहेत. श्रीसमर्थ रामदासस्वामी यांचे एक प्रमुख शिष्य राघवदास हे दक्षिणेंत होते असा उल्लेख गिरिधरकृत "समर्थप्रताप" या ग्रंथांत आहे. (श्री. शं. श्री. देवकृत "समर्थसंप्रदाय" पृ. २४०) या राघवदासांचे शिष्य माधवस्वामी अशी माहिती मिळते. ओवीबद्ध रामायणाचा रचनाकाल शके १६१७ व ओवीबद्ध भारताचा शके १६२७ (इ. स. १७०३) असा कवीनें सांगितला आहे. त्यावरून तंजावरचे शहाजी राजे (इ. स. १६८४—१७१०) यांच्या कारकीर्दीत हे कवि विद्यमान होते असें दिसतें. मायावरम् जवळ कावेरीनदीच्या कांठीं त्रिवेंदूर येथें या ग्रंथाचें लेखन कवीनें केलें आहे.

श्रीसमर्थ रामदासस्वामी हे माधवस्वामींचे जसे आजेगुरु, त्याचप्रमाणें महाराष्ट्र सारस्वतांतील एक तेजस्वी रत्न श्री एकनाथस्वामी हे त्यांचे आजोबा म्हणजे मातामह. एकनाथांची कन्या उमाबाई हिचे माधवस्वामी हे चिरंजीव. माधवस्वामींच्या दोन नातवांनीं (पुत्राचे पुत्र वासुदेव व कन्येचे पुत्र अंबाजीपंडित यांनीं) लिहिलेलें भागवत तंजावरच्या सरस्वती महालांत आहे त्यांत ही माहिती दिली आहे. याप्रमाणें वंशपरंपरा व गुरुपरंपरा या दोन्ही दृष्टींनीं माधवस्वामींचा संबंध महाराष्ट्रांतील दोन प्रख्यात भगवद्भक्त व सरस्वतीभक्त यांच्यापर्यंत जाऊन पोंचतो. श्रीएकनाथस्वामींचे दुसरे नातू म्हणजे दौहित्र (मुलगी गोदूबाई किंवा लीलाबाई हिचे पुत्र) मुक्तेश्वर हेहि

महाराष्ट्रांत एक विख्यात कवि होऊन गेले. मराठी संत मंडळांत यांची गणना होत असून त्यांचें मराठी भाषेंतील महाभारत प्रसिद्ध आहे.

वर दर्शविल्याप्रमाणें रामदास व एकनाथ यांच्यापर्यंत ग्रंथकर्त्याचा संबंध पोंचत असला तरी गुरुपरंपराच अधिक प्रभावी ठरून प्रस्तुत ग्रंथावर रामदासी छापच अधिक पडली आहे हें वाचकांच्या सहज ध्यानीं येईल. समर्थपरंपरेप्रमाणें प्रत्येक कांडाच्या प्रारंभीं गणपति, सरस्वती व क्वचित सद्गुरु यांस संक्षिप्त नमन, कित्येक कांडांच्या प्रारंभीं श्रोत्यानें प्रश्न विचारल्यावर वक्त्यानें कथेस आरंभ केल्याचा थाट, रेखीव व्याकरणशुद्धतेकडे व ठाशीव वृत्तरचनेकडे कथेच्या ओघांत केलेलें दुर्लक्ष, कथनाची ओघवती पद्धति, काव्यरचनेसाठीं विशिष्ट वृत्तांची निवड, इतर कांडांपेक्षां युद्धकांडास दिलेलें महत्त्व (एकूण ७२६ श्लोकसंख्येपैकीं युद्धकांडांत २५९ श्लोक आहेत) युद्धकांडाच्या अंतींच केलेला ग्रंथाचा शेवट, "भीम, असंभाव्य" इत्यादि शब्दांची वर्णनाच्या ओघांत केलेली रेलचेल, यांसारख्या अनेक लक्षणांवरून हा मुद्दा वाचकांस सहज पटेल.

कित्येक प्रसंगांचीं किंवा स्थळांचीं वर्णनें देतांना कवीची प्रतिभा विशेष खुलते. भोजनें, मिरवणुकी, पुष्कळसे समरप्रसंग यांचीं वर्णनें पहावीं. बालकांडाच्या २१ व्या श्लोकांत मिरवणुकींतील दारूकाम वर्णितांना कवि म्हणतो कीं, गर्दीत चिचुंद्र्या सोडलेल्या पाहात असतांना लोकांस एकी-

कडे संतोष वाटत होता, तर एकीकडे ते भीतहि होते. युद्धकांड श्लो. १३७ मध्यें वानरांनीं केलेलें लंकादहन वर्णितांना, लंकेंतील कित्येक "रोडके लोक वाळलेल्या दोडक्यांप्रमाणें त्वरित जळत होते" असें साहजिक वर्णन कवि करतो. स्वभावोक्तीचीं तर अनेक उदाहरणें वाचकांस आढळतील.

काव्याची भाषा बहुतांशीं प्रसादयुक्त व ओघवती आहे. तथापि वाचकांची गंमत करून त्यांस क्षणभर बुचकळ्यांत टाकण्यासाठींच कीं काय, मधूनमधून खुबीदार रचना आढळते. महाभारतांतील कूटश्लोकांची आठवण अशा वेळीं वाचकांस झाल्यावांचून राहणार नाहीं. लक्ष्मणाविषयीं अनेक ठिकाणीं शेष, फणि असा उल्लेख, मारुतीला रुद्र ही संज्ञा, हीं वाचतांच वाचक क्षणमात्र स्तिमित होऊन मग पुढें वाट चालूं लागतो. विशेषतः प्रत्येक कांडाच्या अंतिम श्लोकांत त्या कांडाचें नांव सांगतांना कवि थोडी तरी गंमत करतो. पहिल्याच म्हणजे बालकांडाच्या शेवटीं कवि सांगतो कीं "इति हरिनिजकांता बालकांडासि झाली" म्हणजे बालकांडाची "इतिश्री" झाली. तसेंच अयोध्याकांड (दशरथपुरनामें कांड) किष्किंधाकांड (कपी सुग्रिवालागिं वास्तव्य पौरीं, तिचें नाम कांडासि) सुंदरकांड (असे चांगलें नांव याचें स्वभावें) हे उल्लेख पहावे. समर्थसंप्रदायांत अक्रा या संख्येचें विशिष्ट माहात्म्य आहे. म्हणून या काव्याची एकूण श्लोकसंख्या "सासष्टि अक्रा" म्हणजे ६६ × ११ = ७२६ अशी वर्णिली आहे. युद्धकांडांतील २४८ वा श्लोक राम-

राज्याचें गोड व खुबीदार वर्णन करणारा आहे.

हा ग्रंथ तंजावरप्रांतीं लिहिला असल्यानें या प्रांतांत अजूनहि प्रचारांत असलेले पण महाराष्ट्रांत प्रचारांतून गेलेले कांहीं गोड व अन्वर्थक शब्द ग्रंथांत मधूनमधून सांपडतात. विदी (मार्ग, रस्ता) निरज (धूळविरहित) आह्वा (धग, झळ) हे शब्द वानगीसाठीं पहावे.

तंजावरच्या मराठी राजघराण्यांतील सरस्वतीभक्त शरफोजी राजे यांनीं साहित्य व कला यांवरील आपल्या प्रेमामुळें "सरस्वती महाल" या नांवाचा भव्य ग्रंथसंग्रह केला. या संग्रहांत अनेक संस्कृत, मराठी, तेलुगु, तमिळ, इंग्रजी इत्यादि भाषांतून विविध विषयांवर ग्रंथसंपत्ति आहे या ठेव्याचा लाभ अनेक विद्वानांस संशोधनार्थ होत आला आहे. तो अधिक प्रमाणांत व्हावा म्हणून कांहीं योजना सुचविण्यासाठीं मद्रासचे तत्कालीन शिक्षणमंत्री श्री. अविनाशलिंगम् चेट्टियार यांनीं (एप्रिल १९४७ मध्यें) श्री. शठगोपाचार्य यांच्या अध्यक्षतेखालीं एक समिति नेमिली. त्या समितीवर प्रस्तुत लेखकाची नेमणूक झाली होती. त्या समितीच्या अनुरोधावरून संस्थेस कांहीं सरकारी साहाय्य मिळालें. त्या साहाय्यानें कांहीं जुन्या हस्तलिखित ग्रंथांचें प्रकाशन करण्याचें ठरल्यानंतर मराठी ग्रंथांची निवड करण्यासाठीं नेमलेल्या समितीवरहि लेखकाची नियुक्ति झाली. प्रकाशनासाठीं निवडलेल्या कांहीं ग्रंथांपैकीं या ग्रंथाचें संपादन करण्याची कामगिरी सरस्वती महालाचे विद्वान कार्यवाह

श्री. गोपालन् यांनीं लेखकाकडे सोंपविली. ती यथामति पार पाडल्याचें समाधान आज लाभत आहे. मातृभाषेची, अल्प कां होईना, सेवा करण्याची संधि दिल्याबद्दल, मद्रास सरकार, वरील दोन्ही समित्यांचे सभासद, सरस्वती महालाचे कार्यवाह श्री गोपालन् यांचा लेखक ऋणी आहे. संपादनाच्या कार्यांत मद्रास येथील विद्वान व व्यासंगी स्नेही श्री राजाराम-पंत पिंगळे यांचें अमूल्य साहाय्य झालें. किंबहुना त्यांच्या साहाय्यावांचून हें काम पार पडतेंच ना, असें म्हटलें तरी चालेल. तंजावर येथील समर्थसंप्रदायांतील एक मठाधिपति व सरस्वती महालांतील मराठी ग्रंथांची विषयवार यादी तयार करणारे व्यासंगी विद्वान श्री. रामचंद्रराव नरसिंह-पूरकर यांनीं हि कांहीं बिकट स्थळांचा अर्थ लावण्याच्या कामीं प्रेमानें साहाय्य केलें त्याचा उल्लेख करणें अवश्य आहे.

ग्रंथ वाचून त्याचा अर्थबोध करून घेत असतांना कांहीं टिपणें केलीं तीं वाचकांस उपयुक्त होतील असें वाटल्यावरून ग्रंथाच्या शेवटीं दिलीं आहेत. अर्थात सर्वच कठीण शब्दांचा अर्थ देण्याचा यांत हेतु नाहीं. त्याचप्रमाणें थोडाबहुत विचार करूनहि कांहीं स्थळांचा अर्थबोध हवा तितका स्पष्ट झाला नाहीं. अशीं शंकास्थळें वेगळीं दिलीं आहेत. कांहीं वाचकांस तीं अवघड वाटणार नाहींत, पण पुष्कळांस तशीं वाटतीलहि. वर एकदां निर्देशिल्याप्रमाणें व्याकरणशुद्धतेकडे कवीचा कटाक्ष नाहीं हें खरें तथापि मुद्रणाच्या वेळीं योग्य

प्रयत्न करूनहि कांहीं अशुद्धें राहिलीं आहेत त्यांची वाचकांनीं क्षमा करावी.

समर्थसंप्रदायांतील एका दाक्षिणात्य भक्तकवीनें लिहिलेलें हें श्रीरामचरित्र मातृभाषाप्रेमी महाराष्ट्रीयांच्या सेवेस सादर करतांना त्यांस विनंती कीं, या रामायणरूपी मराठी अमृतसारगंगेंत अवगाहन करून आपण पुनीत व्हावें.

मद्रास
दासनवमी, शके १८७२
२ मार्च, १९५१

पु. दि. जोशी

GOVERNMENT ORIENTAL MSS. LIBRARY
17 JUL 1951
TRIPLICANE P.O., MADRAS

॥ श्रीः ॥

श्रीरामप्रसंन ।

॥ श्लोकबद्धरामायणम् ॥

॥ बालकाण्ड ॥

प्रथम नमन माझें वक्रतुंडा गणेशा
  तदुपरि नमिली ते शारदा चिद्विलासा ।
गुरुपदिं निजभावें ठेउनी मस्तकातें
  उपरि वदत वक्ता जोडुनि हस्तकातें ॥ १ ॥

ऐका कथा सर्वहि तापभंगा
  रामायणी अमृतसारगंगा ।
वाल्मीक आद्रिहुनि रामसिंधीं
  जे मीनली शंकर जीस वंदी ॥ २ ॥

सरयुनदिप्रदेशीं नातुडे पौरयुध्या
  म्हणउनि जन त्याचे नाम बोले अयोध्या ।
दशरथनृप तेथे सुकृती पुण्यरासी
  सकळिक जन पाळी सर्वदां सौख्य देसी ॥ ३ ॥

येके दिनी त्यां मनि थोर चिंता
म्या भोगिलें सर्वहि भोग आतां ।
वृधाप्य आलें परि पुत्र नाहिं
बालागि (की?) जे सुतयत्न काहि ॥ ४ ॥

सुमंत्राते मंत्रु पुसत नृपती काये कारणें
म्हणे तो जी राया सहज सुत चिंता न करणें ।
असे प्राप्ती त्याचि मुनिवर मुखे म्या परिसिलें
कथा ऐकें ते तुं नवल रुषिश्रृंगासारिसलें ॥ ५ ॥

महाराज जो धार्मिकु रोमपादु
भूमी त्याचिये नाडले तोयबिंदु ।
पुसे तो पुढे संतसाधुद्विजासि
किजे यत्न म्या सांगिजे काय यासि ॥ ६ ॥

ते सांगती जाणुनि देवरंगा
आणी नृपा सत्वर येकश्रृंगा ।
तेणे पुढें होईल मेघवृष्टी
त्यानंतरे धान्यसुभिक्षसृष्टी ॥ ७ ॥

ऐकानि ऐसे नृप ते प्रसंगी
बोले अमात्यां रुषि येकश्रृंगी ।
आणा तुम्हि यत्न करुनि नाना
ते पाहति निश्चये बुद्धिज्ञाना ॥ ८ ॥

उपरि कुशल वेश्या गायेका आणियेल्या
कनकसुमनवस्त्री सर्वही गौरवील्या ।

निरउनि मग त्यातें पाठविले वनासी
नवल परम वाटे सानश्रेष्ठा जनासि ॥ ९ ॥

देखुनि दृष्टी रुषिश्रृंग तेही
आलापिला मंजुळ राग पाहि ।
ऐकोनि कर्णि रुषि सिघ्र आला
साष्टांग त्याते प्रणिपात केला ॥ १० ॥

म्हणे आपुले नाम तें काय सांगा
रुषी गंडकी हेचि हे जाण तुंगा ।
सुधेतुल्य अर्पुनि नाना फलाते
निघाल्या पुढे सीघ्र घेउनि त्यातें ॥ ११ ॥

शांता नाम सुता सुधारसलता लावण्यरूपी महा
तीतें राव करीं धरूनि उपरि अर्पि रुषिते पहां ।
झाली वृष्टिबळे क्ष्मी बहुफळेधांन्यादिकें पीकलीं
तेणे लोकमनें सुखेंसुमने भोगावया सोंकली ॥ १२ ॥

तो मित्र तुझा तरि जाउनिया
येथे रुषी सत्वर घेवुनिया ।
त्याचेनि राया सुत तुज होती
कथा असी पुर्विल हे वदंती ॥ १३ ॥

अमात्याचि ऐसें सुरसवचनें तें परिसुनि
त्वरे गेला राजा सकळजनचिंता निरसुनि ।
पुढे आणि मित्रा पुसुनि नगरालागि उभय
रुषी अर्पि राया कुमरविषइं सीघ्र अभया ॥ १४ ॥

उपरि करुनि यज्ञा साधिले पायसासि
परमसुशिळ ज्याया वांटिलें त्यां तिघींसि ।
सुहृद सकळ गेला राव पौरासि आला
तंव सुतजननाचा काळ संन्निध आला ॥ १५ ॥

कर्काटलग्न नवमी धवळीत पक्षु
मासासि चैत्र म्हणिजे रवि लोकचक्षु ।
माध्यान्हिचा ग्रह शिवानन उंच संख्या
तेव्हांचि जन्म घडला रघुनाथमुख्या ॥ १६ ॥

भरथ परमसाधु जाहला कैकईसी
कुमर उभय देखा राजमध्यस्त्रियेसी ।
प्रथम जन्मला तो नाम शत्रुघ्न त्याचें
वडिल उपरि जाला शेष सामर्थ्य ज्याचें ॥ १७ ॥

वाढले हळुहळु दिनमानें
बांधली उपरि मुंजि नृपानें ।
जाहले चतुर सर्वहि भारीं
पावला त्वरित कौसीक द्वारीं ॥ १८ ॥

पुढे त्यासि सन्मानुनि राजश्रेष्ठें
सभे आणिलें नीतिवंते वसिष्ठें ।
ऋषी यज्ञसिध्यर्थ तो राम मागे
नृपाअंतरीं थोर उद्वेग जागे ॥ १९ ॥

वसिष्टें प्रसगें बहु सीकवीला
तयानंतरें दीधलें राघवाला ।

ऋषी रामसौमित्र घेउनि वेगें
त्वरे चालिला आश्रमाचेनि मार्गें ॥ २० ॥

परम सबळ पापी ताटिका कर्कशा ते
निबिड वनप्रदेशीं प्राणिमात्रासि खाते ।
नरविरधिर त्यातें देखतां सिघ्र आली
न भरत पल बाणें राघवें भग्न केली ॥ २१ ॥

उपरि मुनिवराचा याग सिधीसी नेला
वधुनि असुरमेळा लोक आनंदवीला ।
विबुध सकळ यांते जाहली थोर तुष्टी
परम हरुषमेळे पाडिती पुष्पवृष्टी ॥ २२ ॥

मुनी बोले रामा परिस गुणधामा रणधिरा
विदेहाचे ग्रामी कठिण धनु जे देवअसुरा ।
न हालेचि ते तां चढउनि बळे भग्न करिजे
ममाज्ञा हे वांछा उभय अनुजी दृढ धरिजे ॥ २३ ॥

हो जी म्हणे राम चला मुनींद्रा
तो चालिला घेवुनि रामचंद्रा ।
पदी अहिल्या मग उत्धरीली
तीणें पुजा सर्वहि सांग केली ॥ २४ ॥

नगर तेथुनिया जनकाचें
सरस्य रम्य दिसे कनकाचे ।
उपरि घेवुनिया नृपभेटी
सबळ आणविलें धनु पाठी ॥ २५ ॥

देखोनी चाप उठिला रघुनाथ कैसा
  देदिप्यमान अवनी प्रतिसूर्य जैसा ।
झेली पुढे अवालिळा कुसुमापरि ते
  तोली सुखें चढउनि दृढ गुण हाते ॥ २६ ॥

कडकड धनु मोडे वोढितां सीत नेटे
  धडधड भुमि तेणें लोटलि सैलथाटें ।
तडतड अवनीच्या चेळल्या व्योमतारा
  घडघड अतिनादें लोक मुर्छित सारा ॥ २७ ॥

जनक परमतोषें कौशिकाचेनि मत्तें
  दशरथ नृपनाथा पाठवी पत्रिकेते ।
दिनमणिकुलदीपा प्रार्थना आयकावे
  निजदळपरिवारे सिघ्र लग्नासि यावे ॥ २८ ॥

वाचुनि पत्र सुमनी नरराज कैसा
  तोषे बहु उदधि देखुनि चंद्र जैसा ।
पालाणवी मग दळाप्रति सिघ्रकाळें
  वैसे त्वरे निजरथीं अतिसौख्यमेळें ॥ २९ ॥

रथगजनरवाजी दाटणी थोर झाली
  उधळत रज व्योमी श्वापदें सर्व भ्याली ।
बहुविध बहुछत्रें नाडळे त्यासि लेखा
  फडफडफड वातें वाजती त्या पताका ॥ ३० ॥

भेरी नफेरी बहुसाल रंगे
  वाद्ये बहु वाजति ते सुरंगे ।

टाळा दुटाळा पणवे कुरंगे
  ऐकुनी कर्णि पळती कुरंगें ॥ ३१ ॥

जनकनृपवरासि सर्वदा वस्ति जेथें
  क्रमुनि दिवस काहीं पावले भार तेथें ।
निजदळपरिवारें राव सन्मुख आला
  दशरथ बहुमानें पटणामाजि नेला ॥ ३२ ॥

हयगजरथशाला उंच माड्या विशाळा
  निरज करुनि भूमी सिंपिल्या रंगमाळा ।
मखर सिखर दुर्गी तोरणें ठाइठाइं
  नगर परम शोभे साम्यता ज्यासि नाहि ॥ ३३ ॥

दशरथनृपनाथा ठाव देवुनी वस्ती
  जनक त्वरित गेला अस्त होतां गभस्ती ।
उपरि सहज झाला शार्वरीलागि अंतु
  भरथ सुहृद आला वीर संग्रामजीतु ॥ ३४ ॥

विवाहाचि कार्य सकळ करुनी सिध बरवी
  विदेही भृत्यातें सरल स्वमुखें वाक्य निरवि ।
तुम्हि जा हो आणा दशरथनृपालागि सदना
  त्वरे गेले कैसे जळनिधिप्रती सप्तवदना ॥ ३५ ॥

करुनिया नमनें निजमस्तकें
  सकळ बोलति जोडुनी हस्तकें ।
करुनि संनध सैन्य त्वरें चला
  निजस्नुषा स्वकरे मग उचला ॥ ३६ ॥

ऐकोनि भृत्यवचनें नृप सिद्ध झाला
   सेनासमुह सरिसा गजरें निघाला ।
हस्ती पुढें त्वरित चालति थोर मस्ती
   वाणी वदे द्विजमुखि सकळासि स्वस्ती ॥ ३७ ॥

हयगजरथथाटें चालिलिं कडकडाटें
   नरवीर धिर नेटें भाटवेताळथाटे ।
थिरथिरथिरशब्दें बोलती येकमेकां
   गजबज अति खेटा ठाइठाइ पताका ॥ ३८ ॥

शतदशशतसंख्या शोभती पालसत्रें
   बहुविध बहुछत्रें आणि ते सुर्यपत्रें ।
धडधडधड भेरी वाद्यकल्लोळ वाजे
   बधिर सकल तेणें वाड ब्रंम्हांड गाजे ॥ ३९ ॥

कर्णे तुतारे बहुसाल बांकें
   घोषें महा अद्भुत व्योम झांके ।
टाळा दुटाळा पणवे बुरंगें
   वाद्यें बहु वाजति तें सुरंगें ॥ ४० ॥

सरसर फुलबाज्या शोभती चंद्रजोति
   लखलख दिवट्यांचे भार उदंड येती ।
झकझक चिचउंद्र्या दाटणी सोडिताति
   टकमक जन तेणें तोषती आणि भीति ॥ ४१ ॥

नळे हवाया अति उंच पाही
   अर्द्धांत जाति मिति त्यांसि नाहिं ।

उसंत रंगीं क्षणहिं दिसेना
   येणे रिती चालत सर्व सेना ॥ ४२ ॥

मिरवत जनकाच्या मंदिरालागि आले
   उतरुनि मग भुमी भीतरी सर्व गेले ।
मुनिवर द्विज तेहि मांडिला वेदघोषु
   लखलख दिपिकांचा ठांइठांई प्रकाशु ॥ ४३ ॥

दाळिंब धात्रीफळ आणि केळें
   द्राक्षी तथा आणिकही रसाळें ।
फळें पहा लोंबति ठांइठांई
   घेती मुलें तोडुनि कांहिकांहि ॥ ४४ ॥

रसमस वनिताचि आणि त्याहो नरांचि
   सकळिक म्हणति कीं वेळ हे अंमृतांचि ।
समय निकट आला सिघ्र कन्येसि आणा
   जनक त्वरित गेला मंदिरामाजि जाणा ॥ ४५ ॥

प्रथम अवनिजा ते आणिली पंकजाक्षी
   मदगजगतिगामी राम जीतें अपेक्षी ।
अगणित गुण सीमा कोण वर्णील वाचे
   फणिवर कवि तेहिं जाहले शब्द काचे ॥ ४६ ॥

अमृतउदधिकन्या रामरूपी अनन्या
   मुनिवरऋषिमान्या धाम लावण्य धन्या ।
सुखकरसुखजन्या स्थान जे मुळ पुन्या
   दनुजअसुरशुंन्यालागि निर्माण अन्या ॥ ४७ ॥

लावण्यरासी अतिसौख्यरासी
लीळाविशेषी चिदचिद्विलासी ।
पद्माक्षभंगा भवतापगंगा
वारी सुरंगा सुललीतरंगा ॥ ४८ ॥

घेउनी तीतें मग वेदिकेतें
आला विदेही रघुनाथ जेथें ।
घालुनि मध्यें मग अंत्रपाटा
आरंभिलें मंगलमंगलाष्टा ॥ ४९ ॥

आधीं मच्छ जळिं रिघे अतिबळी शंखासि मारी पाहा
झाला कुर्म पुढें बळें निज दृढें रक्षी महीते महा ।
वाराहस्वरूपी महातमरूपी हेमाक्ष नामावधी
तो हा राम सुशाम कामजनिता कुर्वंतु वो मंगळं ॥

झाला सिंहनरु तथा द्विजवरु रूपें कसा वामनु
केलि ख्याति तिहिं पाहा अति मही स्थापावया तो जनु ।
झाला राम सुखें शरें अतितिखें संहारिलें क्षेत्रियां
तो हा राम सुशाम कामजनिता कुर्वंतु वो मंगळं ॥ ५१ ॥

नामें राम पुढें महाजडमुढें तारावया ते जनी
बोधें बौधमुनि हयानन गुणी नांदावया सज्जनी ।
मारी दुष्ट जिवा करी जनन वा कल्कि लया बोलिजे
तो हा राम सुशाम कामजनिता कुर्वंतु वो मंगळं ॥

समय अति पाहाला पट्ट तो काढियेला
वधुवर उभयातें अक्षतायोग झाला ।

लघु गुरु बहु वाद्ये लागली येक घाई
पिटिति सकळ टाळी पार सौख्यासी नाही ॥ ५३ ॥

विबुधजन विमानी जाहली त्यासि तुष्टी
रघुपतिवरि तेहि मांडिलि पुष्पवृष्टी ।
सुखमय सुखपुष्टी कोंदली सर्व सृष्टी
वधुवररुपसाम्यि गुंतली लोकदृष्टी ॥ ५४ ॥

त्यानंतरें सत्वर तोषचित्तें
अर्पी फणीतें नृप उर्मिळेतें ।
चक्रावताराप्रति मांडवीतें
शत्रुघ्न त्यातें श्रुतकीर्तिकेतें ॥ ५५ ॥

रघुपतिभरताचे पाहतां येक लीळा
टकमक जन पाहे भ्रांति त्या वेळवेळां ।
कुमर उभय जे कां राजवध्यास्त्रियेचे
समरुपसमठाणा वीरसिंधु नितीचे ॥ ५६ ॥

रसमस सुखनन्दी लोटली वेळ काही
बहुविध वनितानि निर्मिले पाक गेहीं ।
करुनि सकळ स्नानें बैसले भव्यहारी.
उजळति दिपरत्नी रंग नानाप्रकारीं ॥ ५७ ॥

लवणलवण शाका इच्छिजे देवमुखें
वटक विविध घाऱ्या आणिकें भिन्न भक्षें ।
तळणवळण मांडे तैलपुऱ्या अनेका
रुचिकर अति अन्ने वाढिलि आणि शाका ॥ ५८ ॥

घळघळ घृत द्रोणी वोतिले सर्व पात्री
नृपवर मग सोडी तोय संकल्प मंत्री ।
करुनि उपरि वेगें पुर्वआपोशनातें
सकाळिक जन घेति पंचप्राणाहुतीतें ॥ ५९ ॥

मघमघ बहु अन्ने सेवितां भक्ष धाले
जळ दधि अति तक्रें सर्व निर्हेत केले ।
त्यजुनि क्वचित पात्री अन्न ते उठियेले
रघुविरस्मरणेंचि सर्व बाहेरि आले ॥ ६० ॥

त्यानंतरें आंचवले खळाळां
आले सभे सर्वहि येकवेळा ।
वैडूर्य पाचि बहु रंग फांके
सुरत्नदीपीं रवितेज झांके ॥ ३१ ॥

दिव्यासनी सर्वहि स्थीर जाले
सुगंधपुष्पीं मग पुजियेले ।
माळा झळाळां स्वकरें विदेही
अर्पि जना तोषवी आप्त व्याही ॥ ६२ ॥

येणे रिती आदर दीन च्यारी
केले विदेहें बहुता प्रकारीं ।
जामात चौघे अतिसौख्यरासी
अर्पी तयां कांचन दासदासि ॥ ६३ ॥

घेउनि आज्ञा रथसप्ततीनी
निघे स्वपौरा मिथुळाधिपत्ती ।

प्रार्थि मुखें येउनि राममाते
पाळा सुपुत्रीपरि रम्य सीते ॥ ६४ ॥

पुसुनि परमस्नेहें येकमेकांसि देखा
दशरथनृप जातां पड्गा मार्गरेखा ।
धरुनि उदित युध्या भार्गवी राम कोपें
रघुपति मग त्याची शक्ति हारी प्रतापें ॥ ६५ ॥

आले सर्व पुरी समस्त नगरी श्रृंगारिली साजिरी
राजाज्ञा स्वसिरिं धरुनि उपरि संग्रामाजितु करी ।
भर्तालागि धरि निघे झडकरी शत्रुघ्नहि केसरी
संगे सौख्य वरी स्वराष्ट्रकुसरी ते पावले लौकरी ॥

दशरथ निजनीति राघवालागि सांगे
रघुपतिगुणरंगे सर्वहि लोक रंगे ।
इति हरिनिजकांत बालकांडासि जाली
विनवित गुरुआज्ञे माधव स्वल्पबोलि ॥ ६७ ॥

ORIENTAL MSS. LIBRARY
17 JUL 1951
TRIPLICANE P.O., MADRAS

॥ अयोध्याकाण्ड ॥

गणपति विधिकन्या सद्गुरुनाथजिसी
नमन करुनि वक्ता सांगताहे कथेसि ।
दशरथसुत दोघे मातुलालागि गेले
रघुपतिगुणवेधें लोक निश्चित ठेले ॥ १ ॥

जळधरजळपानें चातकां तृप्ति मोटि
हिमकरउदये त्या दीप्त नक्षत्रकोटि ।
रघुविर निजदृष्टि देखतां लोके तैसे
निसिदिनस्मरणेंचि लोटति काळ ऐसे ॥ २ ॥

रामा रामा पट्टणी शब्द हाची
जेथेंतेथें लोक कामा न वांछी ।
वांछी चित्तिं सर्वदा रामसौख्या
सौख्या त्यांच्या पार नाहि असंख्या ॥ ३ ॥

दशरथनृप ऐसें जाणुनि सर्व चित्ते
पुसत सुहृद राजे त्यांप्रती मीतिमंतें ।
रघुविरसुत त्यातें इछितों राज्य द्याया
विवरुनि मज सांगा याचि अर्थी उपाया ॥ ४ ॥

ते बोलती होउनि येकमुष्टी
हे मान्य राया अति सार गोष्टि ।
ज्याच्या गुणाला मिति पार नाहिं
ज्याला न भूमी उपमाचि कांहीं ॥ ५ ॥

उदइक युवराज्या स्थापिजे राघवासि
सुखकर आमुचि हे पुर्ण कीजे असोसी ।
नृपवर मग प्रार्थि कार्यहेतें वसिष्ठा
बिधिसुत करि आज्ञा भृत्यश्रेष्ठा वरिष्ठा ॥ ६ ॥

न भरत पळ तेंहि कार्य सिधिसि नेले
सकळिक पुर रंगें रम्य शृंगारवीलें ।
हरिहर निजगेहें रेखिल्या चित्रशाळा
निरज करुनि भूमी सिंपिल्या रंगमाळा ॥ ७ ॥

तरु बहु कदळीचे बांधले ठांइठांई
मखर सिखर उंचि तोरणा मीति नाहिं ।
रसमस अति गांवी थोर संतोष लोकां
अगणित रविपत्रें सोमछत्रें पताका ॥ ८ ॥

दशरथ नृपनाथालागि तो ब्रह्मसुत
करवित श्रुत वाक्यें पट्टणीचा वृतांत ।
निरखुनि रघुनाथा बोलता राव झाला
सकळिक तुम्हि ऐका त्याचि प्रशंस बोला ॥ ९ ॥

लावण्यनेता रमणीयगात्रा
सीताकळत्रा नरराजछत्रा ।

विद्याविचित्रा सगुणा पवित्रा
    अैकें सुपुत्रा जनमात्तमित्रा ॥ १० ॥

अगणित सुख पाहिं भोगिले सर्व देहीं
    निशिदिन मज चिंता राहिला हेत काहिं ।
तुजप्रति युवराज्यीं स्थापणे लागवेगें
    समय कठिण मातें मृत्य सांगे प्रसंगे ॥ ११ ॥

थरथरथर गात्रें कापति वेळवेळां
    तगवग निजचित्ति लक्षिता व्योमडोळा ।
रविशशि दिनरात्री तेजनिस्तेज कैसे
    अतिहिन दिसती ते अंतरी दुःख पैसे ॥ १२ ॥

उदइक युवराज्यीं तुज देखेन जेव्हां
    विगाळिग मग हेतु सिध संकल्प तेव्हां ।
तरि तुज निजनीती सांगतों अैक रामा
    क्षणभरि मन धालीं सौख्यलावण्यधामा ॥ १३ ॥

बहुशांत होई अतिधीर होई
    विजईच होई अजई न होई ।
ममता वसों दे समता दिसों दे
    छळणा रुसों दे तुळणा नसों दे ॥ १४ ॥

हे गुण असती तरि सर्व स्वस्ती
    त्यातें समस्तीं प्रणिजे स्वहस्तीं ।
जो मुढ व्यस्ती करि फार मस्ती
    तो काळग्रस्तिप्रति प्राप्त वस्ती ॥ १५ ॥

याकारणे जाउनि मंदिरासि
    विध्योक्त वर्ते व्रत सौख्यरासी ।
घेउनि सेना बळ सिध किजे
    आलस्य येथें सहसा न कीजे ॥ १६ ॥

हो जी म्हणे राम पुढे पित्याला
    वंदुनिया प्रति सीघ्र गेला ।
तो मंथरा कैकइ श्रावदासि
    आर्श्रीय कल्पे बहुसाल तीसी ॥ १७ ॥

गजबज नगरिं हो आजि कां होत आहे
    म्हणउनि मग उंची सीघ्र वेघोनि पाहे ।
सकळिक जन बोले राज्य रामासि व्हावें
    परिसत अति कुब्ज्या तप्त देहीं स्वभावें ॥ १८ ॥

उतरुनि मग सुधी कैकईलागि सांगे
    भय तुजप्रति आलें नेणसी काय सांगें ।
रघुपतिनिजहस्तीं लाभतें राज्य पुढे
    म्हणउनि मज चित्ती शोक अत्यंत वाढे ॥ १९ ॥

म्हणे कैकई मंथरे अैक वाणी
    सुता हुनियां राम लावण्यखाणी ।
मला आवडे त्याचिया राज्य हेतें
    समर्पीनसें तुज मी कंकणातें ॥ २० ॥

रघुपति निजभद्रिं बैसल्या आणि वार्त्ता
    करीन सकळ तेव्हां मान मी तुज पुर्त्ता ।

प्रतिकुळ अतिशब्दि ऐकतां पापरासी
  कटकट करी बोले मंथरा कैकईसी ॥ २१ ॥

बहुविध हिनशब्दिं भेद दाउनि तीतें
  सिकवित रघुनाथा सीघ्र धाडिं बनातें ।
उदइक तव वाक्यासारिखे मंथरे मी
  करीन म्हणुनि बोले कैकई पुत्रकामी ॥ २२ ॥

येरीकडे तो नृप चक्रवर्ति
  श्रीरामराज्यासनप्रीतिआर्ति ।
सांगावया कैकई धर्ममुर्ति
  निघे त्वरे सात्विक पुण्यकीर्ति ॥ २३ ॥

न धरित धिर पोटिं कैकईच्या ग्रहासि
  नृपवर मग आला रम्य लावण्यरासी ।
न दिसत निजनेत्रिं घाबिरा फार झाला
  तदुपरि अतिवेगें पुष्पशाळेसी गेला ॥ २४ ॥

तो कैकई लोळत भुमिपाठीं
  जाली असे वेष्टित मुक्तदटी ।
देखोनि दृष्टी नृप लागवेगें
  धरुनि हस्तीं बसवी प्रसंगें ॥ २५ ॥

विनवित मग रावो सांग वो काय झालें
  तव निजवदनीचें तेज लोपुनि गेलें ।
तरि मज गुज सांगें कोण तो हेत आहे
  करिन सफल तो मी राघवाच्याण पाहे ॥ २६ ॥

घेउनि भाक बरवी मग राजपत्नी
  मागे पुढें नृपवरा वर दोनि यत्नी ।
जे दिधले प्रथम ते मनि इछिते मी
  नेंदा तरि त्यजिन प्राणहि येचि धामी ॥ २७ ॥

प्रथमवर नरेंद्रा राज्य पुत्रासि द्यावें
  द्वितिय वर अटव्या राघवा पाठवावे ।
परिसत नृपनाथा मुर्छना थोर आली
  निजसुतहितचिंता पावति वृधि झाली ॥ २८ ॥

त्यानंतरें सावरुनि वपुते
  प्रार्थि बहु सादर कैकईतें ।
लाजे अती भाकुनि दैन्यपांया
  ते नायके पापमती उपाया ॥ २९ ॥

करी प्रार्थना मागुती वल्लभेसी
  म्हणे आइकें वाक्य लावण्यरासी ।
वरे साधिलें राज्य तें राघवासी
  त्वरें अर्पि तुं कीर्ति फांकेल देशिं ॥ ३० ॥

म्हणे कैकई सर्वथा हे घडेना
  तुम्ही इछिता पल्लवी ते पडेना ।
तपस्वीरूपें राम जाईल जेव्हां
  मनुस्वास्त होइल हा सत्य तेव्हां ॥ ३[illegible] ॥

कदां नातुडें तुमच्या मी उपाई
  राहा उगले सर्व सांडुनि घाई ।

पडे वाक्य ऐकोनि राजा उताणा
अहाहा अहाहा म्हणों दैन्यवाणा ॥ ३२ ॥

अहो पाहो कैसे नवल नृपती तो म्हणतसे
नव्हे कीं हे रात्री कठिण सिवणा हा गमतसे ।
पडे मुर्छामोहें विकल अवनि तो घाडिघडि
रडे श्वासें दाटे उदर अतिचिंतेत उतडी ॥ ३३ ॥

निसी गेली ऐसी उपरि तरणी तो उगवला
गुरुआज्ञा सांगे सचिव स्वमुखें हो नृपतिला ।
म्हणे या जी राया समय घटिका हे अति बरी
त्वरे द्या जी रामा सकळ अवनीराज्य स्वकरीं ॥३४॥

राजा म्हणे मी तव वाक्यबाणें
विदारलो ते रघुनाथ जाणे ।
ऐकोनि मार्गें सुत सीघ्र गेला
चिंतार्णवी फाराचि मग्न जाला ॥ ३५ ॥

म्हणे कैकइ ऐक वीरा सुमंता
सुताच्या हितें राजयालागि चिंता ।
निसी जागतां जागता सर्व गेली
म्हणोनि असें बोलिला तिव्र बोलि ॥ ३६ ॥

न लभत पळ आतां राघवालागि आणि
नृपवरमिसआज्ञा भेद काहि न मानि ।
समय रसिक जातो निर्वणें राज्य आहे
बहुविध अभिषेका सिध सामग्रि पाहे ॥ ३७ ॥

ऐकोनि मंत्री हरुषें निघाला
श्रीरामगेहाप्रति सीघ्र गेला ।
चला म्हणे सत्वर रामचेन्द्रा
मुहुर्तवेळा सरते नरेंद्रा ॥ ३८ ॥

रथी बैसला राम तो लागवेगें
फणी जाणवी सर्व सेवाप्रसंगें ।
असंभाव्य त्या लागल्या शंखभेरी
महावीर वेष्टित चौफेर फेरी ॥ ३९ ॥

मिरवत निजभारे राव उद्विग्न जेथें
रघुविर मग गेला आदरें सीघ्र तेथें ।
नृपवर नमुनियां कैकईलागि सेवी
दशरथ भुमि लक्षी दुख अत्यंत जीवीं ॥ ४० ॥

घळघळघळ नेत्रिं जातसे उष्णवारी
रघुपति मग मातेलागि सर्व विचारी ।
निरखित मज डोळां राव संतोष पावे
विपरित तरि आजी कासया हेतभावें ॥ ४१ ॥

अनुज भरथ माझा स्वस्ति कीं क्षेम त्यासि
त्रयशत नृपजाया सत्वलावण्यरासि ।
कुशळा सकळ त्यां कीं नातरी खेद त्यांसी
म्हणउनि नृप चिंता वाहतो हे मानासि ॥ ४२ ॥

म्हणे कैकई सर्वहि स्वस्त रामा
गुणे तुझिया काळिजि सार्वभोमा ।

जरि मानिसि वाक्य चित्ति पित्याचें
तरि सर्व जाईल हें दुख त्याचें ॥ ४३ ॥

वदे राम तो सौख्य रायासि जेणें
मला वर्तणें जाण तेणेंप्रमाणें ।
द्विभाष्यी नव्हें बोलतो सत्य वाचा
तरी हेत तो सांग अंबे नृपाचा ॥ ४४ ॥

म्हणे कैकई ऐक मा सत्वरासी
पति गोंविला दों वरें भाषपासिं ।
सुता माझिया सर्वहि राज्य द्यावें
वरु दुसरा तां वनालागि जावें ॥ ४५ ॥

जरि सीघ्र जासील आतांचि वेगीं
तरी राव संतुष्ट तो अंतरंगी ।
पडे वाक्य ऐकोनि मुर्छित राजा
तया बैसवी आसनी राम वोजा ॥ ४६ ॥

म्हणे राम मी इछितों राजआज्ञा
वदे कैकई आईकें सुतप्राज्ञा ।
तुसिं बोलिलें वाक्य तोंचि नृपाचें
न मानी कदा अंतरी भिन्न साचें ॥ ४७ ॥

तरि निजनगरातें सीघ्र त्यागुनि जाई
रघुविर विमनीता जाहला तीसी कांही ।
पुसुनि त्वरित येतों जननी आणि सीते
तववरि स्थिर राहें धीर कल्पुनि माते ॥ ४८ ॥

झडकरी रघुरावो चालिला लक्ष्मणेंसिं
नवल परम वाटे पौरवासी जनासी ।
मिरवत निजभारें राजभेटीसि गेला
त्यजुनि रथपदाती कासयालागि जाला ॥ ४९ ॥

हा हा हा हा शब्द तो लोक बोले
ऐके भुमी राम लक्षुनि चाले ।
गेला जथें जननी पुण्यखाणि
वंदी तीतें रम्य जोडूनी पाणी ॥ ५० ॥

न भरत धिर माता भेटली राघवासी
कवळुनि उदरी ते बोलिली वाक्य ऐसी ।
सगर नहुष पुर्विं जाहले थोर वौंसी
तदुपरि करि आतां राज्य तुं सौख्यरासी ॥ ५१॥

धरितिल तव मूर्ध्नि श्वेत लावण्यछत्रा
निरखिन सुखवेळा आजि नेत्री सुपुत्रा ।
बहुविध बहुवाद्ये थोर होईल बाई
परम हरुष माझ्या पार सौख्यासि नाहि ॥ ५२ ॥

प्रतिदिनि सुख पुत्रा सांगसी सर्व मातें
न वदसि उगलाचि आजि कां दैन्य चित्तें ।
मुख अति सुकलें बा लागली भुक पोटीं
क्षणभरि स्थिर बैसें अन्न वाढीन ताटीं ॥ ५३ ॥

ऐकोनि राम विनवी परिपुर्ण आतां
स्नेहासि राख जननी मजला दिगांता ।

जाणे असे प्रतिदिनी फळहार कीजे
मिष्टांन्न रम्य मज हें सहसा न साजे ॥ ५४ ॥

चिरांबरी जटिल तापस भस्म आंगी
जाईन सीघ्र विपिनाप्रति ये प्रसंगीं ।
राज्यासनी भरत सर्वही राज्य त्याचें
साकल्य राम सुचवी जननीसि साचें ॥ ५५ ॥

ऐकोनि ऐसी निजपुत्रवाणी
पडे सुमिते नृपपट्टराणी ।
करी पुढें सावध राम तीतें
बोलें करे आकळुनि सुतातें ॥ ५६ ॥

रामा कसी हे विपरीत वेळा
तुझेनि संगें अति सौख्य डोळां ।
पाहेन ऐसें मनि अर्त होतें !
तों मांडला बा वनवास तुतें ॥ ५७ ॥

हे दुखवार्ता श्रवणें विषाचि
शरीर माझें शतधा नव्हेचि ।
विउनि आंतां अति दुख भोगीं
याहुनि वंध्यापण सौख्यरंगी ॥ ५८ ॥

पितां जसा तो जननी तसीहि
यालागीं मी सांगत नीति पांहि ।
राहे सुखें मानुनि वाक्य माझें
देखेन् मी आनन नित्य तुझें ॥ ५९ ॥

त्यजुनि मज वनासी राघवा सीघ्र जासी
त्यजिन तरि वपुसी जाण हे निश्चयेंसि ।
म्हणउनि अनुमाना सीघ्र त्यागुनि संगें
मजहि त्वरित नेइ काननासी प्रसंगें ॥ ६० ॥

रघुपति मग बोले सर्वथा तां न यावें
दशरथ पति त्यातें नित्य सेवीत जावें ।
पतिहिनवनितेनें इछिजे पुत्रछाया
अनुचित न मिळे हें न्यायनीति उपाया ॥ ६१ ॥

फणिवर उभयांचि मात ऐकोनि ऐसी
न धरत धिर पोटिं कोपला कोपरासी ।
वदत उपरि दोघा लक्षुनि घोर वाणी
त्यजुनि नगर जाणें हेचि प्रत्यक्ष हाणी ॥ ६२ ॥

श्रीरामा बुधी मज़ला न मानें
येणें मनी सौख्य कदा न वाणे ।
ते कैकई कोठिल कोण चोर
पुत्रासि ज्येष्टा नगराधिकार ॥ ६३ ॥

दशरथनृपधुंदु जाहला बुधिमंदु
सकाळिकसुखकंदु राम लावंण्यइंदु ।
न धरित भय त्यांतें पाठवीतो वनासी
न भरत पल आतां सांगतो बुधि त्यासी ॥ ६४ ॥

काराग्रहीं घालुनि त्या अशक्ता
संव्हारितों सर्वहि वीर शक्तां ।

साधूनि देतो निजराज्य रामा
  निर्माण माझे कर याचि कामा ॥ ६५ ॥

म्हणे राम हें सर्वथा हीं घडेना
  रविमंडळीं काळिमा ते जडेना ।
तसा मी कसा आपुलें वाक्य टाळूं
  पडे हे तनु हाचि साधुनि काळु ॥ ६६ ॥

म्हणे जननि राघवा सीकवींता
  मना नाणिसि बुधि काहिच ताता ।
वनालागि जाईन हा ध्यास चिंती
  जिवी माझिये वाटते थोर खंती ॥ ६७ ॥

तुला कौशिकें शास्त्र अभ्यास केला
  बहुसाल तां लोक संतुष्टविला ।
तथा पितृभक्ती वरि मातृभक्ती
  तरि तें तुतें पुण्य राखो दिगांती ॥ ६८ ॥

रक्षो सुरें(द्र)द्र सरिता फणें(द्र)द्र
  रक्षो नगेंद्र पतगाधिइंद्र ।
रक्षो समुद्र गण वीरभद्र
  रक्षो सुचेंद्र रवि मुख्य रुद्र ॥ ६९ ॥

रक्षो विधाता मुनि सिध धाता
  रक्षो तरु राक्षस भुत ताता ।
रक्षो पिसा चाचण आणि मुंगी
  रक्षो अळी कीटक काष्टभृंगी ॥ ७० ॥

रक्षो वऱ्हाहो तुजलागि वारी
  रक्षो स्थळि वामन ब्रम्हच्यारी ।
रक्षो वनी कश्यप हेमवैरी
  सर्वा स्थळीं केशव निर्विकारी ॥ ७१ ॥

अैके रवि प्रार्थन वाक्य माझें
  रामा न बाधीं निजउष्णतेजें ।
अैकें समीरा मसप्राणपुत्रा
  रजें न डौरीं रमणीयगात्रा ॥ ७२ ॥

अैकें विनंति तुज आपमूर्ति
  रामासि रक्षीं अतिबाडकीर्ति ।
अैके भुमी राघववास्ति जेथें
  तां नम्र व्हवे बहुसाल तेथें ॥ ७३ ॥

निरउनि सकळातें राघवा[ला]गि पाहे
  घळघळघळ नेत्रिं तोय अत्यंत वाहे ।
वळुनि मन विवेकें मागुति बोलताहे
  करिसि गमन कैसें थोर आश्चिर्य वा हे ॥ ७४ ॥

रामा कसीं सेविसि कंदमुळें
  रामा कैसी नेससि चिरजाळें ।
रामा कसि धारिसि योगमुद्रा
  रामा कसि सारिसि भुमिनिद्रा ॥ ७५ ॥

रामा कसा आवरिसि क्षुधेते
  रामा कसा लोटिसि काळ तेथें ।

रामा कसा चालसि घोर वाटे
   रामा बहु कंटक ते सरांटे ॥ ७६ ॥

रामा तुझे सेवक दासदासी
   रामा ग्रहीं भोजन दिव्य त्यांसीं ।
रामा तुला कोठूनि दैन्य आलें
   रामा अदृष्टे विपरीत केलें ॥ ७७ ॥

रघुपति मग बोले त्यागि तुं दुरि दुखा
   क्रमुनि त्वरित येतों काननी काळ लेखा ।
नमुनि उपरि तीतें चालिला स्वग्रहासी
   तव निकट सुजाया पावली सत्वरासी ॥ ७८ ॥

बोले सीता आजि का छत्र नाहिं
   नाहिं सेना यान आलेति पाईं ।
सांगे तीतें सर्वहि राम वार्ता ,
   राहे तुं वो धर्म राखोनि पुर्ता ॥ ७९ ॥

म्हणे जानकी सर्वथाहिं न राहें
   वियोगु घाडिमात्र तोहि न साहें ।
पुन्हा सीकवी राम उदंड तीला
   पुढें प्रीतिचा कोप सीतेसि आला ॥ ८० ॥

वदत कठिण सीता राघवालागि ऐसें
   दिसासि पुरुषरूपी देह लावण्य कैसें ।
भय बहु बनितांतें अंतरी तेवि होसी
   जनकनृपपरिक्षा काय बोलों तयासी ॥ ८१ ॥

कां वागवीसी शरच्याप वोझें
   ऐकोनि हांसे रघुराज ओजें ।
शोधावया वो तव चित्त सीतें
   मी बोलीलों केवल पाप भीतें ॥ ८२ ॥

त्यजुनि सकळ चिंता सीघ्र येईं वनासी
   तव फाणि विनवीता जाहला राघवासी ।
करिन सकळ सेवा नित्य मी भक्तिरंगें
   तरि मज रघुनाथा नेइजे सीघ्र संगें ॥ ८३ ॥

बहु प्रार्थितां बोळला रामराणा
   तयानंतरें सारिले द्रव्यदाना ।
त्रिवर्गें पुढें पावालें राव जेथें
   मिळाल्या वधु सर्वहि आप्त तेथें ॥ ८४ ॥

पुसे राम तो भुपतिलागि आज्ञा
   म्हणे राव ऐकें सुता मुख्यप्राज्ञा ।
असें गुंतली भाष तेणेंचि ताता
   न ये राहवीतां करुं काय आतां ॥ ८५ ॥

तरि घालि वेंगीं मला बंदिशाळे
   पुढे राज्य भोगीं सुखें चीरकाळें ।
महासौख्य वाणेल तेंणे स्वचित्तिं
   न भंगी म्हणे आपुली राम वृत्ती ॥ ८६ ॥

वना जावया सीघ्र दीजे निरोपा
   वदे कैकई कासया वेळ बापा ।

वृथा लाविसी हें नव्हें योग्य तुतें
म्हणोनि करी दीधलें वल्कलातें ॥ ८७ ॥

तयानंतरें रामसौमित्र कैसे
रूपे झाहले तापसी शुध तैसे ।
न ये वल्कलें नेसता जानकीला
रघुनायकें नेसवीलीं तीयेला ॥ ८८ ॥

तपस्वीरुपी देखुनि राघवातें
पडे राव भुमी जसा वृक्ष वातें ।
म्हणे राघवा आजिचि रात्रि कंठीं
तरि सौख्य वाणेल किंचित्र पोटिं ॥ ८९ ॥

अहा कर्मरेखा कसी भीम माझी
नव्हे सर्वथा वा पुढें भेटि तुझी ।
तरि स्वस्त पाहेन मी श्रीमुखातें
म्हणोनि भुमी लोटला त्याचि हातें ॥ ९० ॥

बहु लोक धि:कारिती कैकईला
परि ना[यके]येक त्याचिया अल्पबोला ।
स्त्रिया रूदती सर्वहि येकवेळा
अहा शब्द उच्चारिता लोक जाला ॥ ९१ ॥

ध्वनी माजेली वाड आकांत घोर्षे
पुढे मुर्छना सावरीली नृ[पेशें]पर्षे ।
म्हणे राघवा सांगतां बुधि नाना
मना नाणिसि सत्वरासी निधाना ॥ ९२ ॥

तरि सर्वदा क्षेम लाभो दिगांती
महासंकटा दुस्तरा लागि जिती ।
सुमंत्रासि बोले रथु सिघ किजे
बहु हेमवस्त्री सीता गौरवीजे ॥ ९३ ॥

पुसे राम सर्वांसि स्नेहें निवाडें
तयाचेपरी वीर सौमित्र कोडें ।
नृपालागि सेउनि साष्टांग पाहे
त्रिवर्गे रथीं बैसलीं थोर मोहें ॥ ९४ ॥

घडघड रथ चाले धावती लोक मागें
दशरथ परिवारें येतस दुखरंगें ।
धिरधिरधिर रामा सर्वहि बोलताति
बहुविध पशुपक्षी जावया सिघ चित्ती ॥ ९५ ॥

रामा अरामाप्रति तुं न जायें
आसी तरी घेवूनि सर्व जायें ।
आधार कोण्ही तुजवीण आम्हा
नाहिच येथें गुणसिंधुधामा ॥ ९६ ॥

रडत सकळ येती जातसे नीर नेत्रीं
उडत रजधुळि ते बैसली सर्व धात्री ।
दशरथनृप बोले वाक्य माझे न मोडीं
क्षणभरि रघुनाथा राहवी स्थीर घोडीं ॥ ९७ ॥

राहें राहें मस्तकी वाक्य राहें
राहें राहें राघवा स्थीर राहें ।

गेलें [गे]गलें सर्वहि सत्व गेलें
  झालें झालें पोरटें राज्य झालें ॥ ९८ ॥

भावीं भावीं रूप तुझोंचि भावीं
  दावीं दावीं येकदा मुख दावीं ।
नाहिं नाहिं राखणें प्राण नाहिं
  पाहिं पाहिं हेचि हे भेटि पाहिं ॥ ९९ ॥

श्रीराममाता फणिजन्मनिहीं
  दुखानळे व्याकुळ व्यस्त देहिं ।
जनामुखीं राघव दिनबंधु
  वना न जावो सुखसारकंदु ॥ १०० ॥

पाहोनि हें सर्वहि रामराजा
  बोले सुमंत्राप्रति वाक्य वोजा ।
लोटिं रथा सत्वर वेग कीजे
  आलस्य आतां सहसा न कीजे ॥ १०१ ॥

घडघड रथ नेटें चालवीला सुमंतें
  दशरथ स्थिर पाहे लक्ष लाउनि तेथें ।
न दिसत मग दृष्टी लोटला दुखरंगीं
  रघुपति निजमाता सावरी ते प्रसंगीं ॥ १०२ ॥

तयानंतरें स्वस्त झाला नरेंद्र
  विलोकी पुरी जेवि गर्जे समुद्र ।
तसी सर्वही शोक अत्यंत गाजे
  अटव्यापरी उपमा तीसी साजे ॥ १०३ ॥

गाळित अश्रु नृप तो सदनासि आला
  टाळित दुख परि तें अनिवार त्याला ।
पाळीत जो रघुपति सकळा जिवातें
  चाळित तो रथहयाप्रति सुतहातें ॥ १०४ ॥

नदी तामसा क्रमिली रात्रि तेथें
  द्वितीये दिनी रम्यगंगातटातें ।
त्वरे पावले सेविलें तोय तीचें
  पुढे लोटलें माप तें शार्वरीचें ॥ १०५ ॥

उपरि जटिल झाले तापसीवेषधारी
  बहुविध सिकवीला सुत नाना प्रकारीं ।
परतत नगरासि रामआज्ञे सुमंत्र
  त्वरित गुहक आणि नाव तो राममित्र ॥ १०६ ॥

बैसोनि नावी परतीर जेथें
  गेले सुखें सत्वर क्षेम तेथें ।
देऊनि आज्ञा मग गुहकासी
  आले रुषी निज आश्रमासि ॥ १०७ ॥

भरद्वाजागेहिं क्रमुनि हरुषें सर्व रजनी
  निरोपेंचि त्याच्या फणिवरासिताराम विजनी ।
पुढे आले दृष्टी बहुविध तरु ते निरखिति
  कुरंगाचि थाटें भयभीत मनीं दुरी पळती ॥१०८॥

तदुपरि मग वस्ती सार्थीली चित्रकूटिं
  तव सचिव सुमंत्रु पावला राजभेटि ।

पुसत नृप तयाला येर वृत्तांत सांगे
न धरत धीर नेटें राव लोटे प्रसंगें ॥ १०९ ॥

श्रीराममाता शरशब्दजाळीं
भेदि नृपा सत्वर तेचि काळीं ।
तो जोडूनि हस्तक पाय वंदी
जैसा नृपा याचक भाट वंदि ॥ ११० ॥

म्हणे श्रेष्ठ कांता अहो प्राणनाथा
करा जी क्षमा मानसीं पुत्रचिंता ।
म्हणोनि तुम्हा बोलिलें तीव्रबोलीं
पुढें सेविती सीघ्र साष्टांग झाली ॥ १११ ॥

वदे राव तो स्वल्प अंन्याय तुझा
न दिसे मनु देतस साक्ष माझा ।
महापाप नेणोनि पुर्वींच केलें
गजा कल्पुनि श्रावणा मारियेलें ॥ ११२ ॥

विनानेत्र त्याचेनियां मायबापें
मला शापिलें थोर संतापकोपें ।
परि वाटलें मानसीं सौख्य तेव्हा
गमें आजि हा प्राण जाईल केव्हां ॥ ११३ ॥

बहु ग्लांति भीकीं ढेळे नीर नेत्रीं
पुढें रामध्यासेंचि तो अर्धरात्रीं ।
मरे उपरि शोक अत्यंत झाला
वसिष्टें पुढें वारिलें त्या स्त्रियांला ॥ ११४ ॥

नृपालागि घालुनियां तैलद्रोणी
पुढें मातुळिंहुनियां पुत्र दोन्हि ।
त्वरें आणवायासि ते दुत धाडी
तयालागी साकल्य सांगोनि वाडी ॥ ११५ ॥

वना राम गेला नृपा मृत्य झाला
न कीजे तुम्ही श्रुत ऐसें तयांला ।
ममाज्ञा कथा क्षेम सर्वांसी गांवि
वसे भेटिचा हेत अत्यंत जीवि ॥ ११६ ॥

तरि अति अविलंबे सीघ्र भेटिसि यांवें
श्रवण करुनि ऐसें दुत गेले स्वभावें ।
मनपवनगतीनें लंघिती पंथ नेटें
भरथ परम देखे स्वप्न अत्यंत खोटें ॥ ११७ ॥

पुढे जाग्रुती शोधितां भाव त्याचा
निवाडा गमे मृत्य रायासि साचा ।
अकस्मात ते आंगणी भृत्य आले
गुरुवाक्य सांगुनिया स्तब्ध ठेले ॥ ११८ ॥

पुसुनि भरत सर्वां आपुल्या पटणासि
क्रमुनि दिवस कांहि पावला सौख्य त्यासि ।
तिळभरि न वटेचि नाडळे रावगेहीं
उपरि त्वरित आला कैकईवस्तिठाईं ॥ ११९ ॥

देखोनि पुत्र नयनी बहु तोष जीविं
दंडापरी भरथ तो जननीसि सेवी ।

ते भेटूनि निजसुताप्रति बोलताहे
कल्याण किं समुळ केकयराज्य आहे ॥ १२० ॥

येरु म्हणे सकळिकांप्रति क्षेमस्वस्ती
तेही दिल्हे बहु मला रथ आणि हस्ती ।
ते घेउनि अनुज सर्वहि येत मार्गें
कोठे असे नृपवरु मजलागि सांगें ॥ १२१ ॥

वदे कैकई जे गति सर्व श्रुतें
पुढें पावती तेच झाली नृपातें ।
पडे जननिवाक्य ऐकोनि भुमी
अहाहा म्हणे भाग्यवर्जित आंम्ही ॥ १२२ ॥

मरणसमय येतां बोलिला राव कैसें
सकळिक मज माते सांग साकल्य ऐसें ।
रघुपति वनवासी कल्पुनि ध्यास त्याचा
नृपवर मग मेला सत्यसंकल्प ज्याचा ॥ १२३ ॥

श्रीराम गेला विपिनासि कां वो
येरी कथी सर्वहि पष्ट भावो ।
ऐकोनि कोपें अतितप्त झाला
धिःकार केला बहुसाल तीला ॥ १२४ ॥

रघुपतिनिजमातेलागि भेटोनि भावें
म्हणत करित असी राज्य नेघे स्वभावें ।
तदुपरि नृपतीचें कर्म ते सांग केलें
दहन विविधदानें जे जसें बोलियेलें ॥ १२५ ॥

पुढें मंथरेलागि शत्रुघ्न ताडि
प्रसंगें इच्या राघवा देशधाडि ।
निवारी तथा श्रेष्ठ चक्रावतारी
वसिष्ठु म्हणे होंय राज्याधिकारी ॥ १२६ ॥

वदत भरत भावें राज्य रामें करावें
सकळिकपरिवारें चित्रकुटासि जावें ।
न भरत पळ पौरा आणितो राघवासि
म्हणउनि मग झाला सिध वेगें चमुसी ॥ १२७ ॥

गुरुमाताबंधुसकळसुहृदेंसीं झडकरी
त्वरे आला गंगेनिकट समुहें चंड गजरी ।
करी आज्ञा भृत्या गुहक समई ते मग असी
न द्यावा रे मार्गु भरत अगुणी फौज सरिसी ॥

जिंकावया राघवप्राणमित्रा
जातो सिरीं वाहुनि राजछत्रा ।
नदी कसी हे तरतील पां हों
युध्यार्थ आम्ही तरि सिध आहों ॥ १२९ ॥

राहा तुम्ही सर्वही वीर येथें
जाइन मी कैकईसुत जेथें ।
पाहीन त्याचि निजवृत्ति ठावी
त्यासारखी बुधी करीन जीवीं ॥ १३० ॥

पुटे भेटला क्षिप्र रामानुजासि
महासत्वलावण्य तो पुण्यरासि ।

या पाहता सौख्य अत्यंत जालें
महाप्रेमसंभाषणें चित धालें ॥ १३१ ॥

जटिल उपरि जाला बंधु त्या राघवाचा
गुहक सकल तारि सैन्यमेळा तयाचा ।
मुनिवर मग जेथें पावले भार तेथें
विनवित रुषि आजी राहिजे थीर येथें ॥ १३२ ॥

भरद्वाजाचिय सुरसवचनें वीर भरतु
सुखें राहे सेनेसहित सुखसिंधुंत तरुतु ।
मुनि देता जाला अगणित सुखालागि सकळां
जना वाटे येथें सहजाचि गमो काळ सरळा ॥

स्वर्गादिभोग नलगे पुरवास तोहि
याहुनि सौख्य न दिसे बहु शोधितांहीं ।
घाऱ्या पुऱ्या घृत सुखें दधि दुग्ध सेउं
स्वर्गांगना निरुपमा रतिसौख्य घेउ ॥ १३४ ॥

रामाप्रति भरथ येथुनि जाईना कां
त्यानंतरें निजपुराप्रति नेइना कां ।
आम्हासि व्यर्थ नलगे रघुनाथभेटी
ऐस्यापरि जन धरी बहु आर्त पोटीं ॥ १३५ ॥

दिनकरउदईं तें सर्वहि सौख्य गेलें
नवल परम भासे स्वप्न तैसेंचि झालें ।
तदुपरी रुषिआज्ञे चालिला रामबंधु
अगणितदळसंगें फुटला जेवि सिंधु ॥ १३६ ॥

रजमय नभ झालें लोपला तीव्ररश्मी
वनचर पळती ते सुटला कंपु भुमी ।
तडकति बहु वाद्ये वाजती शंखभेरी
पणपटह बांके व्योम नादें थरारी ॥ १३७ ॥

येरीकडे राघव लक्ष्मणातें
आज्ञा करी श्वापदथाट येथें ।
येतें पाहा त्यागिति थार पक्षी
आणीं मना वेघुनि उंच वृक्षीं ॥ १३८ ॥

फणिवर मग वृक्षीं सीघ्र वेघोनि पाहे
अगणित गजवाजीभार तो येत आहे ।
भरतसमुह ऐसें जाणतां तप्त झाला
रघुपतिप्रति कोपें बोलिला तिव्र बोला ॥ १३९ ॥

लाहोनि राज्य अवनीश्वरयेकछत्रीं
होउनि येत भरतु दळभार मंत्री ।
घेउनियां मजतुम्हाप्रति हा वधाया
आज्ञा किजे वधिन यासिच देवराया ॥ १४० ॥

निवटुनि दळ सारें चंड चंद्रार्धबाणी
तदुपरि भरताचे छेदितो पादपाणी ।
रघुविर मग बोले आवरीं कोपऊर्मी
भरथ परमसाधु शांत सात्विकधर्मी ॥ १४१ ॥

वधुनि तया कासया राज्य व्हावें
असे तुजला राज्यइछा स्वभावें ।

तरि भ्रातयालागि सांगोनि वेगीं
तुला अर्पितों राज्य तें सर्व भोगीं ॥ १४२ ॥

अैकोनि भूमी फणिनाथ आला
सेउनि रामाप्रति शांत झाला ।
तो पावला कैकईसुत भेटी
आलिंगणी अद्भुत प्रेमदाटी ॥ १४३ ॥

सुहृद सकळ आले भेटले राघवासी
दशरथनृपवार्ता श्रुत केली तयासि ।
रघुपति मग अर्पि पिंड रायासि दुखें
अगणितगुण वानि व्याप्त होउनि शोकें ॥

बहुविध मग प्रार्थि कैकइसुत रामा
सकळिक करि राज्या आपुल्या सौख्यधामा ।
तुजविण मज कांहिं पट्टणी चाड नाहिं
न मानिसि तरि येथें वास्ति साधीन मीहिं ॥

वदे राम तो अैक गा गुणखाणी
प्रतिज्ञेप्रति येंउ नेंदिच हाणी ।
म्हणुनि ऋतु विंशति च्यारी च्यारी
तयाउपरी जाण येईन पौरीं ॥ १४६ ॥

तदुपरि भरतानें घेतली भाक अैसी
समग अचुक येई सीघ्र मागें पुरासिं ।
न करिसि मम ईच्छेलागि संतुष्ट कष्टें
त्यजिन. मग वपुतें सेउनि अग्निकाष्टें ॥ १४७ ॥

पुढे पादुका घेउनि राघवाच्या
निघाला सवें भव्य हारी चमुच्या ।
न जाये पुरा राहिला ग्रामनंदी
अखंडीत त्या पादुकालागि वंदी ॥ १४८ ॥

अत्रीरुषीच्या निजआश्रमासि
येरीकडे राघव सौख्यरासी ।
गेला पुढे होउनि थीर रात्री
त्यानंतरे चालत पद्मनेत्री ॥ १४९ ॥

रघुपतिभजनें हे पावली वृत्ति शांति
अहमतिममता ते दुरि गेली दिगांतिं ।
गुरुरूप कळतांचि माधवीं विघ्न गेलें
दशरथपुरनामें कांड संपूर्ण झालें ॥ १५० ॥

GOVERNMENT ORIENTAL MSS. LIBRARY
17 JUL 1951
TRIPLICANE P.O., MADRAS

॥ अरण्यकाण्ड ॥

नमन गणपतीतें शारदासद्गुरुतें
तदुपरि कवियांते भाविकां श्रोतयांतें ।
निवळ करुनि चित्तें आयका येकपत्तें
दुरित परम जातें येकयेकाक्षरें तें ॥ १ ॥

रघुपति सहसीतालक्ष्मणेंसि निघाला
रुषिजन वनवासि सर्व आनंदवीला ।
हलहल मग जातां लागली मालभोई
तरुवर अतिदाटि जाहली ठाईं ठाईं ॥ २ ॥

सुमित्रासुतासिं वदे रामराजा
बरे रक्षणें जानकीलागि वोजा ।
माहावात आवर्त अद्भुत भासे
बळि श्वापदांचा भये जीव त्रासे ॥ ३ ॥

बोलोनि ऐसें क्रमितां पथाते
तों देखिला राक्षस येक तेथें ।
विराधनामा रुधिराशनी हो
बीभत्सरूपि अतिचंडदेहो ॥ ४ ॥

विकृतवदननेत्री दर्शनी घोर गाढा
रुधिररससुरंगें शाफल्या दंतदाढा ।
निरखुनि नरराजा गर्जिला काळ जैसा
तदुपरि वरि आला लोटला सैल तैसा ॥ ५ ॥

अवचट मग सीता घेउनि स्कंदभागीं
परतुनि विर चाले तीव्र तो हर्षरंगी ।
रघुपति अतिदुखें भाकिता ग्लांति झाला
न धरत फणीनाथा कोप अद्भुत आला ॥ ६ ॥

विरीउपरी वाहिले चंडमेढे
बहु सोडिले बाण नेटें कुऱ्हाडे ।
विराधासि भेदुनि पैलाड गेले
फणीचेपरी भुमिआंगी निवाले ॥ ७ ॥

ठेउनि सीता मग तो बिराधु
प्रेरी शुळ गर्जुनियां अगाधु ।
तो राघवें खंडूनि टाकियेला
त्यानंतरें सन्मुख दैत्य आला ॥ ८ ॥

वाहोनि खांदी उभया विरातें
धावे त्वरे राक्षस कोपचित्तें ।
खंडोनि शस्त्रें कर पाडियेला
तो आठलें पुर्विल ज्ञान त्याला ॥ ९ ॥

गंधर्व जो तुंबर तोचि रामा
मी जाण तुं शापवशें अरामा ।

येऊनिया राक्षसदेह झालों
कृपाळुवें पावन सीघ्र केलें ॥ १० ॥

मला शस्त्रअस्त्रिं कदा मृत्य नाहिं
विधीवाक्य हें सांगतों युक्ति कांहि ।
करा चंडगर्ता तयेमाजि घाला
पुढें प्राण जातील होऊनि गोळा ॥ ११ ॥

करी राम आज्ञा सुमित्रासुतासि
करी वीर सौमित्र तैसें च त्यासी ।
पुढे राक्षसा मुक्ति जाली प्रसंगें
सिता भेटली चालिलीं तीव्र तिघें ॥ १२ ॥

तयानंतरें बाणभंगाश्रमासी
त्वरे पावले भेटले वीर त्यासि ।
निरोपें सुतीक्ष्णाश्रमालागि आले
रुषी अन्य त्याच्या ग्रहा शीघ्र गेले ॥ १३ ॥

दाहा वर्षें लोटतां क्षेमश्वस्ती
पुढें पावले वास जेथें अगस्ती ।
रुषी च्यापबाणासि अर्पुनी बोजे
म्हणे पंचवाटी तुम्ही वास कीजे ॥ १४ ॥

उपरिरुषिनिरोपें क्रमितां पंथ वृक्षी
अचळ अविट ऐसा देखिला गृध्रपक्षी ।
निशिचर म्हणवोनि राम कार्मुक ओढि
विनवि मग जटायु बाण वीरा न सोडिं ॥ १५ ॥

दशरथ नृपनाथु राघवा तात तूझा
परम सुसिळ धर्मि जाण तो मित्र माझा ।
सुखरूप तरि राहा निर्मुनि आश्रमासि
निसीदिन विपिनि मी रक्षतों जानकीसी ॥ १६॥

पुढें सीघ्र गंगातटा राम आला
बटापंचका देखतां तोष झाला ।
तरु दाटले आवळी जांबळीचे
तथा साल जंबीर जो पोफळिचे ॥ १७ ॥

कविठ चंपक आणीक सेवती
कदाळि तिंदुक तित्रिण मालती ।
बकुळ खर्जुर दाडिंम भोंकरी
पळस किंशुक अन्य बहुपरी ॥ १८ ॥

करी रामआज्ञे फणी पत्रकुटि
तयाभोंवती लागली पुष्पदाटी ।
प्रवेष बरी वेळ पाहोनि रामु
सुखें काळ लोटि पुढें सौख्यधामु ॥ १९ ॥

मुनी दर्शनालागि ते नित्य येती
पुन्हा आपुल्या स्वग्रहा सर्व जाती ।
प्रदेसीं तये क्रूर वर्जितशंका
अकस्मात ते पावली सुर्पनखा ॥ २० ॥

नरविर उभयत्तें देखतां भ्रांत झाली
पुसत कवण तुम्हीं राम सांग सुबोली ।

उपरि सहज त्यांते आपुले वृत्त बोले
दशसिरभगिनी मी भक्षितें जीव बोलें ॥ २१ ॥

परि तुज रघुनाथा देखता चित माझें
भ्रमित परमकामें लागलें ध्यान तुझे ।
कृश अति लघुनेत्री कर्कशा त्यागि सीता
करि मजसम पाडें आपुली सीघ्र कांता ॥ २२ ॥

म्हणे राम सीतेसि मी वो न त्यागीं
स्त्रियेवाचुनि दुःख सौमित्र भोगी ।
वरी तुं तया पावसी सौख्य चित्तिं
खरी कल्पुनि चालिली रामनीती ॥ २३ ॥

म्हणे लक्ष्मणा व्यर्थ कां सीणतां हा
प्रिया जोडलें अंगिकारुनि राहा ।
रघुनाथसीतेप्रति भक्षितें मी
पुढें सौख्य भोगुं रतीकर्मकामी ॥ २४ ॥

विनवि फणि तियेतें जाण मी ब्रंम्हचारी
रघुपति लघुजाया होय तुं निर्विच्यारी ।
परिसुनि मग आली राक्षसी राम जेथे
बहुविध करि युक्ती होतसे व्यर्थ तेथें ॥ २५ ॥

पुढे कोपली नायके रामबोलि
सितेलागि भक्षावया सिध झालि ।
फणी धाविला शस्त्र घेउनि जाणा
तियेच्या स्वरें छेदिलें नाककाना ॥ २६ ॥

स्रवत रुधिर गेली सर्व सांगें खरासी
पळुनि त्वरित जाई राक्षसा गर्वरासी ।
बलहिन नर तेहि जाण वैरूप्य केलें
न लजसि मुख तुझें जाहालें सर्व काळें ॥ २७ ॥

वचन कठिण तीचें अैकतां कोप आला
रगडित दशनातें घोर काळाग्नि जाला ।
सबळ दशक च्यारि दैत्य ते धाडियेले
रघुपतिशरघातें देह त्यागुनि गेले ॥ २८ ॥

पुढें जाणुनि मृत्यवृतांत त्यांचा
म्हणे दुषणा मेळ आणि चमुचा ।
रिपुलागि जिंकावया मीचि जातों
प्रतापें रणि प्राण घेउनि येतो ॥ २९ ॥

म्हणोनि रथीं बैसला लागवेगें
चमु चालिली भीम वेष्टुनि संगें ।
असंभाव्य तो वाद्यकल्लोळ फंकें
रजे पिंगटें व्योम आदित्य झांके ॥ ३० ॥

शकुन कठिण त्यातें दाविती मृत्यशंका
वहत खरविरांसी मानवा भ्रांतरंका ।
सहज करील शांति चिन्ह हें निश्चयेंसी
मज अणु भय नाहिं काळ बांधीन फांसी ॥ ३१ ॥

नगर करुनि मार्गें भार अैलाड आले
बनचररुषि नेटें सर्व भेणें पळाले ।

थरथर महि कांपे लोटती वृक्ष कैसे
सुरवरअसुरांते घोर कल्पांत भासे ॥ ३२ ॥

वदे राम बंधुप्रति तो स्वभावें
सितेसी तुवां वीवरी गुप्त व्हावें ।
करे माझिया मृत्य दैत्यासि आहे
म्हणोनि धनुर्बाण दृष्टी न पाहे ॥ ३३ ॥

पुढें सीघ्र सौमित्र तैसाचि गेला
सितेसि महावीवरी गुप्त जाला ।
त्वरे कौच घालोनियां राम आंगीं
विरश्रीबळें च्याप सज्जी प्रसंगीं ॥ ३४ ॥

तुणी अक्षई बांधला सीघ्र पुष्टी
पुढें दैत्य सेना रणी चंड वेष्टी ।
तयानंतरें मार अद्भुत झाला
विरां राक्षसां मृत्य भक्षीत आला ॥ ३५ ॥

कितीयेक ते हाणती शक्तिघातें
किती प्रेरीती शुलपारश्वघाते ।
किति विंधिति बाण नेटें सणाणा
कीति टाकिती सैल हस्तें दणाणा ॥ ३६ ॥

मही व्योम ब्रम्हंड घोषें गडाडी
विरा मानसीं कोप अग्नि तडाडी ।
पुढे राघवें सोडिले बाण कैसे
करी मेघ वृष्टी असंभाव्य तैसें ॥ ३७ ॥

बहुत विर निमाले शेष मागें पळाले
थरथर भय पोटीं रामधाकें गळाले ।
निजदळअपमानें दुषणा कोप आला
वरुषत शरधारीं शीघ्र सन्मुख झाला ॥ ३८ ॥

रघुविर निजबाणें बाण तोडूनि पाडि
वधुनि रथहयातें भीम कार्मुक तोडी ।
भ्रमडानि परिघातें दुषणु हाक फोडि
परम कठिण गर्जे मेघ जैसा घडाडि ॥ ३९ ॥

पुढें राघवें दोनि चंद्रार्धबाणी
रिपू पाडिला खंडूनि हस्त दोन्ही ।
तयापाठिसीं त्रिसिरा सीघ्र आला
बळें हाकितां जाहला राघवाला ॥ ४० ॥

बहु युध्य केलें तया राक्षसानें
रघुनायकें छेदिलें च्यापबाणें ।
रथु भंगिला मारिलें सारथ्यातें
उडे त्रीसिरा मुद्गलाचेनि हातें ॥ ४१ ॥

त्वरे लक्ष साधुनि बाणें नरेंद्रें
सिरे तोडिली रामकाळाग्निरुद्रें ।
रणी त्रीसिरा लागतां मृत्यपंथें
खरें छेदिला योद्धू तो शुळदंतें ॥ ४२ ॥

ढकुलुनि रथ वेगें च्याप वाहोनि कैसा
निकट परम आला अंतकु मृत्य तैसा ।

कर्कर सित वाजे बाण उदंड सोडि
नरविर शरघातें सर्व छेदुनि पाडी ॥ ४३ ॥

पुन्हा वर्षती बाण कोट्यानकोटी
नभीं जाहली ते असंभाव्य दाटी ।
दिशा लोपल्या सुटला कंप भुमी
शरें झांकला तीव्र आदित्य व्योमी ॥ ४४ ॥

बहुसाल संहारल्या पक्षयाति
वनश्वापदालागि नाहींच मीति ।
सिमा सिंधु सांडूनिया येउ पाहे
अहाकार विस्वामुखिं नीघताहे ॥ ४५ ॥

त्रिदश सकळ भ्याले अंतरी ज्यांसि वस्ती
म्हणति सकळ ते हो राघवालागि स्वस्ती ।
निकट वळुनि राहो दैत्य पौलस्ति यासि
मरण त्वरित येवो कंटकी हे जनासि ॥ ४६ ॥

तव खरावीर तेणें कार्य अद्भुत केले
रघुपतिकरिचें तें च्याप छेदुनि नेलें ।
कवच उपरि तेहिं पाडिलें भुमिमार्गी
दशशत शर भेदि लाघवे लागवेगें ॥ ४७ ॥

नखसिखवरि बाणी साधिलि वस्ति रामी
रघुपति अति जाला तीव्र संग्रामभुमि ।
मुनिवर निजच्यापालागि सज्जुनि बाणी
वरुषत मग कोपें स्थीर होउनि ठाणी ॥ ४८ ॥

तिळप्राय केलें रिपुच्या रथातें
बळे मारिले बाणघातें सुतातें ।
तया पाठिसि खंडिले च्याप रामें
शरें त्रासिला शत्रु लावण्यधामें ॥ ४९ ॥

प्रभग्नधन्वाहयसारथिहि
आला भुमि होउनि तप्त देहि ।
टाकी त्वरें झाडूनियां गदेतें
ते छेदिली सायकसप्तघातें ॥ ५० ॥

पुढें पाडिता जाहला वृक्षवृष्टी
करी खंडणी राम लक्षुनि दृष्टी ।
शरें भेदिता जाहला फार कष्टी
वळुनि त्वरें धांविला वज्रमुष्टी ॥ ५१ ॥

पदे सप्तकें जाहला राम मागें
रिपु पाडिला वक्ष भेदुनि वेगें ।
स्वभावे सुखें दाटली सर्व सृष्टी
विमानिहुनी जाहली पुष्पवृष्टी ॥ ५२ ॥

सिता भेटली वीर सौमित्र तोहि
रघुनायका जाहलें सौख्य देहीं ।
कथी शुर्पनखा तया रावणाला
दळेसि बलें बंधु तुझा निमाला ॥ ५३ ॥

कुयुक्ति बहु रावणु बोधवीला
मरीचाश्रमालागि तो सीघ्र आला ।

निवेदी तयालागि साकल्यवार्ता
  मरिची म्हणे जाये लंकेश भ्रांता ॥ ५४ ॥

दशग्रीव बोले ममाज्ञा न मोडीं
  मृगा होउनी राम बाहेरि काढीं ।
तयानंतरें आणितों मी सितेतें
  मना नाणिता मृत्य दावीन तुतें ॥ ५५ ॥

न चाले पुढें यत्न झाला कुरंगु
  खुरी आननी रम्य फांके सुरंगु ।
अकस्मात रामाश्रमालागि आला
  सिता बोलती जाहली राघवाला ॥ ५६ ॥

धरुनिया तें मजलागि द्यावे
  वारी फणी जाणुनियां स्वभावें ।
हा राक्षसु माईक सत्य वाचा
  करील हाणी वदतों त्रिवाचा ॥ ५७ ॥

न मनुनि अनुजाचें वाक्य तें राम गेला
  क्षणभरि मृग भासे मागुती वृक्षवेळा ।
निकट दडूनि राहे राघवा कोप आला
  विधिकरशरदत्तें पातकी भग्न केला ॥ ५८ ॥

हा लक्ष्मणा हा सरसीरुहाक्षी
  बोलोनि ऐसें तनुतें उपेक्षी ।
जाला महाराक्षस भीमदेही
  चिंतार्णवीं राघव मग्न पांहि ॥ ५९ ॥

येरीकडे जानकि देवरासि
  बोले त्वरें सत्वर सौख्यरासी ।
कीजे प्रयाणा रघुनाथसाह्या
  माते बहु पोळति दुखआह्या ॥ ६० ॥

करुणस्वर पतीचा आजी म्या ऐकिला हो
  वसउनि शर च्यापा सीघ्र येथुनि जा हो ।
वदत फणि तियेसीं जो भयालागि हर्ता
  म्हणसि भय तयातें हे गमे चोज वार्ता ॥ ६१ ॥

म्हणे जानकी लक्ष्मणा दुष्ट तुम्हि
  मला इछितां अंतुरि भाव कामी ।
वदे वीर सौमित्र तु माय माझी
  महात्रास की बुधि निष्टुर तुझी ॥ ६२ ॥

पुन्हा बोलिलि उतरे तीव्र सीता
  त्वरें त्यागुनि चालिला रामभ्राता ।
गिरीपादपालागि तो साक्ष ठेवी
  मनामाजि तो दुख अत्यंत भावी ॥ ६३ ॥

येरीकडे ठेउनि गुप्त याना
  झाला येती रावण दुष्ट जाणा ।
शिखि त्रिदंडी धरि छत्र साई
  काषायवस्त्री करि वेदघाई ॥ ६४ ॥

आला सितेसंन्मुख सीघ्र तेथें
  अर्पि सिता आसन रम्य त्यातें ।

पुसे पुढें रावण सर्व तीसी
  येरी कथी सर्वहि वृत त्यासी ॥ ६५ ॥

त्यानंतरें जानकि पुसताहे
  येरु म्हणे रावण मीच पांहें ।
आलों तुला घेउनि जावयासि
  करीन कांता तव मुख्यदासी ॥ ६६ ॥

भयातुर ते जाहली भुमिबाळा
  बहुसाल धिःकारिलें दैत्यपाळा ।
रथिं घातली चालिला अंतरीक्षीं
  पुढे जाहला आडवा गृध्रपक्षी ॥ ६७ ॥

बहुसाल सांगीतली नीति तेणें
  परि रावणा अंतरीं ते न बाणें ।
तयानंतरें माडलें युध्य दोघां
  गिरिसारिखे त्यागिति रक्तवोघा ॥ ६८ ॥

अगणित शरधारा रावणु सिघ्र सोडी
  सबल परम पक्षी पक्षघातोंचि पाडी ।
झडपुनि रथवाजी भंगिलें च्याप चुंचि
  वधुनि सकळ भृत्यां खंडिलें छत्र उंची ॥ ६९ ॥

दशमुख भुमि आला घेवुनि विश्वमाते
  द्विज धिट मग त्यातें ताडिलें सीघ्र लातें ।
न गणुनि कर दाहि खंडिले पक्षराजे
  पुनरपि निघती त्या सर्पदृष्टांत साजें ॥ ७० ॥

धरुं पाहतां तो उडे व्योमउंची
  मुखे तीक्ष्णें देह सर्वत्र लुंची ।
बहुसाल तो रावणु खस्त जाला
  पुढें खड्ग घेउनि हाणे द्विजाला ॥ ७१ ॥

श्रमित रुधिर पक्षी लोटला दैन्यवाणा
  क्रमित गगन सीता घेउनी दैन्यराणा ।
श्रमित सकळ झाले संतसाधु अघाधु
  श्रमित विबुध तेहि पावले फार खेदु ॥ ७२ ॥

रामारामा जानकी बाहताहे
  गेलें गेलें वाम तुझीच पांहें ।
जें जें काहीं लक्ष्मणें बोलियेलें
  तें तें आतां प्रत्ययालागि आलें ॥ ७३ ॥

बहुविध करि ग्लंति अंतरी रामकांती
  तव ऋषिमुख तेथें वीर ते भद्रजाति ।
वनचर बळिथाडे बैसलें पंचलेखा
  त्यजित कनक सीता त्यासि लक्षुनि देखा ॥

त्यानंतरें घेउनि जानकीला
  लंकापुरी रावण सिघ्र गेला ।
ठेवि अशोकीं मग रक्षणासि
  योजी सिते दारुण पापरासी ॥ ७५ ॥

येरीकडे मारुनिया मृगाला
  मागें फिरे राघव लक्ष्मणाला ।

देखे पथी पुसत सर्व त्याला
येरु कथी जानकी तीव्र बोला ॥ ७६ ॥

हाहा म्हणे राघव काये झालें
कां लक्ष्मणा तां गमनासि केलें ।
पाहे ग्रहीं तो न दिसेचि सीता
दुखें दिसे पालट रामाचित्ता ॥ ७७ ॥

सीते सीते वृक्षमात्रासि बाहे
भ्रांताऐसा स्थीर होउनि पाहे ।
लीळा दावि सर्वहि बाह्यरंगें
बंधु सांगें युक्ति बुधिप्रसंगें ॥ ७८ ॥

देखिला विघडला रथ नेत्रीं
पंथ तोचि सरला सुखसुत्रीं ।
कल्पुनि हलहल्ल जंव गेले
गृध्रराज अवनीवरि लोळे ॥ ७९ ॥

पुसुनि सकळ त्यातें दिधालि मुक्ति देवें
उपरि पथिकबंधु जिंकिला तो स्वभावें ।
निजगुजहित सांगे राघवालागि तों हीं
वनचर करि मित्रु सुग्रिउ भीमदेही ॥ ८० ॥

त्यांचेन सीता तुज प्राप्त रामा
बोलोनि गेला निजमोक्षधामा ।
वाक्यें तयाच्या पुढती निघाले
ते भिल्लटीने मग पूजियेले ॥ ८१ ॥

नानाफळें अर्पुनिया रसाळें
गेली परब्रह्मप्रति सीघ्र काळें ।
पंपातिरा राघव येउनियां
दावी सुमित्रा तरु रम्य छाया ॥ ८२ ॥

लाभेल सीता मज निश्चयेसीं
त्यानंतरे पावन मी सुखासी ।
बोले कवी माधव कांड जालें
आरण्यनामें अतिपुण्यमेळें ॥ ८३ ॥

GOVERNMENT ORIENTAL MSS. LIBRARY
17 JUL 1951
TRIPLICANE P.O., MADRAS

॥ किष्किन्धाकाण्ड ॥

श्रीगणाधिपतये नमः

वंदुनिया शिवसुताविधिजागुरुसी
सांगे कवी रघुपतिचरितामृतासि ।
जे ऐकति प्रतिदिनि दृढभावभक्ति
ते पावती मग पुढें अविनाषमुक्ति ॥ १ ॥

पंपातिरीं राघव च्यापपाणी
सीतावियोगें बहु खेद मानि ।
वारी तया लक्ष्मण दीर्घबाहो
त्यागा म्हणें माईक सर्व मोहो ॥ २ ॥

रविसुत कपिनाथु भेटि घेउनि त्याचि
तदुपरि करुं रामा शुधि सर्वै सीतेचि ।
म्हणउनि विर दोघे तेथुनि चालियेले
गजगति हळु येतां सुग्रिवें देखियेले ॥ ३ ॥

म्हणें वाळिनें धाडिले हे प्रतापि
जटी तापसी वेष तो खडच्यापि ।
दिसे सर्व कापटच कृत्रीमभावो
वधाया मला निर्मिला हा उपावो ॥ ४ ॥

म्हणउनि सचिवेंसिं दुरी भेणे पळाला
गिरितरु बहु वेघे धीर पोटीं गळाला ।
समिरसुत तयाचा भाव चित्तासी आणि
निजभये मग सांगें सुग्रिउ रम्यवाणी ॥ ५ ॥

म्हणे मारुती व्यर्थ भीतोसि वांयां
न जाणोनिया युक्तिबुधीउपाया ।
स्वथातीगुणालागि तो दावियेले
धरी धैर्य माझ्या तऱ्हीं धीर बोलें ॥ ६ ॥

शोधितो सकळहीं मन त्याचें
सांगतो तुजप्रति मग साचें ।
राह तुं क्षणभरी स्थिर येथें
जातसें त्वरीत मी नर जेथें ॥ ७ ॥

तयानंतरें जाहला भिक्षुरूपी
पुढें पावला रामरायासमीपिं ।
म्हणे आयका कोण कोठील तुम्ही
कपिसुग्रिवें धाडिलों सख्यकामी ॥ ८ ॥

नव्हें भिक्षु मि वानरु जाण राया
महाकामरूपी स्वइछया नटाया ।
कथी वीर सौमित्र साकल्य त्याला
सितेलागि घेउनि राक्षस गेला ॥ ९ ॥

कबंधे वनीं प्रेरिली कार्यबुधी
कपीसुग्रिवांचेनि लागेल शुधी ।

म्हणोनि तया भेटिचें आर्त आहे
तयानंतरें मारुती बोलताहे ॥ १० ॥

विनाशी मनि सुग्रिउ कष्टताहे
अखंडीत त्या वालिचा धाक वाहे ।
तयानें ग्रहिं घातली बंधुदारा
बरी गांठि दोघासि स्वामी उदारा ॥ ११ ॥

दयाळें वधु सुग्रिवा भेटवीजे
पुरीराज्य तें सर्व मित्रासि दिजे ।
तयानंतरे सोधुनी जानकीतें
पुढें भेटि होइल त्याचेन हातें ॥ १२ ॥

म्हणे राम तों भेटिचा ध्यास जींवी
वसे भेटि आतां चि त्याची करावी ।
प्रभुवाक्य तें मारुती सीघ्र वंदी
पुढें वाहता जाहला त्यास खांदी ॥ १३ ॥

सहज कपि उडाला सुग्रिवानीट आला
तदुपरि उभयांचा स्नेह अत्यंत जाला ।
करुनि शफत आणा मीनले येकरंगी
रघुपति करि सीताशोक तेचि प्रसंगी ॥ १४ ॥

रविसुत मग बोले मारुनि रावणासि
वधु तुज मिळवीतों वाक्य हें निश्चयेंसि ।
परि मज गमताहे तेचि होईल सीता
दशमुखनिजअंकि देखिली विश्वमाता ॥ १५ ॥

रामारामा हेचि वाचेसि बोली
आम्हापासि भुषणें त्यागियेलीं ।
पांहे दृष्टी आपुल्या रामचेंद्रा
अर्पि हातिं आणुनि त्या नरेंद्रा ॥ १६ ॥

ते देखतां राघव शोक मांडी
हाहा स्वरें दारुण स्वास सांडी ।
त्यातें फणी वारित नीतिशब्दें
तो सुग्रिवु दटत दुखखेदें ॥ १७ ॥

म्हणे वाळिनें त्रासिलें फार रामा
नये सांगतां दुख तें मोक्षधामा ।
वदें राम मी सीघ्र मारूनि त्यातें
तुला अर्पितों राज्य आणि स्त्रियेतें ॥ १८ ॥

तरी द्वेष दोघांजणा कोण योगें
प्रतीउत्तरीं सुग्रिउ सर्व सांगें ।
सुखें पट्टणी वास दोघांसि होता
बहु वाळिते आवडे मी सर्वथा ॥ १९ ॥

नवल उपरि जालें क्षोभलें दैव साचें
असुर सबळ आला नाम मायावि त्याचें ।
नगरसमिप रात्रि गार्जिला घोरघोषें
मजसह मग गेला वाळि युध्यासि रोषें ॥ २० ॥

देखोनि आम्हां उभया बिरातें
गेला बिळिं राक्षस भीतचित्तें ।

ठेउनि द्वारी मज रक्षणाला
त्याभीतरी ही कपिनाथ गेला ॥ २१ ॥

पुढें येक संवछर युध्य झाले
बिळद्वारपर्यंत शोणीत आलें ।
मला वाटले पावला मृत्य वालि
सिलेनें बिळा बुजिलें तेचि काळि ॥ २२ ॥

तयानंतरें सर्वहि कर्म केलें
प्रधानि मला राज्य ते अर्पियेलें ।
फिरे वाळि दैत्यासि मारुनि वेगें
बिळिं पावतां मार्गशुधी न लागे ॥ २३ ॥

खुणेनेंचि हाणे सिळेलागि लाता
तयानंतरें होये बाहेरि येता ।
मनी नावरे दुख अत्यंत त्याला
पुरी पावतां भीम कालाग्नि जाला ॥ २४ ॥

मला देखिलें आपुल्या भद्रपीठीं
पुढें भोवयांलागि घालुनि गांठी ।
बहुसाल धिःकारिलें हीनशब्दें
पळालों त्वरें व्याप्त होउनि खेदें ॥ २५ ॥

नगरगिरिकपार्टि घेतली पाठि तेणें
सकळिक अवनि हे देखिलि बंधुभेणें ।
तदुपरि सचिवेंसी जाहलों स्थीर धैर्थे
तुजप्रति निजवैरा दाविलें शब्दपथें ॥ २६ ॥

पुसे राम तां देखिलि दुरी रानें
तुला सोडिलें बे स्थालि कां तयानें।
पुरी शत्रुचि पाहतां दुरी नाही
पुढें बोलतु वीर सुग्रिव पांहिं ॥ २७ ॥

मायावीचा दुंदुभि बंधु रामा
नाहि त्याच्या चंडशक्तिसि सीमा ।
गर्वे जाला भ्रांत अत्यंत देही
दृष्टी नाणी वीर अद्भुत तेहिं ॥ २८ ॥

माहीषरूपी फिरता स्वइछा
तों देखिला सागर सर्पमछा ।
संख्या नसे त्या समरासि बाहे
तो दुंदुभि लक्षुनि बोलताहे ॥ २९ ॥

तुजसम बळ नाहिं सीघ्र येथुनि जाई
सबळ हिमगिरिसीं जाउनि द्वंद्व घेई ।
परिसुनि वचनातें धांविला दैत्य वेगें
गिरिवरसिखरासि पाडिता होय शृंगें ॥ ३० ॥

म्हणे पर्वतु जाण मी दास तुझा
वदे दुंदुभी पुरषी हेत माझा ।
असा सांग तुं थोर संग्राम का जी
गिरी बोलवी साम्य तो वाळि जुंझीं ॥ ३१ ॥

अैकोनि हें वाक्य त्वरें निघाला
किष्किंदपौरा निकटासि आला ।

त्यानंतरें गर्जन घोर केले
नादे खगाचें बहु थाटमेळें ॥ ३२ ॥

जाणोनि त्याचि बहुमाल शक्ती
युध्यर्थ गेला कपि वाड युक्ति ।
घेउनि हस्तें गिरि वृक्ष टाकि
शृंगेचि तो माहिष सर्व झोकि ॥ ३३ ॥

बहु भीडतां भीडतां तो गळाला
कपिलागि आवेष अद्भुत आला ।
धरुनि बळें शृंग त्या आपटीलें
पुढे टाकिलें भोवडूनि इसाळें ॥ ३४ ॥

तयाचें नभी थांविलें रक्त रामा
मतंगु रुषि अर्घ्य लावंण्यधामा ।
स्वभावेंचि देतां पडे रक्त हाति
करी उघडी सीघ्र तो नेत्रपातीं ॥ ३५ ॥

मनि जाणुनि दिधला शाप तेणें
गिरी वेधतां वाळि वेचेल प्राणें ।
असी मात सांगितली वातसुतें
म्हणोनि सुखें साधिली वरित येथें ॥ ३६ ॥

परी अंतरीं सर्वदा धाक याचा
गीरीवृक्ष तोहि गमे वाळि साचा ।
तया जिंकिसी हे नये साक्ष चित्तीं
बहु दुख वाटें करु काय आतां ॥ ३७ ॥

प्रभु दुंदुभीचे मढें चंड पाहा
तयालागि ठेलीं पदें च्याप दाहा ।
पुढे राम लावि पदांगुष्ट त्यातें
दहा गाव गेलें तृणाचे परि तें ॥ ३८ ॥

मनी सुग्रिवा तोष अत्यंत जाला
पुन्हा बोलिला वाक्य त्या राघवाला ।
विनारक्तमांसें तृणप्राय झालें
तया टाकितां चित्त नाहिच धालें ॥ ३९ ॥

कठिण विषमहारी साल हे सप्त भेदिं
तदुपरि अनुजाचि अल्प शंका न बाधी ।
चढउनि निजच्यापा सायेका राम सोडी
निवटूनि तरु सप्ता बाण पाताळ फोडी ॥ ४० ॥

पुनरपि शर आला सीघ्र भातां रिघाला
रविसुत मनि धाला वर्णिता कीर्ति जाला ।
रघुपति मग बोले सीघ्र युध्यासि जाईं
निवटीन अरि तुझा आजी संग्रामठांईं ॥ ४१ ॥

परिसुनि हितवाक्या वीर युध्यासि गेला
न धरत धिर कोपें वाळि बाहेरि आला ।
निरखुनि निजदृष्टी हाणती वज्रमुष्टी
भयभीत जन तेणें सुटला कंप सृष्टि ॥ ४२ ॥

तया लक्षिता जाहला च्यापपाणी
रुपें सारिखें उंच वर्तुळ ठाणी ।

म्हणोनि शरालागि त्या आवरिलें
 विरें सुग्रिवें सीघ्र गंतव्य केलें ॥ ४३ ॥

रणी दाउनि शक्रपुत्रासी पुष्टी
 पळे तांतडी फार होउनि कस्टी ।
पुढें बोलता आहला राघवांसी
 प्रभु सांडि केलि मनि कासयासि ॥ ४४ ॥

वदें राम तो सारखी रुप लीळा
 न दिसे तुम्हा भेद दोघांजणाला ।
अकस्मात बाणें तुला भेदिलियां
 मला निंदिजे सज्जनी मित्रराया ॥ ४५ ॥

म्हणोनि मनी योजिला धीर पांहीं
 पुन्हा मागुति सीघ्र युध्यासि जाई ।
सुमित्रासुता बोलिला राम अैसें
 करी सुग्रिवालागि जाणेन तैसें ॥ ४६ ॥

फणीनाथ सिरिं धरि वाक्य बरें
 गजपुष्पलता मग तोडि त्वरें ।
कपिराजग्रिवेप्रति बांधतसे
 रवीसुत शशीपरी रंम्य दिसे ॥ ४७ ॥

नमंस्कारुनिं रामचंद्रा दयाळा
 पुन्हा वीर सुग्रीव युध्यासि गेला ।
महाभीम गर्जिनला काळ जैसा
 गमें वाळितें मृत्य अदुभुत तैसा ॥ ४८ ॥

अैकोनि त्याची अतिघोर वाणी
 कोपानळें चोळित चंड पाणी ।
तारा तयातें बहु निति सांगे
 त्यागुनि आला समरासि वेगें ॥ ४९ ॥

बोले पुढें लक्षुनि सुग्रिवातें
 हीनाग्रिवा लागसि मृत्यपंथें ।
तो कोप आला बहु साल त्याला
 म्हणे तुझें वाक्य फळेल तुला ॥ ५० ॥

उपरि अनुज दोघे दुरी टाकुनि शंका
 अचळतरुनिघातें ताडिते येकमेकां ।
करकर दशनातें चाउनि वज्रमुष्टी
 प्रहर सबल देती ताउनि भीमदृष्टी ॥ ५१ ॥

बहुसाल तें युध्य अद्भुत जालें
 कपि सुग्रिवालागि प्राणांत आलें ।
पुढे राम तो बाण लक्षुनि सोडी
 मही अंबरीं घोष नेटें कडाडी ॥ ५२ ॥

अवचट शर आला भेदिलें वक्ष तेणें
 पडत सबळ वाळि जिंकिलें दैत्य जाणें ।
श्रवत रुधिर धाई तोय जैसे नदीचें
 अगणित बळ आंगीं वेचले सर्व त्याचे ॥ ५३ ॥

निकट परम त्यातें राम येउनि पाहे
 कपिविर हिनशब्दीं त्यासि धिक्कारिताहे ।

तदुंपरि रघुनाथें सांगतां शास्त्रनीती
म्हणत परम पापी मीचि रामा अनिति ॥ ५४ ॥

पुन्हा राघवें तोषविले तयातें
म्हणे दैव ऐसेंचि होणार होतें ।
प्रसंगी तये पातली सीघ्र तारा
रुदे भग्नं देखोनि दुखें भ्रतारा ॥ ५५ ॥

कदा नवरे शोक त्या सुग्रिवासि
कपी अंगदु मोह बाधि तयासि ।
विवेकेंचि रामें तया शांत केले
बहुसाल त्या अंगदा तोषविलें ॥ ५६ ॥

पुढें दिधला अग्न वाळीस तेहिं
वदे मारुती वीर तो भीमदेही ।
पुरीमाजी येउनि देवाधिदेवें
कपीलागि भद्रासनी बैसवावे ॥ ५७ ॥

रघुपति मग बोले लक्षुनि मारुतीतें
मिळुनि सकळ मंत्रि राज्य द्या सुग्रिवातें ।
कुमर परम साधु अंगदु त्यासि न्या हो
न ढळत युवराज्यीं सर्वहि बैसवा हो ॥ ५८ ॥

मला पट्टणामाजि येणेचि नाहीं
प्रतिज्ञा असे अंतरामाजि कांहीं ।
गिरीसीखरीं साधितों सौख्यवस्ती
शरत्काळ येतांचि यावें समस्तीं ॥ ५९ ॥

प्रभुवाक्य वंदुनियां तेचि वेळे
कपी सर्वहि सव्य घालुनि गेले ।
कपीनायका स्थापिलें भद्रपीठीं
प्रधानत्व त्या अंगदालागि पाठी ॥ ६० ॥

दुति सर्वहीं राघवा जाणविलें
रघुनायका सौख्य अत्यंत जालें ।
गिरीसीखरीं राहिला रामराणा
सितादुख तेणें मनी दैन्यवाणा ॥ ६१ ॥

म्हणे लक्ष्मणा जानकीवीण पांही
मला न स्मरे यामिनि दीन कांही ।
प्रसंगेंचि सौमित्र त्यातें निवारी
सुशब्दें मनांतील ते दुख हारी ॥ ६२ ॥

पुढें जाहला प्राप्त पर्जन्यकाळु
मयुरा गजालागि वाटे सुकाळु ।
भुमी सांडिती मेघ अद्भुत धारा
सुटे कंप तो प्राणिमात्रां थरारा ॥ ६३ ॥

नद्या वाहती कालवे पाट जाति
तळिं फुटलीं त्यासि नाहींच मीति ।
दिसे पाणजंजाळ अद्भुत डोळां
गिरीमस्तकीं वोघ जाति खळाळां ॥ ६४ ॥

प्रसंगेचि तो काळ लोटोनि गेला
शरत्काळ सर्वांप्रति प्राप्त झाला ।

सुमित्राप्रति बोलिजे वाक्य रामें
कपीनाथ तो जाहला मस्त कामें ॥ ६५ ॥

केली प्रतिज्ञा सहसा स्मरी ना
राज्याभिळाषें समता धरीना ।
यालागि त्या बोधुनि सिघ्र आणी
हो जी म्हणे लक्ष्मण बध्धपाणी ॥ ६६ ॥

नमन करुनि रामा पावला पटणासी
वनचर रिस आले सर्व झुंझावयासि ।
चढउनि सित च्यापिं बोढिता कर्कराटें
पळुनि त्वरित गेलीं मर्कटें दाटथाटें ॥ ६७ ॥

तयानंतरें तो पुरीमाजि गेला
कपीनाथ सिंह्यासनी देखियेला ।
तया मद्यपाना नसे शुधि कांहीं
स्त्रिया भोवत्या दिव्य लावण्यदेहीं ॥ ६८ ॥

पुढें लक्ष्मणें थोर धिःकार केला
मनामाजि अत्यंत शंकीत झाला ।
पुढें दोघहि रामभेटि निघालें
कपि मेळवायासि ते भृत्य गेले ॥ ६९ ॥

नमन करि कपेंद्र राघवालागि भावें
बसविंत अतिमानें राम त्याते स्वभावें ।
रघुपति मग बोले आठवीं भाष मित्रा
करुनि त्वरित शुधी भेटवीं पद्मनेत्रा ॥ ७० ॥

प्रतीउत्तरीं बोलता मर्कटेंद्र
मनामाजि संतोषला रामचंद्र ।
प्रसंगी तये व्योम कंपीत जालें
तरुथाट तें वातवेगें उडालें ॥ ७१ ॥

गमें काळ कल्पांत सर्वांसि पोटीं
रजें लोपलें सर्वहि व्योम पाठी ।
बहु खेचरांलागि संव्हार जाला
कपीभार तो भीम अद्भुत आला ॥ ७२ ॥

असंख्यात संख्या तयालागि नाही
गिरीमंदरासारिखे दीर्घदेही ।
चपेटें बळे फोडिती सैलशृंगें
बहुता परीची बहुवर्ण आंगे ॥ ७३ ॥

पुढे वीर सुग्रीव तो हात जोडी
म्हणे राघवा यांसि शुधिसि धाडिं ।
वदे राम आज्ञापिजे तांचि मित्रा
पुढें सुग्रिव न्याहळी वीरछत्रा ॥ ७४ ॥

कपीवीनतालागि पुर्वेसि धाडी
प्रतीचीदिशा ते सुखेणासि जोडी ।
कपीभार ते घेउनि वीर गेले
सीतेलागि शोधीत वेगें निघाले ॥ ७५ ॥

शतबली कपि नामा उत्तरे पाठवीला
पवनसुत दळेसिं दक्षिणे योजियेला ।

रघुपति निजमुद्रा मारुतिलागिं अर्पी
निरवित मग त्यातें जानकि हे समर्पी ॥ ७६ ॥

तो चालिला वंदुनि वाक्य मांथां
पक्ष द्वई आवधी त्या समस्तां ।
येरीकडे शोधुनि सर्व भुमी
आले कपि सर्वहि काळनेमीं ॥ ७७ ॥

रघुविर मग बोले मास होउनि गेला
सकळिक कपि आले शुधि ठावी न याला ।
रविसुत वदताहे मारुति पुर्णबुधी
करिल अवनिचेचि सत्य नेमस्त शुधी ॥ ७८ ॥

ऐकोनि रामा बहु तोष चित्तिं
तो दक्षिणे शोधित वीर जाति ।
घेती गीरी कानन सर्व फेरी
घोषे तयाच्या अवनी थरारी ॥ ७९ ॥

पुढे पाहता देखिला दैत्य गाढा
महाभीम विक्राळ त्यां दंतदाढा ।
तळे मारिला अंगदें भग्न केला
कपीलागि अत्यंत आनंद झाला ॥ ८० ॥

क्षुधा लागली सर्वहि श्रांत झालें
अकस्मात ते वीवरामाजि गेलें ।
फळे तोय सेउनि संपूर्ण धाले
न दिसे पुढें मार्ग चकीत ठेले ॥ ८१ ॥

स्वयंप्रभा बोलत नेत्र झांका
त्यागा तुम्ही बाधक घोर शंका ।
त्यानंतरें झांकिति नेत्र हातें
ते पाववाले मग स्वस्थळाते ॥ ८२ ॥

कपी बोलती मास लोटुनि गेला
पुढे पाहिजे कोणता येत्न केला ।
फिरावें तरि मृत्य सर्वांसि भासे
तरी त्यागिजे देह प्रायोपवेशें ॥ ८३ ॥

पुढें सर्व सिंधुतिरालागि आले
तळिं दर्भ घालुनि वर्ते निजेले ।
गिरीमस्तकीं गृध्र अद्भुत होता
भुमि येतसे आदरें भक्षणार्था ॥ ८४ ॥

कपि बोलती धन्य पक्षी जटायो
सुखें रामकार्जि विसर्जुनि देहो ।
पुढे पावला मुक्ति सायोज्यतेतें
अम्हालागि हा मांडला मृत्य येथे ॥ ८५ ॥

असी मात संपातिया श्रुत जाली
पुसे वानरांलागि कारुण्यबोलिं ।
जटायु सखा धाकुटा बंधु माझा
कथा सर्व साकल्य वृतांत वोजा ॥ ८६ ॥

तुम्ही कासया पावतां मृत्य आतां
कपी सांगति सर्व त्यातें वृतांता ।

तयाचि येथातथ्य ऐकोनि वाणी
　　मनि मानिता जाहला थोर हाणी ॥ ८७ ॥

पुढें आपुला सर्व वृतांत सांगे
　　म्हणे रावणु शत्रु माझा निजांगें ।
सिता रक्षिलि त्रिकुटामाजि तेणें
　　अशोकि असें शोध घ्या हो उडाणें ॥ ८८ ॥

प्रसंगेचि तो सागरी स्नान सारी
　　करी तर्पणा न्यायनीतिप्रकारी ।
नवीं आम्रपत्रें विराजीत तैसे
　　पुढें फुटले कोवळे पक्ष कैसे ॥ ८९ ॥

स्वईछा पुटे तो खमार्गेंचि गेला
　　पुसे अंगदु सर्वहि वानरांला ।
सिताशुधि आणावया शक्ति ज्यासि
　　तयाने त्वरें लंघिजे तोयरासी ॥ ९० ॥

कपि सांगति सर्वहि शक्ति त्यातें
　　गमे कार्यहानी मनी अंगदातें ।
विधीसुत तो मारुतीलागि वर्णी
　　तयाचि कथा कीर्ति घालित कर्णी ॥ ९१ ॥

बहुस्तुति ऐकुनि आवेष आला
　　समुद्रासि लंघावया सिध जाला ।
गिरी मंद्र त्या मस्तकी पाव घाली
　　भये श्वापदें दुरिदेसी पळाली ॥ ९२ ॥

दिसे सर्वभुमीप्रति केत जैसा
　　माहा काळविक्राळ अद्भुत तैसा ।
फणिचेपरी चंड लांगुळ भारीं
　　बळें हाणतां भुमि नेटे थरारी ॥ ९३ ॥

तथा पाहतां वानरां सौख्य झालें
　　म्हणे माधव कांड संपुनि गेलें ।
कपि सुग्रिवालांगि वास्तव्य पौरीं
　　तिचे नाम कांडासि या निर्विचारीं ॥ ९४ ॥

GO… TAL MSS. LIBRARY
TRIPLICANE P.O., MADRAS
JUL 1951

॥ सुन्दरकाण्ड ॥

श्रीगणेशाय नमः ॥

नमु विघ्नराजा नमु शारदेसी
नमु सद्गुरुसंतसाधुजनासि ।
कथा रंम्य रामायणीचा प्रवाहो
पुढें चालिला तो कसा आयका हो ॥ १ ॥

अढळ गिरिमहेंद्रीं मारुती रुढ होता
तदुपरि मग व्योमी होय उडाण घेता ।
वनचरपदभारें सैळ भुमींत गेला
सुरनरअसुरांतें विस्मयो प्राप्त जाला ॥ २ ॥

खगपतिगति मांगें घालुनि जात आहे
नगपति तंव ठाके आडवा त्यास पांहे ।
जगपतिदुत वक्षें सीघ्र ताडूनि गेला
धिगिधिगि करी दुखा पात्रि मैनाक झाला ॥ ३ ॥

तयालागि आश्वासुनि तिव्र जातां
पुढें मांर्ग रोधी बळें नागमाता ।
तियेलागि रक्षोनियां कर्णदारें
निघे मारुंति गर्जतु भुभुकारें ॥ ४ ॥

नभी तोषले देव पाहुनि दृष्टी
असंभाव्य केली वरी पुष्पवृष्टी ।
पुन्हा कार्मितां मार्ग तो अंतराळिं
गिळि सिंह्यका भीम घ्याया विषाळी ॥ ५ ॥

न जावे पुढें जाहला स्तब्ध तेथें
जळि पाहतां देखिले राक्षसीतें ।
प्रवेषोनि पोटि नखें नाष केला
कपी अस्तसुर्यांपरि तांम्र झाला ॥ ६ ॥

पुढें जात जातां निवारुनि शंका
अकस्मात ते देखिली दिव्य लंका ।
पताकाध्वजीं रम्य जे चित्रमाळि
बहुकिंकिणिहार उंची उमाळी ॥ ७ ॥

बहु वाजति जेगटें शंखभेरी
दमामे कहाळा बुरंगें नफेरी ।
बहु सोडिती यंत्रगोळे धडाडां
गिरीकाननी घोष वाजे घडाडां ॥ ८ ॥

लोहोआर्गळा फीरती दैत्य कैसे
महाभीम विक्राळ ते मृत्य तैसे ।
करी खेटकें घ्यावया शस्त्रवोढा
मुखी तीख्टा शुभ्र अत्यंत दाढा ॥ ९ ॥

हयगजरथदाटि सर्वदा सर्व वाटे
झडकरि अति आया मार्ग कोण्हा न फुटे ।

निरखुनि निजनेत्रीं मारुति स्थीर जाला
क्षणभरि मग चित्ती विस्मयो थोर केला ॥ १० ॥

पुढें जावयालागि तो पाव घालि
अकस्मात लंका महाशक्ति आलि ।
बहुसाल धिःकारिले मारुतीला
तियेलागि जिंकोनि पौरांत गेला ॥ ११ ॥

बिलाळापरि देह संकोचवीलें
करी जानकीशुधि आनंदमेळें ।
किति येककर्णि किति लंबचर्णी
किति दीर्घहस्ती किती श्वेतवर्णी ॥ १२ ॥

किति चंडपोटे किति हस्तथोंटे
किति तांम्रझोंटे किति लंबवोंटे ।
बहुतापरीचे बहु वीर सैरा
बहु झाडिति तोमरें शस्त्रधारा ॥ १३ ॥

जटिल बहुत मुंडी स्नान सारुनि जाती
कलश उदक झारि आणि ते दर्भ हातिं ।
घणघणघण घंटा येक ते वाजवीती
उजळुनि दिप देवालागि नैवेद्य देती ॥ १४ ॥

असों सांगतां हे कदां पुरवेना
कथासार पाल्हाळ त्यागुनि नाना ।
करी मारुती जानकिचि तपासी
परी शुधि कोठें न लागे तयासी ॥ १५ ॥

ग्रहें शोधिलि मुख्य त्या राक्षसांचि
ग्रहें शोधिलिं पुत्रमंत्रीजनाचिं ।
बिदि हाट बाजार पुर्वींच तेणें
बरे शोधिले दिर्घबुधिसुज्ञाणें ॥ १६ ॥

तदुपरि कपि गेला रावणाच्या सभेसि
निजजनसमुदाई शोभतु गर्वरासी ।
अगणित दिवठ्यांचें तेज अद्भुत फांकें
बहुविध बहुवाद्ये वाजतां व्योम झांके ॥ १७ ॥

उभा मारुति दुरि पाहे निवाडें
न दीसे सीता मानसीं थोर कोडें ।
पुढे सीघ्र अंतःपुरामाजि गेला
ग्रहें शोधितां शोधितां खिन्न जाला ॥ १८ ॥

बहुसाल ते रात्रि लोटूनि गेली
रुपें रंम्य मंडोदरी देखियेली ।
नव्हे कि सिता जानकि विश्वमाता
नव्हे वश्य ते रावणा रामकांता ॥ १९ ॥

असा निश्चयो अंतरामाजि केला
विमानावरि क्षेप घालुनि गेला ।
करी फार चिंता करु काय आतां
न दिसे सिता लागणें कोण पंथा ॥ २० ॥

संपातीचे वाक्य तें आठवीलें
तेणें चित्ति सौख्य उत्पन्न जालें ।

नाहि जेथें ठाव शोकासि कांहीं
  गेला तेथें मारुती सीघ्र पांहिं ॥ २१ ॥

तरु आवळि जांबळि नारिकेळि
  तरु तिंत्रिणि खर्जुरी रम्य वोळि ।
तरु कर्दळि पोफळि रम्यजाति
  बहुसाल विश्रांति तात्काळ देती ॥ २२ ॥

तरु शिंशुपाच्या तळि भूमिबाळा
  कपिनायकें देखिलि दिव्य डोळा ।
बहु राक्षसि भोंवता भीम पाळा
  महाकर्कशा चंडदेही कराळा ॥ २३ ॥

सिताभेटि घ्यावया कपि सिध झाला
  अकस्मात तो रावणु सीघ्र आला ।
बहु प्रार्थुनि जानकीलागि पाहे
  नव्हे वश्य कांहिं ग्रहालागि जाये ॥ २४ ॥

तयानंतरें राक्षसी जानकीला
  बहु त्रासिति राजआज्ञे तयांला ।
पुढे त्रीजटा स्वप्नवृतांत सांगे
  जयो राघवा गांजिता ईसि कां गें ॥ २५ ॥

क्षयो सर्व होईल लंकापातिचा
  घडे राज्य बीभीषणा सत्य वाचा ।
तियेचि असी ऐकता घोर वाणी
  निजेल्या भूमि राक्षसी पापखाणी ॥ २६ ॥

पतिलागि कल्पुनिया भूमिबाळि
  पुढे प्राण त्यागावया सिध जालि ।
स्मरोनि मनि मारुती राममुर्ति
  मुखे वर्णीता जाहला रामकीर्ति ॥ २७ ॥

प्रसंगि सिता भेटि त्याची अपेक्षी
  कपी भेटला मागुती त्या उपेक्षि ।
खुणा सांगता तोष अत्यंत जाला
  सुखाचे नदी पुर अद्भुत आला ॥ २८ ॥

बहुपरि मग मुद्रा अर्पीली भीमराजें
  निजहित गुज सांगे जानकि सौख्यभोजें ।
रघुपति कधिं येती वाटते थोर खंती
  दिवस कठिण जाती सर्वदा दुःख चित्तिं ॥ २९ ॥

म्हणे मारुती सीणसी कां शुभांगी
  त्वरे बैस तुं माझिये पृष्टिभागिं ।
उडाणेंचि लंघुनिया वो समुद्रा
  तुला दावितों सीघ्र त्या रामचंद्रा ॥ ३० ॥

वदत नवल सीता कीटकातुल्य तु रें
  झडकरी मज नेसी थोर कौतुक बा रे ।
वनचर निजयाती दाविली बुधि मातें
  कपिविर मग बोलें शक्ति दावीन तुतें ॥ ३१ ॥

म्हणउनि मग वाढे मेरु मंदार तैसा
  विकट दशन दाढा बोलतु भीम कैसा ।

करीन त्रिकुट चेंडू बापुडिं दैत्यसंबें
निवटिन तळघातें मश्यकातुल्य वेगें ॥ ३२ ॥

म्हणे जानकी विक्रमु वाड तुझा
परी जाण भंगेल तो नेम माझा ।
परा सीवता हाणि पातिव्रतासी
बले आणिलें रावणें ये पुरीसीं ॥ ३३ ॥

तरी पुर्वदेहापरी सान होयिं
कपी जाहला सीघ्र तैसाचि पांहीं ।
मणी देउनि त्याप्रति खुण सांगे
म्हणे राम घेउनि ये लागवेगे ॥ ३४ ॥

वदे मारुति सत्य संकल्प माझा
कपिसी त्वरें आणितों रामराजा ।
यदर्थीं कदा संशयो तो नसों दे
बहु काल हा स्नेह आतां असों दे ॥ ३५ ॥

म्हणउनि कपि तीतें सव्य घालुनि वेगें
करुनि नमन चाले राममेटिसि मार्गें ।
तवं मति उदयातें पावली अन्य कांहीं
रिपुबळ रघुनाथें पुसिल्या वाक्य नाहिं ॥ ३६ ॥

म्हणोनि तयांसि बळें युध्य किजे
कळीमुळ त्या पाहता होचि बोजें ।
अशोकाप्रती भग्न आधिं करावें
म्हणोनि कपि धांविला तो स्वभावें ॥ ३७ ॥

महाअंगवाते तरु भग्न जाले
किति मोडिले दुरि पक्षी उडाले ।
प्रसंगी तये घोष अद्भुत झाला
पुढें राक्षसी जागृती काळ आला ॥ ३८ ॥

भयाभीत गेल्या दशग्रीव जेथें
तया सांगती वानरें काननातें ।
बळें भग्न केलें विना येक वृक्षु
असें अैकता कोपला वीसचक्षु ॥ ३९ ॥

पुढे किंकरांलागि युध्यासि धाडि
तया मानसीं क्रोध अग्नि भडाडि ।
अशोकाप्रति सीघ्र धांवोनि आले
कपीनायकें भीडतां भग्न केले ॥ ४० ॥

महाचैत्यप्रासादहि मोडियेला
समाचार रायासि तात्काळ गेला ।
तयानंतरें धाडिला जंबुमाळि
दिशा दाटल्या त्याचिया बाणजाळि ॥ ४१ ॥

बहु त्रासिलें मारुतिलागि तेणें
पुढें वानरें घेतलें त्यासि प्राणें ।
तयानंतरें सप्त मंत्रीसुतातें
दशग्रीव धाडी वना कोपचित्तें ॥ ४२ ॥

असंभाव्य बाणें पुढें येक घाई
बिरा मस्तकी रम्य ते छत्रसाइ ।

महा शब्द माता ग्रहीं त्या करीती
उतावेळ ते भार युध्यासि जाति ॥ ४३ ॥

गिरिसीखरीं गाळिती मेघ धारा
तयाचेपरि बाणजाळे सरारां ।
बहु सोडिती कोप भीमासि आला
विरे वीर तो सर्वहि शांत केला ॥ ४४ ॥

दुती सांगतां कोपला गर्वरासी
पुढे पाठवी पंचसेनापतिसी ।
रणी भीडतां काळ विन्मुख झाला
तयापाठिसी अक्षया सीघ्र आला ॥ ४५ ॥

महाघोर संधान त्या अक्षयाचें
बळिशुळबाणें कपीदेह खोंचे ।
त्वरें मारतें भग्न केले रथातें
सळे मोडिलें च्याप घेउनि हातें ॥ ४६ ॥

पुढें अक्षया धांविला खद्गमुष्टी
कपीनायकें लक्ष साधुनि दृष्टी ।
पदीं हस्त घालुनि तो आक्रमीला
भुमी हाणतां देह त्यागुनि गेला ॥ ४७ ॥

दशग्रीव ऐकोनिया पुत्रवार्ता
म्हणे जाय युध्यासि तुं इंद्रजिता ।
गळां बाधुनि मर्कटालागि आणि
नीचे रावणी सीघ्र जोडुनि पाणी ॥ ४८ ॥

रथि बैसला लागल्या शंखभेरी
दळेंसीं बाना भीमकार्मुकधारि ।
त्वरें पावला मांडलें युध्य दोघां
बळे गर्जती तुछ्य मानुनि मेघा ॥ ४९ ॥

बहुसाल ते रावणी बाण सोडि
कपी सर्वहि वृक्षघातेंचि पाडी ।
न फावे कदा संधि दोघांजणासी
बळें तुकितां साम्य ते सत्वरासी ॥ ५० ॥

पुढें रावणी ब्रम्हअस्त्रासि प्रेरी
तयामाजि तो बध्द जाला वनारी ।
निघे त्यासि घेउनिया दैत्यमेळा
बहु ताडिति आयुधें वेळवेळां ॥ ५१ ॥

कपिआंगिचें राम तेहिं न भंगे
सभामंडपा पावले लागवेगें ।
म्हणे रावणु बुधिवंता प्रहस्ता
विचारी कपीलागी वृतांत आतां ॥ ५२ ॥

प्रहस्तु म्हणे लक्षुनि मारुतितें
तुला यावया काय तें कार्य येथें ।
तयाचि मनि तुछ्य मानुनि गोष्टी
वदे वीर रायासि लक्षुनि दृष्टी ॥ ५३ ॥

तुझे भेटिचें आर्त अत्यंत होतें
तयाअन्वये भंगिलें म्या वनातें ।

पुढें भार अद्‌भुत युध्यासि आले
तनु राक्षितां ते रणी भग्न जाले ॥ ५४ ॥

यदर्थी नसे स्वल्प अन्याय माझा
कपीनाथ सुग्रिव जो मित्र तुझा ।
तयाने तुला अर्पिली शब्दमाळा
कसी ते तरी सोडि तु सुमित्राळा ॥ ५५ ॥

सिता रक्षिता सौख्य होणार नाहीं
रणी मृत्य सर्वासि येईल पांहीं ।
कपि धुंडिति लक्ष कोट्यानकोटी
प्रभु सांगतों मानि हे वाक्य पोटीं ॥ ५६ ॥

तव दळ निवटाया शक्ति अद्‌भुत आंगी
सहजाचि मज आहे रामआज्ञा न भंगी ।
वचन कठिण ऐसें ऐकता रावणाला
न धरत निजचित्ती कोप अद्‌भुत आला ॥ ५७ ।

दुतांलागि बोले म्हणे वानरातें
करा रें तिळप्राय या मर्कटातें ।
म्हणे वीर बिभीषणु हें न कीजे
प्रभुवार्तिकालागि वैरूप्य किंजे ॥ ५८ ॥

तयाच्या निति राव संतुष्ट झाला
म्हणे पुछ जाळुनि बाहेरि घाला ।
पुढे राक्षसिं आणिलिं वस्त्रदिंडें
जुनी शुभ्र कार्पास अन्यें उदंडे । ५९ ॥

सभ्रुळि बळें पुछ तें वेष्टीयेलें
असंभाव्य तैलें चि तें भीजवीलें ।
तयानंतरें लाविला वन्हि वेगें
उडाला कपी वाड आकाषमार्गें ॥ ६० ॥

पुढे जाळिता जाहला पटणासी
पळाया नसे ठाव माहाविरांसि ।
प्रसंगी तयें वात साह्यासि आला
पुरीमाजि तो अग्नि उदंड झाला ॥ ६१ ॥

रूपें हीरवे पीवळे ज्वाळ काळे
सरारां ग्रही झोंबति येकवेळें ।
असंभाव्य तो धुम्र उत्पन्न जाला
बधुलेंकरां मृत्य संनीध आला ॥ ६२ ॥

बिदि मोकळ्या टोणपे धाव घेति
करी मारुती सीघ्र त्यांचिच शांति ।
जळाले बहु वीर ते विक्रमाचें
बहु वेवसाई बहुता धनाचे ॥ ६३ ॥

हाहाकार जाला बहु लोक मेला
नसे मिति कांहींच पश्वादिकांला ।
बहुसाल तें उष्ट्रें दग्ध जालिं
गजाचि शतें प्रेत होउनि ठेलीं ॥ ६४ ॥

असंभाव्य वाजी तथा चित्रशाळा
बहु गोमट्या उंच माड्या विशाळा ।

बळें पावकें सर्वहि दग्ध केल्या
तटाकें नद्या सर्व आटोनि गेल्या ॥ ६५ ॥

कडाडां भुमी लोटति दुर्गपौळि
कडाडा उठे शब्द तो अंतराळि ।
हवाया नळे धांवती व्योमपंथें
महावीर ते सेविती स्वस्तीर्थें ॥ ६६ ॥

पुरीमाजि तो लोळ कलोळ गाजें
घडीनें घडि घोष अद्भुत माजे ।
तया पावका तृप्ति अत्यंत जालि
कपी सागरीं पुच्छ नेऊनि घालि ॥ ६७ ॥

तया उपरी वाटली थोर चिंता
कसी काय नेणो सितेचि अवस्ता ।
नभी बोलति देव संतोषवार्ता
जळाली पुरी क्षेम कल्याण सीता ॥ ६८ ॥

कळोनि असें मारुति तुष्ट जाला
सितेलागि भेटोनि वेगें उडाला ।
त्वरें सिंधु लंघुनि अैलाड आला
असे जानकी क्षेम सांगे कपीला ॥ ६९ ॥

प्रसंगेचि ते शुधिवार्ता निरोपी
पुढे सर्वहि रामरायासमिपीं ।
त्वरें जावया व्योमपंथें उडाले
मधु सुग्रिवाच्या वनालागि आले ॥ ७० ॥

फळें सेविलीं रम्य नानारसाळें
तयानंतरें सीघ्र आनंदमेळें ।
रघुनायका भेटले पुर्णभावें
सुखें सेविते जाहले ते स्वभावे ॥ ७१ ॥

वदे मारुति सव्य होवोनि बाहो
असे जानकी स्वस्त लावण्यदेहो ।
त्रिकुटिं वनी रक्षिलि रावणानें
स्वयें म्याचि ते देखिली पुर्वपुण्यें ॥ ७२ ॥

खुणा सांगतां तोषला रामराणा
समाप्तीसि हें पावलें कांड जाणा ।
असे चांगले नाम याचे स्वभावें
वदे माधव आदरें भक्तिभावें ॥ ७३ ॥

GOVERNMENT ... LIBRARY
17 JUL 1951
TRIPLICANE P.O., MADRAS

॥ युद्धकाण्ड ॥

गजमुख गणराजा आणि हंसासनेसि
प्रणमित कवि भावें सद्गुरुस्वामियासि ।
दुरितहर कथेतें चित्त देवोत श्रोते
रुषिमुख गिरि तेथें रामसौमित्र होतें ॥ १ ॥

समिरसुतकपेंद्रें शोधिली विश्वमाता
रघुपतिप्रति सांगे क्षेमकल्याण सीता ।
वचन सुरस त्याचें ऐकतां तोष जाला
रविसुत कपिमत्तें दक्षणे चालियेला ॥ २ ॥

तदुपरि हनुमंते वाहिलें राघवासी
सुरपतिसुतपुत्रें वीर सौमित्र त्यासी ।
अगणित कपिसेना धांवती भार कैसे
परमप्रळयकाळिं अंबरी मेघ जैसे ॥ ३ ॥

पदरज नभ तेणें दाटलें सुर्यरश्मी
न दिसत कवणातें सुटला कंप भुमी ।
वनचर निजहस्तें झेलिति शैलभेटें
कडकडकड शब्दें भंगिती वृक्षथाटें ॥ ४ ॥

विनोदें बहु कर्मिला मार्ग वेगें
गिरिसंह्यमैळासि घालुनि मागें ।
समुद्रातिरालागि ते भार आले
कपि सिंधु देखोनि विस्मीत जाले ॥ ५ ॥

निळे सर्वसैन्याप्रति स्थीर केलें
पुढें आयका काय लंकेत झालें ।
तया रावणा मानसीं थोर चिंता
सभे बैसला मेळउनि समस्तां ॥ ६ ॥

म्हणे शुधि केलि कपिबुधिमंतें
दळेसि पुढें राम येईल येथें ।
तरि पुसतों संषयालागि त्यागा
विचारुनि मातें बरा मंत्र सांगा ॥ ७ ॥

प्रभु युक्ति ऐकोनि सारांष बोला
सुता मंत्रियां थोर आवेश आला ।
सभे सभ्य तोलोनियां शस्त्रपाणि
पुढे बोलते जाहले घोर वाणी ॥ ८ ॥

नव्हे भीडतां प्राप्त देवांसि लंका
नरावानराचि तुरि काय शंका ।
बळे लंघिति सिंधु हे तो घडेना
रणी युध्यसंमंध त्यांसी पडेना ॥ ९ ॥

करुनि बहु प्रयुक्ती लंघिल्या सागरातें
न भरत पळ आम्ही दाखउ मृत्य त्यांतें ।

प्रभुबधुअधिकारा जानकीलागि दीजें
वनचर हिन त्यांची व्यर्थ चिंता न कीजे ॥ १० ॥

सचिवसुरसबोली ऐकतां सौख्यरंगें
दशमुख मग त्यातें शापवृतांत सांगे ।
न धरत धिर आला कोप बीभीषणाला
सहसुतसचिवेंसि राव धिःकारियेला ॥ ११ ॥

सिता नेदितां सर्वहि रामबाणी
तनु तीव्र त्यागाल हे सत्यवाणी ।
तया बोलता कोपला गर्वराशी
पुढे घालिता होय बाहेरि त्यासी ॥ १२ ॥

घेउनिया तो निजमंत्रियातें
आला त्वरें वानरसैन्य जेथें ।
युध्याप्रती मर्कट सिध झाले
तो राक्षसु मंजुळ वाक्य बोले ॥ १३ ॥

म्हणे हो कपी दास मी राघवाचा
तरि भेटवा राम आत्मा जगाचा ।
कथी वीर सुग्रिव त्या रामचेंद्रा
कृपा फार आलि कृपेच्या समुद्रा ॥ १४ ॥

विचारुनियाँ मारुतिचेनि मतें
सभे आणिलें सीघ्र बीभीषणातें ।
मिठि घालिता जाहला रामपांई
म्हणे माझिया पार सौख्यासि नाहिं ॥ १५ ॥

पुढें सीघ्र आळंगिता राम जाला
सभे मान देवोनियां बैसविला ।
पुसे उपरि मंत्र सिंधु तराया
वदे राक्षसु प्रार्थिजे यासि राया ॥ १६ ॥

यथातथ्य मानुनियां वाक्य रामु
निजे रम्यदर्भासनि पुर्णकामु ।
दुते शार्दूळें सर्वहि देखियेलें
त्वरें जाउनि रावणा जाणवीलें ॥ १७ ॥

वदे लंकनाथु शुकालागि बोजें
नरावानरांते तुवा भेद किजे ।
प्रभुवाक्य वंदुनि वेगें उडाला
कपीभार तेथें नभी स्थीर जाला ॥ १८ ॥

म्हणे आयका मर्कटें हो समस्तें
तुम्हा नीति सांगीतलि बीसहस्तें ।
सिताअन्वयें द्वेष रामासि आम्हा
यदर्थिं नसे सर्वथा चाड तुम्हा ॥ १९ ॥

फिरारे तरी सीघ्र मानुनि वाणी
न जातां रणी मृत्य पावाल वाणी ।
कपी दुष्ट ऐकोनिया वाक्यबोळि
तया घालिते जाहळे पाषजाळिं ॥ २० ॥

येरीकडे राघव दीनबंधु
प्रार्थी फळें त्यागुनि तोयसिंधु ।

तो लोटली दुस्तर तिनि रात्रें
कोपानळें राघव तप्तगात्रें ॥ २१ ॥

म्हणे लक्ष्मणा आइकें बंधुराया
बहु प्रार्थीतां सागरु हा उपाया ।
कदा नायके गर्जतो घोरघोषें
तरि जाळितों यासि बाणें हुताषें ॥ २२ ॥

म्हणोनि करें वाइला चंडमेढा
करारा मुखीं चाविल्या दंतदाढा ।
असंभाव्य आरंभिली बाणवृष्टी
गमे सर्व लोकासि कल्पांत सृष्टी ॥ २३ ॥

बहु तापला सिंधु नेटें तडाडि
सिजे अन्न तोयेंचि तैसा कडाडि ।
पुढें ब्रह्मअस्त्रासी तो राम काढि
भयें सीघ्र येउनियां हात जोडि ॥ २४ ॥

म्हणे राघवा जाहली चुकि मोटि
करावी क्षमा शांति रक्षुनि मोटि ।
स्वभाविक हा गुण ऐसाचि माझा
भयें व्यापलों बाण देखोनि तुझा ॥ २५ ॥

वदे रामराजा नव्हे बाण मागें
विचारुनियां सिघ्र तु ठाव सांगे ।
स्थळ दाखवि सिंधु तेणे चि मार्गे
रघुनायकें सोडिला बाण वेगें ॥ २६ ॥

प्रसंगेंचि तो सिंधु भेटुनि गेला
पुन्हा रामतुणीर तेथे निघाला ।
विनाजीवनें जाहलें बेट जेथें
वरा अर्पिता होय तो राम तेथें ॥ २७ ॥

तराया पुढें मंत्र पुसे समुद्रा
वदे आदरें सागरु रामचंद्रा ।
नळाचेनि हस्तें सिळिं श्वेत बाधा
गिरी आणवा सीघ्र आनंदकंदा ॥ २८ ॥

म्हणोनि त्वरें स्वस्थळालागि गेला
पुढें रामआज्ञें नळें वेग केला ।
दिनी पांचवे श्वेत संपुर्ण जाला
कपीसीं बळें रामराजा निघाला ॥ २९ ॥

सुवेळिप्रति पावला राजभारें
शुका सोडिलें राजनीतीविचारें ।
पुढे सीघ्र वार्तीक लंकेसि गेला
समाचार सांगीतला रावणाला ॥ ३० ॥

म्हणे जानकी राघवालागि देईं
न देता सिता मृत्य संदेह नाहिं ।
बहु जाहली प्राप्त रायासि चिंता
शुका सारणा होय तो पाठवीता ॥ ३१ ॥

कपिरुप विर जाले वाहिनीमाजि गेले
तुळिति सकल सेना वानरी दस्त केले

तदुपरि रघुनाथें देखतां सोडियेले
  जयजयजयघोषें व्योममार्गें उडाले ॥ ३२ ॥

भयभित अतिशंका भेटले रावणासी
  विनविति प्रभु रामा सीघ्र दीजे सितेसि ।
अगणित कपिसेना जुंझतां येष येना
  दशमुख मग बोले ते कसी दाखवा ना ॥ ३३ ॥

त्यानंतरे घेउनि सारणाला
  दामोदरीं उन्नत रूढ जाला ।
पाहे कपी दुर्धर रूप पाणी
  नादें नभा दाटिति घोर वाणी ॥ ३४ ॥

असंख्यात संख्या तयाला असे ना
  रूपे भीस भिंगुळ हि वर्ण नाना ।
गिरीसारिखे चंड देहि बळाचें
  महाविक्रमि कोटि कोटि बळाचें ॥ ३५ ॥

कितियेक पुछासनारूढ जाले
  कितियेक लंकेसि लक्षित ठेले ।
किति जांभया घोर युध्यासि देती
  किती सव्य बाहो बळें तुकिताति ॥ ३६ ॥

कितीयेक तें गर्जती भुभुकारें
  किति ताडिती भुमी लांगुळमारें ।
किती चालती मेरुमंदर तैसें
  जया देखतां जीव अत्यंत त्रासें ॥ ३७ ॥

पुसे रावणु मुख्यमुख्या प्रसंगें
  तयानंतरें सारणु सर्व सांगें ।
कपी वर्णितां कोप अद्भुत आला
  प्रधानाप्रति सीघ्र मारु निघाला ॥ ३८ ॥

विवेकेंचि त्या सारणें शांत केलें
  रघुनायेका लक्ष्मणा दाखविलें ।
गमे विघ्न अद्भुत लंकापतीला
  तयानंतरें पाठवी शार्दुळाला ॥ ३९ ॥

मनोवृत्ति त्यायेचि जाउनि आला
  कपीउत्पती सर्व सांगे प्रभुला ।
पुढे रावणे सीर माईक केलें
  सितेलागि दाउनिया कष्टवीलें ॥ ४० ॥

न संडि कदा सत्व जाणुनि सीता
  सभे आपुल्या होय तात्काळ येता ।
सितेहस्तिचें सीर माईक गेले
  तयानंतरें सौख्य अत्यंत झालें ॥ ४१ ॥

पुसे मंत्र तो मंत्रियां लंकनाथु
  प्रबोधि सुशब्दे तया मालिवंतु ।
न घे निती युध्याप्रती सिध जाला
  चमु धाडिली दुर्ग रक्षावयाला ॥ ४२ ॥

बळि राहिले भीम चत्वार द्वारीं
  तुरे वाजति शंख शृंगे नफेरी ।

महीं व्योम ब्रम्हांड नादें थरारी
उतावेळ झुंझावया वीर मारीं ॥ ४३ ॥

दुताचेनि मंत्रें स्वयें रामराजा
कथी वीर बिभीषणु सर्व वोजा ।
प्रतीमल्ल ते राघवें सिध केले
पुढें श्रृंगमाथ्यावरी सर्व गेले ॥ ४४ ॥

निकट परम जालि दिव्य लावण्य लंका
निरखिति कपि नेत्रीं दुरी टाकुनि शंका ।
दशमुख बहु उंचिहुनि सर्वांसि पाहे
अनुज कुशळ त्याचा राघवा दावितांहे ॥ ४५ ॥

नव्हे लक्षितां धीर त्या सुग्रिवातें
उडाला बळें वाड आकाशपंथें ।
म्हणे रावणा जानकि विश्वमाता
तुंवां आणिलि लाविता ख्याति आता ॥ ४६ ॥

म्हणोनि करे भंगिलिं दिव्यछेत्रें
किरिटें तथा पाडिलीं सुर्यपत्रें ।
पुढे रावणाअंतरीं क्रोध बाणे
पदे तीव्र त्या सुग्रिवालागि हाणें ॥ ४७ ॥

तंदुपरि विरि आले मल्लयुध्यासि कैसे
कवळुनि वपु हस्तें ताडिती काळ जैसे ।
रगडुनि दशनातें उसिणे घाय देंति
समबळ समयुक्ती येकमेकां न भीती ॥ ४८ ॥

तळप्रहारें करप्रहारें
सिरप्रहारेंचि पदप्रहारें ।
देती बळें निष्ठुर घाव भेटें
आले भुमी भीडंत कड्कडाटें ॥ ४९ ॥

क्षणभरि कपिनाथु रावणालागि पाडि
तदुपरि कपिनाथा रावणु तो पछाडि ।
बहुविध कव युक्ती घालुनि येकमेकां
रगडित भुमि नेटें दुरी टाकुनि शंका ॥ ५० ॥

त्यानंतरें रावण अल्प जाला
मारावया भाव करी कपिला ।
हे जाणुनि सुग्रिव लागवेगें
आला सुवेळे परतोनि मार्गे ॥ ५१ ॥

रघुपतिपदपद्मी ठेउनि मस्तकातें
उठुनि भुमि न्याहाळि जोडुनि हस्तकातें ।
नरविर हितबुद्धि नीती अत्यंत सांगे
वनचर कपिराया पुजिति सौख्यरंगें ॥ ५२ ॥

पुढें वेष्टिली वानरीं राजधानि
उतावेळ युध्याप्रति सैलपाणी ।
बहु धांवती भार कल्लोळ सैरा
ध्वनिगर्जनें दुर्ग कांपे थरांरां ॥ ५३ ॥

त्यानंतरें लक्षुमि राजनीति
रायें कपी अंगद भद्रजाती ।

संन्मानुनि पाठविला पुरिसी
  तो भेटला राक्षसराज त्यासी ॥ ५४ ॥

रिपुबळसमुदाई सर्व मानुनि तुछे
  बसत निकट राया वेंठ घालुनि पुछें ।
विनवित मग त्यातें जानकीलागि देई
  न करिसि तरि ऐसें मृत्य होईल पांहि ॥ ५५ ॥

तें ऐकुनि रावण तप्त जाला
  मारा म्हणे मस्तक मर्कटाला ।
धांवोनियां सत्वर मल्ल आले
  बांधावया हस्तक आक्रमिले ॥ ५६ ॥

तदुपरि कपिरायें चंड उड्डाण केलें
  सहजचि नभपंथें मंडपालागि नेलें ।
निशिचर धिर त्यांचे हारिले दर्प कैसे
  तळवटिं ढकालिले मारिले सर्प तैसें ॥ ५७ ॥

माहामल्ल चत्वार गाळुनि त्यांतें
  पुढें भेटला अंगदु राघवातें ।
म्हणे स्वामिया नीति शत्रु न मानी
  उतावेळ युध्यासि गर्वाभिमानी ॥ ५८ ॥

परिसुनि नरनाथा कोप अद्भुत आला
  विनवित कपिमुख्या लाग कीजे पुरीला ।
रविसुत मग प्रेरी भार युध्यासि कैसे
  ढग बहु प्रळईचे भीम कर्कोट तैसे ॥ ५९ ॥

पदरज नभ तेणें पिंगटाकार जालें
  न दिसत रवि व्योमी तेज लोपोनि गेलें ।
परविर त्रिकुटिचे जाहले सिध भारी
  तडकति बहु वाद्यें शंख श्रृंगे नफेरी ॥ ६० ॥

हुडेहुडां धांवति दैत्य देखा
  वाते अती वाजति त्या पताका ।
तो वेधले वानरवीर दुर्गी
  नेणो जसें पावन जीव स्वर्गी ॥ ६१ ॥

पुढें मांडलें युध्य अद्भुत गाढें
  कपी टाकिति सैर श्रृंगें निवाडें ।
धाडाडां भुमी लोटति दुर्गपाळी
  घडाडा उठे शब्द तो अंतराळीं ॥ ६२ ॥

चऱ्या पाडिल्या तोरणे भग्न केलीं
  कडाडां निशानें बळे मोडियेलीं ।
विमानें तथा गोपुरें भुमीपंथें
  त्वरें लोटति पर्वताचेनि घातें ॥ ६३ ॥

महामार देखोनियां भीमदृष्टी
  पुढे कोपले दैत्य तें शस्त्रवृष्टी ।
करुं लागले जिमुति जेवि धारा
  भुमि त्यागिति त्याचि न्यायें सरारां ॥ ६४ ॥

कपी खोंचलें मल्लयुध्यासि आले
  रिपु येकयेका करें भग्न जाले ।

बहु शांति केलि विरा राक्षसाचीं
पुढें पातली भीम सेना तयांची ॥ ६५ ॥

कपि जुंझतां सर्व विन्मुख केले
पुरी त्यागुनी मार बाहेरि आले ।
तयानंतरें मार अद्भुत झाला
कपी राक्षसां मृत्य भक्षित आला ॥ ६६ ॥

सडा दाटला पादपाणीसिरांचा
उठावा दळीं होत दोंहिं विरांचा ।
महावीर ते प्रेत होउनि जाती
तया पाठीसी मार घागुनि येती ॥ ६७ ॥

असंभाव्य तो वाद्यकल्लोळ वाजे
मही व्योम पाताळ ब्रम्हांड गाजें ।
पळाली भुतें धाक घेउनि पोटीं
बळी भीडती होतसे पत झोंटी ॥ ६८ ॥

नदी चालिलि श्रोणिताचि भडाडां
बहु वाजति सिंळ शृंगें धडाडां ।
सुरां दानवां जाहले युध्य जैसें
कपी राक्षसा मांडले घोर तैसें ॥ ६९ ॥

दिशा दाटल्या तोमरीं शक्तिबाणी
कबंधें बहु धावति घोरवाणी ।
कपिमाजिही वीर उदंड मेले
पदाती रणी भीडतां भग्न जाले ॥ ७० ॥

हयगजरथथाटें लोटलीं कडकडाटें
वनचरबळ नेटें सर्व जाळि सपाटें ।
तदुपरि विरमुख्यांलागि आवेष आला
दशमुखदुतआप्तां काळ विन्मुख जाला ॥ ७१ ॥

समिरसुतवरिष्टें पाडिला जंबुमाळि
सबळ प्रघस त्यातें सुग्रिवें तेचि काळिं ।
द्विविध अशनि दैत्य झाडिता सीघ्र आला
तपनगज तयातें सीघ्र जींतुनि ठेला ॥ ७२ ॥

विद्युन्माली भग्न केला सुषेणें
मित्रघ्न तो वीर बीभीषणानें ।
रामें चौघां विंधिलें च्यारि बाणें
वीरुपाक्ष लक्ष्मणें थोर मानें ॥ ७३ ॥

प्रतापी बळि लक्ष कोटि बळाचें
निमाले महाथोर थोरा कुळाचें ।
पुन्हा भीडतां यामिनी प्राप्त जालि
तया राक्षसा हारि अत्यंत आलि ॥ ७४ ॥

अकस्मात तो चंद्र व्योमीं उदेला
पुढें रावणी थोर युध्या निघाला ।
करें अंगदाच्या रथु भग्न केला
त्वरें व्योमपंथेंचि मेघी दडाला ॥ ७५ ॥

पुढें रामसौमित्रहिं सर्पबाणी
बळें बाधता जाहला च्यापपाणी ।

कपिचा शरें सर्व संव्हार केला
  समाचार सांगीतला रावणाला ॥ ७६ ॥

म्हणे रावणु धन्य गा धन्य पुत्रा
  रिपु जिंकिले माझिया प्रीतिपात्रा ।
तरी स्वग्रहा जाउनी सौख्य भोगीं
  निघे रावणी त्यासि वंदुनि वेगीं ॥ ७७ ॥

तदुपरि त्रिजटातें रावणु युक्ति सांगे
  सकाळिक रण सिते दाखवीं लागवेगें ।
परिसुनि प्रभुवाक्या काननालागि आली
  नृपवरसहकांते पुष्पकारूढ जाली ॥ ७८ ॥

रणि राक्षसां बानरा युध्य जालें
  अकस्मात तें यान तेथेंचि आलें ।
बहुसाल तो शोक केला सितेनें
  विवेकें तिये वारिलें त्रीजटेनें ॥ ७९ ॥

पुन्हा आपुल्या स्वस्थळालागि आल्या
  कपिच्या बहु कोटिकोटि निमाल्या ।
मनि नावरे दुख किष्किंदराजा
  निवारी तया वीर नैरूत्य वोजा ॥ ८० ॥

खगपति मग आला सर्पमेळा पळाला
  अनुजदळबळेसीं राम तो स्वस्त जाला ।
गरूड त्वरित गेला वंदुनि राघवाला
  निसिचरपुरवासी त्यासि कल्पांत आला ॥ ८१ ॥

दुतिं सर्व सांगितलें रावणातें
  महा विस्मयो मानिला लंकनाथें ।
कपी रीस जींकावया आणि रामा
  त्वरें धाडिला वीर धुम्राक्ष नामा ॥ ८२ ॥

बहु युध्य केलें तया राक्षसानें
  कपी घेतले थोर कित्येक प्राणें ।
पुढें मारुतें पाडिला प्रेतभृष्टी
  तया पाठीसीं पावला वज्रदोष्ट्री ॥ ८३ ॥

कपी अंगदाचेन तो शांत जाला
  समाचार गेला तया रावणाला ।
पुढें धाडिलें पुत्र आकंपनातें
  समीरात्मजे दाविला मृत्य त्यातें ॥ ८४ ॥

असंभाव्य तें दुख रायासि जालें
  प्रहस्तासि युध्याप्रति पाठवीले
बहु भीडता भीडता तों प्रहस्तु
  निळाचेनि त्या जाहला प्राप्त अस्तु ॥ ८५ ॥

त्यानंतरें सर्वहि सैन्यमेळें
  जिंकावया वानर बाणजाळें ।
चाले स्वयें रावण मुख्य भार्या
  वारी तीच्या त्यागुनि नीतिकार्या ॥ ८६ ॥
अगणित निजभारे सीघ्र बाहेरी आला
  फणिवर भूमि वाहे भार त्या फार जाला ।

पणव पटह शृंगे वाजती शंख भेरी
थरथर महि कांपे व्योम नादे थरारी ॥ ८७ ॥

कपिदळ दशकंठें देखिलें सर्व डोळां
नवल परम मानि अंतरीं वेंळवेळां ।
रघुपति अरिसेना लक्षिता स्तब्ध जाला
सकळिक रणसौरे विस्मयो थोर केला ॥ ८८ ॥

कथी वीर बीभीषणु राघवातें
बहु कोप आला विरा सुग्रीवातें ।
बळे शैल घेउनि संन्मुख जाला
दशग्रीव ताडी शरे घोर त्याला ॥ ८९ ॥

सबल परम भालीं भेदता वक्षभागीं
रविसुत भुमि लोटे सत्व त्यागुनि वेगीं ।
तदुपरि कपिसर्शी रावणु हाकियेला
दशमुख रणसौरा त्यांसि जिंकुनि ठेला ॥ ९० ॥

पुनरपि बहु तेणें सोडिली बाणजाळें
वनचर रिस त्यांचिं छेदिलिं कंठनाळें ।
न धरत धिर पाटिं मार मार्गे पळालें
शरण म्हणत रामा पाटिसीं सीघ्र आले ॥ ९१ ॥

फणिवर मग बोले जिंकितों राक्षसेंद्रा
तरि मज निजआज्ञा सीघ्र दीजे नरेंद्रा ।
रघुपति वदताहे बा असो तुज स्वस्ति
सबळ परम शत्रु जाण हा वीसहस्ती ॥ ९२ ॥

Govt. Oriental Mss. Library
Triplicane P.O., Madras

पुढे वीर सौमित्र सज्जीत च्यापा
रथीं रावणाच्या लिळा येक झेंपां ।
कपी मारुती बैसला बोलताहे
नरावानरांचेनि यां मृत्य पांहें ॥ ९३ ॥

पाहा चंड दोर्दंड याचेनि घातें
रथेंसि तुला लावितो मृत्यपंथें ।
म्हणे रावणु मर्कटा शक्ति दावीं
वदे मारुती सर्वही तुज ठावी ॥ ९४ ॥

तुझा अक्षया मारिला प्रीतिपात्रु
असें अैकतां कोपला देवशत्रु ।
बळें दात खाउनी ताउनि दृष्टी
कपिलागि अर्पि सळें वज्रमुष्टी ॥ ९५ ।

क्षणभरि कपि तेणें चाचरी फार गेला
तदुपरि निजमुष्टी रावणु ताडियेला ।
दशमुख भुमि आला थोर मुर्छित जाला
पुनरपि कपि मुष्टी हाणुनि पाडियेला ॥ ९६ ॥

रथी बैसला उपरि थोर तोषें
बळें गर्जता जाहळा घोर घोषें ।
कपि नाटाकि जिंकिला अग्निपुत्रु,
पुढें धाविला सिघ्र जेथें सुमित्रु ॥ ९७ ॥

सळे उर्ध वाहानिया च्यापमुष्टी
असंभाव्य केली विरिं बाणवृष्टी ।

त्वरें तोडिति बाण बाणी सरांरा
पुन्हा मागुति मार येती भरारां ॥ ९८ ॥

मनी मानला रावणु युध्यरंगें
पुढें सोडिली ब्रम्हशक्ती प्रसंगें ।
सुमित्रासुतें अर्ध ते भग्न केली
उरे अर्ध येउनी आंगे विझाली ॥ ९९ ॥

पडे वीर सौमित्र देखोनि डोळां
दशग्रीव तेथेंचि धाउनि आला ।
बळे नुचले रोवितां दंत वोष्ठीं
पुढे ताडिता जाहला वज्रमुष्टी ॥ १०० ॥

तया देखता कोप रुद्रासि आला
म्हणे फेडिजे याचिया उसिणवाला ।
म्हणोनि बळें मुष्टी वाहोनि नेटें
सुरारीं उरीं ताडिला तो चपेटें ॥ १०१ ॥

वमित रुधिर तेणें रावणु नेत्र झांकी
भ्रमित परम देहीं कर्ण झाडूनि खोंकी ।
त्वरित कपि सुमित्रालागि घेउनि गेला
भरित बहुत दुखें राक्षसु स्वस्त जाला ॥ १०२ ॥

रथीं बैसला मागुती बाण सोडी
करी गर्जना वीज जैसी कडाडी ।
मनी राघवें विस्मयो थोर केला
पुढें मारुति रूढ युध्या निघाला ॥ १०३ ॥

सहज अवलिळेनें बाण सोडुनि देखा
मकुट धनुष छत्रें तोडिल्या त्या पताका ।
दशमुख भुमि आला बोलता राम जाला
पळुनि त्वरित जाई रक्षिलें आजी तुला ॥ १०४ ॥

अगणित दळ अस्तां मुख्य युध्यासि येतां
अनुचित अतिमानें जाण तुं लंकनाथा ।
कुमर सचिव युध्यालागि धाडुनि देईं
सकळिक विर मेल्या च्याप सज्जूनी येईं ॥१०५॥

परिसुनि निज पौरा चालिला वीरबाहो
सुहृद कुमर बंधु सर्वसंगे समुहो ।
न वदति विर कोण्ही लक्षिती भुमि डोळां
नगरप्रभु त्वरेनें मंडपालागि गेला ॥ १०६ ॥

तदुपरि सचिवेंसिं बुधि योजुनि जाणा
विकृतनयनसेनामुळ त्या कुंभकर्णा ।
दशमुख मग धाडि वीर निद्रिस्त जेथें
त्वरित सकळ गेले जाहले स्थीर तेथें ॥ १०७ ॥

सबळ अचळ जैसा त्यापरी कुंभकर्णु
दिसत अति सुषुप्ति व्यापला मेघवर्णु ।
झडझड मुख नाकें श्वास अद्भुत टाकी
दशशत दैत्यांलागि तो वात झोंकी ॥ १०८ ॥

करुनि बहु प्रयुक्ति भीतरि सर्व गेले
उठविति परि त्याचें नेत्रपाते न हालें ।

उपरी परमकोपें ताडिते वीर जालें
अगणित पशुपक्षी चंडनादेंच मेले ॥ १०९ ॥

किति घालिति अग्नि नासीकबीळीं
किति वोतिति तोय कर्णि खळाळी ।
किती टीपऱ्या बाधिति वोट वोटीं
किति टोंचिति शूळ निष्ठूर वोंटी ॥ ११० ॥

गुरें वांसरें शकटें दाट थाटें
त्वरें हाकिलीं त्यावरी कडकडाटे ।
न ये जागृति लोटिले चंड हस्ती
गीरीसारिखे डोलति भव्य मस्ती ॥ १११ ॥

तयानंतरें जागृती वीर आला
बहु मांस सेउनि शोणीत प्याला ।
पशु ग्रासिले जीत कितेक मोटे
बळि राक्षसा मृत्य तैसाचि वाटे ॥ ११२ ॥

पुसे उपरी मंत्रियां वीर दक्षु
कथी सर्वही त्याप्रति वीरुपाक्षु ।
म्हणे ऐकुनि मिचि युध्यासि जातों
नरावानरांलागि भक्षुनि येतों ॥ ११३ ॥

सचिव उपरी प्रार्थी भेटि रायासि दिजे
तदुपरि अरिसेनेलागि संव्हार कीजे ।
परिसुनि पुरनाथा भेटला लागवेगें
दशमुख निजआज्ञें चालिला सौख्यरंगें ॥ ११४ ॥

पुरीमाजि तो येक पायासि ठेवि
दुजा दुर्ग लंघुनि शत्रुसि दावी ।
पळाले कपी मुख्य भेणें गळाले
पुन्हा अंगदें सर्वहि येक केले ॥ ११५ ॥

दिसे कुंभकर्णु जसा केतभूमी
उडाले कपि सैळ घेवुनि व्योमी ।
धबाबां वरी वृष्टी अद्‌भुत केली
विरे कुंभकर्णें शुळें वारियेलि ॥ ११६ ॥

किती सैळ ते लागतां पृष्ट जाले
किति राक्षसे झेलिले चुर्ण केले ।
पुढें भक्षिता जाहला वानरांसी
जसा घोर दावाग्नि त्या काननासी ॥ ११७ ॥

शते पंचसपें मुखी ग्रास घालि
किति नीघति कर्णनासिकबीळि ।
कितियेक ते वीर जीर्णासि आले
पुन्हा वानरांलागि भक्षित चाले ॥ ११८ ॥

बळाचे कपी मुख्य युध्यासि आले
तया राक्षसें सर्व विन्मुख केले ।
पुढें सुग्रिवालागि घालुनि कक्षें
फिरे पटणा मार्ग तोषे न लक्षें ॥ ११९ ॥

पुरी पावतां थोर आश्चिर्य जालें
त्वरें सुग्रिवें कर्णनासासी नेलें ।

उणें देखतां फीरला सीघ्र मागें
रघुनायकें सोडिलें बाण वेगें ॥ १२० ॥

कितियेक ते भाक्षिले भग्न केले
कितियेक ते चाउनी टाकियेले ।
पुन्हा बाण येतांचि मोडूनि टाकि
प्रसंगेचि त्या वानरालागि हाकी ॥ १२१ ॥

तदुपरि रघुनाथा कोप अद्भुत आला
त्रिबमुखगणितास्त्रें वीर तो भग्न केला ।
परिसुनि दुतमुखें राव शोकिं बुडाला
कुमरसचिवषट्कां धाडिता सीघ्र जाला ॥ १२२ ॥

रणधिट रणसौरे आपुलालेनि भारें
नगर त्यजुनि आले सैन्य घेउनि सारें ।
अगणित कपि तेही भीडतां भग्न केले
हळहळु मग येकायेकमागें निमाले ॥ १२३ ॥

नरांतका अंगद मृत्य जाला
देवांतका मारत काळ भाला ।
करेंचि त्याच्या त्रिसिरा निमाला.
महोदरा जिंकुनि नीळ ठेला ॥ १२४ ॥

पारश्वहस्तें रुषभा कपीच्या
स्थुळात्तिकाया फणिनाथ त्याच्या ।
येणेपरि सर्वहि शांत झाले
रायाप्रति सत्वर दुत गेले ॥ १२५ ॥

म्हणति नगरनाथा काळ विन्मुख जाला
सचिवसुतसमग्रें घोर संग्राम केला ।
उपरी सकळ मेले येकयेकाचि पाठीं
परिसुनि दशकंठा नाव्हे दुख पोटिं ॥ १२६ ॥

निवारी तया पुत्र तो इंद्रजितु
म्हणे वैरियां आजि दावीन अंतु ।
असें जोंवरी वीर शक्रारि नामा
नसे तोंवरी राक्षसां भेत्र तुम्हा ॥ १२७ ॥

बोलोनि ऐस्या अतिसार गोष्टी
सेउनिया रावणप्रेतसृष्टी ।
अला पुढें सत्वर याग केला
त्यानंतरें मेघ नभी दडाला ॥ १२८ ॥

उपरि कठीण बाणी मांडिली घोर वृष्टी
रघुपति फणिनाथें गाळिलया च्यापमुष्टी ।
रिसकपी बाळियाडे भेदुनि घोष केला
निजदळपरिवारें सीघ्र लंकेत गेला ॥ १२९ ॥

नवल परम पाहो येकला इंद्राजितु
अगणित कपिसैन्यां जाहला मृत्यअंतु ।
परिसुनि निजचित्तिं चोज जो का.न मानि
अचतुर नर तो हो मुढ गर्वी गुमानी ॥ १३० ॥

असो आतां चिंता समिरतनया सैन्य मरणें
म्हणे यावे वस्तु सुगम बरवा कोण करणें ।

गदापाणी त्यातें सुरसवचनें रूक्ष विनवी
　गिरिद्रोणी वल्ली बहुत असती प्रेत जीववी ॥

कपी मारुताचेनि त्या प्राप्त होती
　तयानंतरें प्राण सर्वांस येती ।
अस्या ऐकतां रम्य सारांषबोला
　उडाला कपी द्रोण तेथेंचि गेला ॥ १३२ ॥

चढुनि अचळ माथां औषधी घेउं पाहे
　न दिसति कपिदृष्टी थोर उद्वेग वाहे ।
तदुपरि अचळाचि स्तुति अत्यंत केली
　न मानित गिरि तेणें कोपवेळा उदेली ॥ १३३ ॥

करकरकर नेटें खादल्या दंतदाढा
　दशशतगिरिगावें घातला पुछवेढा ।
उपडुनि नभपंथें वेग अद्भुत केला
　कपिदळ मृत जेथे सीघ्र तेथेचि आला ॥ १३४ ॥

अनिळ वरुनि वल्ली वास घेउनि धावें
　नरकपि उठिले त्यां अंतरी स्वप्नभावें ।
पुनरपि गिरि नेला स्वस्थाळि ठेवियेला
　तमहरउदई तो सिघ्र सैन्यि मिळाला ॥ १३५ ॥

उपरि रघुपतीर्थी सेविली पादपद्में
　परम हरुष पोटिं मानिला मोक्षधामें ।
बहुविध सुखशब्दें रुद्र संतुष्ट केला
　कपिदळमुखघोषें राक्षसां कंप आला ॥ १३६ ॥

रविसुत मग बोलें पट्टणा दग्ध किजे
　रघुपति वदताहे सैन्य आज्ञापियेजे ।
परिसुनि प्रभुवाक्या प्रेरिले दुत सैरा
　वनचर करि अग्नि धांविले तीव्र पौरा ॥ १३७ ॥

धडधडधड ज्वाळा गर्जिती तैलकाष्टीं
　भडभडभड लंका जाळिती थोर तुष्टी ।
घडघडघड भुमि लोटती उंच गेहें
　तडतडतड जाती वीर त्यागूनी देहे ॥ १३८ ॥

पळति सकळ नेटें सर्व टाकुनि भेणें
　चळति नयन वाटे धुम्र अत्यंत तेणे ।
गळति उपरि पोटिं रोडके बोडके हीं
　जळति त्वरित कैसे दोडके शुष्क पांहीं ॥ १३९ ॥

बहु माजली हाक अत्यंत कांहिं
　जळाल्या जिवा सर्वथा मीति नाहीं ।
असंभाव्य तो [illegible]कल्लोळ जाला
　पळा रे पळा बोलति अग्नि आला ॥ १४० ॥

मर्डि दाटलीं कुंजराउष्टराचिं
　माडि दाटली अश्वपश्वादिकांचि ।
कडाडां बळें जाळितां अग्नि बाजे
　पुरीमाजि ते बोंब अत्यत गाजे ॥ १४१ ॥

दुतिं सर्व रायासि हे जाणविले
　पुढे सप्तकांलागिं आज्ञापियेलें ।

निघाले महावीर ते चंडमारें
तुरे वाजंती येकवेळा अपारें ॥ १४२ ॥

पुढें तोयअस्त्रासि सोडुनि कुंभें
त्वरें वारिला अग्नि सेनाकदंबें ।
कपीची बळें पीटली बाणघातें
जसी मेघसंघें महाचंडवातें ॥ १४३ ॥

पुरी त्यागुनि भार बाहेरि आले
प्रतापें रणी भीडते सर्व जाले ।
रिपु मुख्य कित्येक ते भग्न केले
तयानंतरें प्रेतसिंधु बुडाले ॥ १४४ ॥

रथी कंपनु जंघ आणि प्रजंघु
विरें अंगदें आणिला यासि भंगु ।
द्विविधां करिं शोणीताक्षु निमाला
युपाक्षाप्रती मैंद तो मृत्य जाला ॥ १४५ ॥

कपी सुग्रिवें मारिला कुंभ गाढा
निकुंभु बळें मारुते पैजहोढा ।
मना आणिजे अर्थ सारांस श्रोतीं
रणी सप्तकां आहली वासिलाती ॥ १४६ ॥

दुति सर्व रायासि जाणविलें
कराळा इटा दुर्मुखा पाठविलें ।
तयालागिहि मृत्य घेउनि गेला
सुताउपरी घाडिता सीघ्र जाला ॥ १४७ ॥

विशालाक्ष मक्राक्ष हे वीर गाढें
खरु तीसरा उर्ध वाहोनि पेढें ।
बहु बाण सोडीत युध्यासि आले
कपीभार तें भंगिले भग्न केले ॥ १४८ ॥

रणी दाविलि विक्रमाचि सिराणि
निमाले तिघे सेवटी रामबाणि ।
तया रावणा दुख अत्यंत जालें
पुढें मेघनादासि त्या पाठवीले ॥ १४९ ॥

चमु भीम घेउनि तो वीर आला
त्वरें माग सारुनि मेघि दडाला ।
प्रसंगी तये लाभली भीम कृत्या
पुढें वानरां दाविता होय मृत्या ॥ १५० ॥

मनी राघवा कोप अत्यंत आला
तिचा आंगिरास्त्रें त्वरें नाष केला ।
भुमी घातला उपरी इंद्रजितु
दिसे वानरां जेवि मृत्यु कृदांतु ॥ १५१ ॥

तया देखतां कोप सर्वांसि आला
पुढ ताडिते आहले येकवेळा ।
समीरात्मजें टाकिला शुळ नेटें
गदा राक्षसें प्रेरिली ते उलाटें ॥ १५२ ॥

कुमुदपरिघघातें हाणता सीघ्र जाला
द्विविध परम कोपें चक्र घेउनि चाला ।

सुरपतिसुतपुत्रें घातली चंड सीळा
दळपति निळ खड्गें मारिता होय त्याला ॥

गवाक्षु कपी वृक्ष घेउनि धावे
महातोमरें मैद सन्मुख पावे ।
रघुनायकें सोडिली बाणजाळें
सुमित्रासुतेहिं त्वरें त्याचि काळें ॥ १५४ ॥

बहुविध बहुहस्तें मार अत्यंत जाला
दशमुखनिजपुत्रें अंतरी तुछय केला ।
अगणित कपी संख्य लक्ष कोट्यानकोटी
रणधिट रणियुक्त रावणी वीर जेठीं ॥ १५५ ॥

परम शुर प्रतापि ताउनि भीम दृष्टी
न गणुनि अरिवर्गा मोकळी बाणवृष्टी ।
नरविर सहसैन्यें पाडिले प्रेतसृष्टी
परतत मग लंका थोर मानुनि तुष्टी ॥ १५६ ॥

तदुपरि पुरनाथा भेटला इंद्रजीतु
नमन करुनि सांगे युध्यवार्ता वृतांतु ।
परिसुनि सुख जालें मानसी वीसनेत्रा
विनवित सुखशब्दें इंद्रजीता सुपुत्रा ॥ १५७ ॥

नरकपिबळसिंधु मारिले बाणघातें
नवल परम देऊं ऊपमा काय तुतें ।
परि अति निजचित्तिं वाटते दुखे मातें
सुहृद सकळ मेले वैरियाचेनि हातें ॥ १५८ ॥

प्रथम निजपुरासि वानरीं लाग केला
अगणित दळसिंधु भीडता शांत जाला ।
तदुपरि मग गेला वीर धूम्राक्ष जेठीं
कुमर साचिव मार्गे आणितो वज्रदौष्ट्री ॥ १५९ ॥

सबळ परम बंधु वीर तो कुंभकर्णु
त्रिशिर परमकाया क्रोधनु मेघवर्णु ।
मकरनयन कुंभु आणि जंघ प्रजंघु
निजदळपरिवारें पावले सर्व भंगु ॥ १६० ॥

नरकपिरिपु यांसि अंतकु तुचि होसी
वधुनि सकळ येसि मागुती प्राण त्यांसी ।
परम त्वरित येति हे महाचोज लोकीं
तरि अरिकुळ त्याचें मुळ तोडुनि टाकि ॥ १६१ ॥

करुण परमवाणी बोलता वीसचक्षु
झडकरी उठिला तो रावणी वीर दक्षु ।
विनवित मग राया मारितो मुख्य सेना
न मरिन तरि माझी हेचि हे भेटि जाणा ॥१६२॥

बोलोनि ऐसे मग तो निघाला
सारुनि यागा गगनासि गेला ।
झेंपावले वानरवीर तेथें
जाले महावीतुळ मेघवाते ॥ १६३ ॥

प्रथमाचि दळ द्वारिं ठेविले भीम होतें
उतरुनि भूमि गेला रावणी वीर तेथें ।

तदुपरि निजभारें तीव्र युध्या निघाला
   पवनसुत चमूसीं आडवा सिघ्र जाला ॥ १६४ ॥

त्यानंतरे कृत्रिम जानकीतें
   निर्मुनि मारी पवनात्मजातें ।
वाटे खरें देखुनि सर्व डोळा
   निकुंबले सत्वर दैत्य गेला ॥ १६५ ॥

येरीकडे मारुत रामराया
   भेटोनि सांगे अति चोज माया ।
ऐकोनिया राघव शोक मांडी
   बोले तया राक्षस दुख सांडी ॥ १६६ ॥

कपट करुनि सीता मारिली इंद्रजीतें
   प्रभु मज गुज ठावें सीघ्र आता समर्थे ।
निवडुनि कपिसेना भंगिजे याग त्याचा
   तदुपरि फणिबाणी देह त्यागील साचा ॥ १६७ ॥

ऐकोनि हें राघव तुष्ट जाला
   बंधु दळांसि मग पाठवीला ।
गेला महाराक्षसवीर संगें
   दावी तया यागवटा प्रसंगें ॥ १६८ ॥

तयानंतरे वानरी वेग केला
   सिळाशीखरे याग भंगासि नेला ।
रथारुढ होउनिया इंद्रजीतु
   पुढें लोटला काळरुपी कृतांतु ॥ १६९ ॥

पिनाकापरी चंड कोदंड हाती
   कपि भेदिले सर्वहि भद्रजाती ।
पुढें वीर बिभीषणु सीघ्र गेला
   सुरारिसुतें थोर धिःकार केला ॥ १७० ॥

प्रतिउत्तरी बोलतां राजभ्राता
   बहु कोप आला तया इंद्रजीता ।
त्वरें बाण लक्षुनि निर्वाण सोडि
   सुमित्रासुतु सीघ्र तोडूनि पाडी ॥ १७१ ॥

सुमित्रासुता रावणी युध्य गाढें
   पुढें मांडलें येकमेका निवाड ।
महावीर वित्पन्न ते बाड अस्त्री
   बळे ताडिते जाहले दिव्यशस्त्रीं ॥ १७२ ॥

दिशा लोपल्या सर्वहि बाणजाळिं
   रवि झांकला पक्षियां अंतराळीं ।
बहु नाष झाला गती मंद वारा
   नव्हे रीघ त्या कंप देवा थरारां ॥ १७३ ॥

रणी रावणी जिंकितां जिंकवे ना
   रथारुढ कोण्हासहि आकळे ना ।
रिसि वानरीं स्यंदनु भग्न केला
   पुन्हा वीर तो यान घेउनि आला ॥ १७४ ॥

सुमित्रासुतें मारिले सारथ्यातें
   रथु वागवी आपुल्या नीजमंत्रें ।

घडि येक तो बाणसंभार सोडी
घडि वानरांलागि लक्षुनि झोडि ॥ १७५ ॥

महा युध्यकौशल्य अद्भुत ज्याचें
पुन्हा मर्कटीं मांगिलें यान त्याचें ।
नराराक्षसां जाहली भुमि वस्ती
नभीं लक्ष्मणा चिंतिति देव स्वस्ति ॥ १७६ ॥

पुढें सोडिते जाहले दिव्यअस्त्रें
महाकर्कशें घोररूपी विचित्रें ।
बळें हाकिती येकमेका वगत्रें
तयां भीडतां लोटली तीन रात्रें ॥ १७७ ॥

शरी खोचले देह माहाविराचे
भयें भार विस्मीत ठेले सुरांचे ।
प्रतिज्ञा शरु वीर सौमित्र सोडी
अरीभुज खंडूनिया सीर तोडि ॥ १७८ ॥

सुरां मानसिं सौख्य अत्यंत जालें
सुमित्रासुता सुमनी पूजियेलें ।
नभी सीर जाउनि भुमिसि येतां
कपीरुषभु होय झेलुनि येता ॥ १७९ ॥

तयानंतरें फीरले भार मार्गें
सुवेळाचळा पावले लागवेगें ।
रघुनायेकें बंधु आळंगियेला
प्रसंगेंचि सर्वांसि सन्मान केला ॥ १८० ॥

सुखें गर्जत्या जाहल्या वीरफौजा
कथा आयका चित्त देवोनि वोजा ।
रणी ईंद्रजीतासि त्या शांति जाली
त्वरें भुज निकुंबळेलागि आलि ॥ १८१ ॥

प्रियेलागि पत्रीं कथी सर्व गोष्टी
पढे वाचितां वाचितां भुमि पुष्टी ।
पतीभुज घेउनि लंकेसि गेली
तयानंतरें रामभेटि निघाली ॥ १८२ ॥

सुवेळास्थळीं भेटली रामराया
पुढें वंदिति जाहली सीघ्र पायां ।
तयानंतरें सीर तें हांसविलें
पुढें कल्पीलें कार्य सिधिसि नेलें ॥ १८३ ॥

पतिसि तिये प्राप्त सायोज्यवस्ती
सुताचेनि दुखें भुमी वीस हस्ती ।
पडे वीकळु आठवी इंद्रजीता
म्हणे केवी गेलासि त्यागुनि ताता ॥ १८४ ॥

मराया समस्तासी हे मुळ सीता
म्हणुनि तिच्या चालिला सीघ्र घाता ।
सुपारास्व वारुनि आणि समेला
महाभार युध्यासि तो पाठविला ॥ १८५ ॥

तुरगरथपदातिवारणा भीति नाहि
रघुपतिनिजबाणी पावले मृत्य पांहि ।

तदुपरि मग युध्या चालिला लंकनाथु
निकट सचिव च्यारी जेवि मृत्यकृदांतु ॥ १८६ ॥

दळेसी बळें सीघ्र बाहेरि आला
पुढें मांडलें युध्य दोही चमुला ।
तया रावणा देखतां वीर च्यारी
नीमाले रणी भीडतां घोर मारी ॥ १८७ ॥

महामत्त युध्योन्मतु वीरुपाक्षु
कपीनायकें दिधला यासि मोक्षु ।
विरे अंगदे मत्त निर्दाळियेला
मनी रावणा खेद अत्यंत झाला ॥ १८८ ॥

जिविं तुछय मानुनियां मर्कटांला
रघुनायका नीट सन्मुख आला ।
पुढें युध्य दोघांजणा घोर जालें
सुमित्रासुतें धनु साजियेलें ॥ १८९ ॥

तयाउपरि बाण सोडुनि कोपें
रिपुहस्तिचिं तोडिली चंड च्यापें ।
गदाघात अर्पुनि नैरुत्यनाथें
हयां अष्टकां लाविले मृत्यपंथें ॥ १९० ॥

मनी रावणा भावरे कोपउर्मी
पुढें सोडिता जाहला शक्ति भ्रम्हीं ।
सुमित्रासुतें पाडिली बाणघातें
तया रावणें छेदिला बोष्टदंतें ॥ १९१ ॥

तदुपरि मयशक्ती दामिनिचेनि पाडें
दशमुख वीर सोडि घोर गर्जे निवाडें ।
फणिवरनिजवक्षीं बैसली वीज जैसी
भडभड नदि रक्तें चालिली तीव्र कैसी ॥

हहाकार मोटा कपीमाजि जाला
तयानीकटीं राम धावोनि आला ।
बळें शक्ति काढुनियां रावणातें
पिटी वक्रमें घोर घातें निघातें ॥ १९३ ॥

पळे रावणु फार होउनि कष्टी
तया भासती राम सर्वत्र दृष्टी ।
न पाहेचि मार्गें पुरीमाजि गेला
कथी सर्व साकल्य मंडोदरीला ॥ १९४ ॥

पुढें बुधी योजुनि होमासि गेला
त्वरें काळनेमी पथी धाडियेला ।
सिणे राम तो लक्ष्मणाचेनि दुखें
सुषेणु म्हणे धैर्य रक्षा विवेकें ॥ १९५ ॥

गिरि आणवा तीव्र राती न जातां
विरा लक्ष्मणा प्राण आणीन आतां ।
कपी शक्ति शोधुनिया मारुताला
अयोध्यापति धाडिता सीघ्र जाला ॥ १९६ ॥

उडाला नभीं वानरु विघ्न त्यातें
करी काळनेमी प्रभुकार्यहेतें ।

ग्रहाचेनि बोलें तया भग्न केलें
पुढे पर्वतालागि उत्पाटियेलें ॥ १९७ ॥

फिरे मागुता कैकईसुत बाणें
कपिलागि विंधी महास्वप्नमेणें ।
पुढें जाहलि भेटि दोघां विरासि
म्हणे वीर तो बैस बाणि गिरीसीं ॥ १९८ ॥

न मनुनि कपिवाक्या वानरी सैन्ये जेथें
उडुनि त्वरित आला सैळ घेउनि तेथें ।
तदुपरि फणि वैद्यें सीघ्र आरोग्य केला
पुनरपि कपि वेगें द्रोण ठेउनि आला ॥ १९९ ॥

वदे बीर सौमित्र लक्षुनि रामा
त्वरें शत्रु संव्हारिजे मोक्षधामा ।
सिता आणुनि बंधु बीभीषणाला
प्रभु सौख्य दीजे तथा वानरांला ॥ २०० ॥

म्हणे वीर बिभीषणु तो प्रसंगें
करी रावणु होम अत्यंत वेगें ।
दयाळा कपी धाडुनि विघ्न कीजे
तयानंतरें भीडतां मोक्ष दिजें ॥ २०१ ॥

परिसुनि रघुनाथें धाडिले वीरजेठी
सबळ दशक मागें सैन्य सा च्यार कोटी ।
दशमुखस्थळ तेथें शिघ्र तात्काळ गेले
सकळिक दुत त्यांचें भीडतां भग्न केले ॥ २०२ ॥

नव्हे मार्ग दारिं असे चंड सीळा
कपी अंगदें फोडिली सर्व गोळा ।
भयें जाहले देखुनि रावणातें
पुढें मारुति चालिला तोषचित्तें ॥ २०३ ॥

तया पाठिसीं वीर सर्वत्र गेले
अमित्रासि लक्षुनि विस्मित जाले ।
दिसे तापसाचेपरि लंकनाथु
हवी आहुति व्हावया शत्रुअंतु ॥ २०४ ॥

तया ताडिते जाहले शैल्यपाणी
नुठे आसनीहुनि दीर्घाभीमानि ।
पुरीमाजि जाउनियां वाळिसुतें
त्वरें आणिलें रम्य मंदोदरीतें ॥ २०५ ॥

तिये गांजिति रावणादेखतांचि
उडे मारुती सीघ्र घेउनि उंची ।
करी शोक अत्यंत कारुण्यवाणी
त्वरें भंगला रावणु तीव्रध्यानि ॥ २०६ ॥

तदुपरि युवराजा हाणता होय लाता
वळुनि दशकमुष्टि ताडिले जांबुवंता ।
नळनिळकुमदातें आफळीले भुमिसी
उडुनि करचपेटें पाडिले मारुतासी ॥ २०७ ॥

कवळुनि मग कांतेलागि समोखियेलें
परम सुरसबोलें मंदिरा पाठवीलें ।

खचित रथ सुरत्नी सीघ्र आरुढ जाला
निजदळपरिवारें युध्यभुमीसि आला ॥ २०८ ॥

कपी सैळ घेउनि संन्मुख जाले
विरे बाण सोडुनि विन्मुख केले ।
रघुनायकें सज्जिले च्याप वेगें
पुढें मांडले युध्य दोघां प्रसंगे ॥ २०९ ॥

दशग्रीव मेघापरि बाण सोडी
शरे सर्व छेदुनियां राम पाडि ।
रिपु दोघहि वाढु शक्तिधिराचे
बहु सोडिती मार नेटें शराचे ॥ २१० ॥

दिशा दाटल्या त्यांचिया बाणवृष्टी
पुढे सुटला कंप अद्भुत श्रृष्टी ।
रविसोम बाणेचि लोपोनि गेले
ग्रहो मंगळादिक पोटिं गळाले ॥ २११ ॥

वितुळली उपरि शरवृष्टी
लक्षिति सकळ त्रीदष वृष्टी ।
पाठवी सुरपति रथ रामा
यावया रघुपतीजयकामा ॥ २१२ ॥

मातुळि सकळहि गुज सांगे
राम त्यावरि सुखे मग वेघे ।
कोपले उपरि ते अरीराजे
भीडती परम लाघव वोजें ॥ २१३ ॥

रावणें परम कौतुक केलें
सारथीरथहया दुखवीले ।
भेदिला रघुपति शरधारिं
रामहि प्रतिक्रिया करि सारी ॥ २१४ ॥

तदुपरि रघुनाथें राक्षसु त्रासियेला
फिरउनि रथ मागें सारथी चालियेला ।
घटसुत नरराजा भेटला तो अगस्ती
न भरत पळ रामा बोळला तो गभस्ति ॥

येरीकडे रावण स्वस्त जाला
ठेवी बहु दुषण सारथ्याला ।
तो बोलता भूषण होय देता
आणी रथा राघव जेथ होता ॥ २१६ ॥

पुढें देखिलें येकमेकांसि दृष्टी
विरि वाहिल्या उर्ध कोदंड मुष्टी ।
असंभाव्य आरंभिलि बाणवृष्टी
पुन्हा सुटला कंप अद्भुत श्रृष्टी ॥ २१७ ॥

फिरे गर्गराटें भुमि चक्र जेवीं
फणी कुर्म वैराह कल्पांत भावी ।
नभी देव तें उर्धपंथे पळाले
कपी आणि नैरुत्य पोटिं गळाले ॥ २१८ ॥

प्रसंगे हाहाकार अद्भुत जाला
बाळे भीडती कोण वारि त्यांला ।

विसांवा नसें सोडितां शस्त्रअस्त्रे
अकस्मात तें लोटलि सप्तरात्रें ॥ २१९ ॥

तदुपरी रघुनाथें चंडचंद्रार्धबाणी
सुरअरिमुखपद्मे छेदिली वज्रठाणी ।
पुनरपी निघतांचि राम विस्मीत जाला
मुनिवरसुतवाक्यें सीघ्र तो साजियेला ॥ २२० ॥

पुढें ब्रम्हअस्त्रासि स्थापुनि तथें
रिपुवक्ष भेदूनिया मृत्यपंथें ।
बळे लाविला तोषली सर्वसृष्टी
नभीहुनियां जाहली पुष्पवृष्टी ॥ २२१ ॥

तया रावणालागि देखूनि दृष्टी
बहुसाल बीभीषणु होय कष्टी ।
निवारी तया राम सारांष बोले
पुरीमाजि तेणें दुता पाठवीलें ॥ २२२ ॥

समाचार राजांगने श्रृत केला
वधुमेळ तो सर्व बाहेरि आला ।
पति देखिला मांडिला शोकभारीं
तया देवरु रामआज्ञे निवारी ॥ २२३ ॥

पुढें रावणालाग्नि नैरुत्यनाथें
दिल्हा अग्नि पाहो प्रभुचेन मत्तें ।
स्त्रिया सर्व गेल्या पुरीमाजि दुखें
वदे राम लक्षुमणा वाक्य निकें ॥ २२४ ॥

तुवा सीघ्र बीभीषणा पट दिजें
यदर्थीं विळंबासि कांहिं न कीजें ।
फणी रामआज्ञेचि नैरुत्यनाथा
पुरी जाउनि होय त्या राज्य देता ॥ २२५ ॥

पुन्हा मागुति भेटला अग्रजासि
रघुनाथ सांगें त्वरें मारुतासि ।
कथुनि तुंवा सर्व नैरुत्यराजा
किजे जानकी सर्व श्रृंगार वोजा ॥ २२६ ॥

तयानंतरे सीबीकारुढ आणी
उडाला कपी स्वामीआज्ञा म्हणोनी ।
पुरीमाजि जाउनि तैसेंचि केलें
सितेलागि श्रृंघारुनि आणियेलें ॥ २२७ ॥

पाहाया कपी लोटले रीस तीतें
तया राक्षसिं ताडिलें बेत्रघातें ।
पुढें अंगदु रामअज्ञे निघाला
करें पट्ट काढुनियां टाकियेला

रिसिं वानरिं देखिली विस्म
मनी तोषले यान त्या
पति नीट येउनि सन्मु
पुढें राघवें भोवई

प्रसंगें प्रियेसिं वदे
सिता दिव्य दे

नभी बोलीले देव निर्दोष सीता
पुढें राम अंकावरी होय घेता ॥ २३० ॥

दशरथ नृप आला भेटला राघवाला
निरखुनि हित पुत्रा स्वस्थळालागि गेला ।
रिस कपि सुरनार्थे रामआज्ञानुरागें
सकळिक उठवीले अमृताचेनि मेघें ॥ २३१ ॥

तदुपरि निजधामा सेउनि राघवासि
विधिहरसुर गेले तोष अत्यंत त्यासि ।
बिभीषण मग प्रार्थी पट्टणामाजि यावें
रघुपति वदताहें हे घड ना श्वभावें ॥ २३२ ॥

रविसुत कपि पुजी आदरें लंकराजा
सहजाचि मज जाला मानसन्मान बोजा ।
पतिनिजआज्ञा वंदुनि सुग्रिवेंसि
रपुरित गेला पुजिलें सांग त्यांसी ॥ २३३ ॥

राजे राक्षसु रामभेटि
ीत आले तोष अत्यंत पोटीं ।
ष्पकारुढ जाले
न तें तीव्र चालें ॥ २३४ ॥

वी
भावि ।
मा
ामा ॥ २३५ ॥

तदुपरि भरतातें भेटला रुद्र वेगें
सकळिक भृत केलें सांग त्यासि प्रसंगें ।
न भरत थिर पोटीं रामभेटी निघाला
फणिवर निजबंधु पटणा पाठवीला ॥ २३६ ॥

बेरीकडे राघव पुष्पकीं हो
बैसे मुनि सेउनि उर्धबाहो ।
ते चालिलें गर्जत व्योमपंथें
दावी पुढें मारुत भ्रातयातें ॥ २३७ ॥

उपरि भरतरामा जाहली सौख्यभेटी
परम हरुष रुक्षां वानरांलागि पोटी ।
सकळिक वृषगांवीं येउनि स्थीर जालें
रघुपति निजआज्ञे स्वस्थळा यान चालें ॥

तव फणि निजबंधु पटणामाजि गेला
जननिगुरुदळसी नंदिग्रामासि आला ।
सकळिक जिवमात्रा जाहली रामभेटी
तदुपरि चिरगेहें निर्मिली लक्षकोटी ॥ २३९ ॥

साचिव कुशळ आले घेउनि नापिकातें
रघुपति करि सश्मृकर्म बंधुसमेतें ।
मघमघ अतितैले मोकळे केस केले
असुरनरकपीसीं सांग अभ्यंग झाले ॥ २४० ॥

सुगंधें टिळे रेखिले रत्नकीळा
वपु भूषणीं फांकति वेळवेळा ।

सुखें जेविले पाक निर्मुनि नाना
रवीयान गेले पुढे अस्तमाना ॥ २४१ ॥

बहु लागल्या दिव्य त्या चंद्रजोती
सुशुप्तिभरें लोटली सर्व रात्रि ।
पुरी भव्य शृंघारुनि दुत आले
तयानंतरें भार वेगे निघालें ॥ २४२ ॥

मिरवत निजपौरा चालिल दिव्यरूपी
वधुजन कुरवंडि सारिती रत्नदिपीं ।
सकळीक मग वेगें मंडपालागि आले
रुषिगुरु अभिषेका सर्वहि सिध जाले ॥ २४३ ॥

श्रीरामसीतामय रत्नपीठीं
तें बैसउनि गुरु पुण्यकोटि ।
पट्टाभिषेक करि वाद्येमेळा
वाजे जना कल्पत हेमवेळा ॥ २४४ ॥

जयजयजय घोषें गर्जते सर्व जाले
मणग दिन भिकारि कांचनें तृप्त केले ।
धडधडधड नेटें सोडिती यंत्रगोळे
रसमस जिवमंत्रि पुर्ण आनंद खेळे ॥ २४५ ॥

तयानंतरे भोजने रम्य जालीं
निसी प्राप्त होतांचि विश्रांति केली ।
दिनी दुसरे राक्षसा वांनराला
रुचि भोजनें अर्पिता राम जाला ॥ २४६ ॥

कपि दैत्य संन्मानुनि बोळवीले
रघुनाथसेवे हनुमंत ठेलें ।
पुढें न्यायनीती करी रामराजा
सरि साम्यतां देउ मि कोण पुज्या ॥ २४७ ॥

गदया फुलां बंधन नित्य पाहा
मारातळिं जर्जर शत्रु साहा ।
छत्रादिकां दंड नसे विसावा
सत्वासि त्या रक्षण पायगोवा ॥ २४८ ॥

विधीगोळ त्यागुनि बाहेरि कीर्ति
सदा घालणें स्त्रीनरा प्रीति पुर्ति ।
असंभाव्य त्या सुकृताचा सुकाळु
धनें पातकाचा नव्हे प्राप्त तीळु ॥ २४९ ॥

महोछाह उछाह नाना परीचे
घडीने घडी वोघ सौख्यामृताचे ।
बहु वाहती स्वर्ग मानुनि खोटा
कृतायुग त्याहुनिहि धर्म मोटा ॥ २५० ॥

सदासर्वदा लोक संतुष्ट चित्तीं
नसे वैर निर्वैर धार्मिक वृत्ती ।
कदा नेणती दुखदारीद्रवार्ता
मनी राहिला न्यायसारांष पुर्ता ॥ २५१ ॥

अखंडीत तें पीकती सर्व धान्ये
जिवा साधली वस्ती तेथील पुण्यें ।

सुखें क्रीडती श्वापदें आणी पक्षी
  फळे अंमृतासारिखीं दाट वृक्षीं ॥ २५२ ॥

खळाळा नद्या वाहति पुर्ण तोईं
  बटाकें डोहो तुंबति ठाईंठाईं ।
कुपा कालव्या पाहता मीति नाहिं
  बहु अर्पिति क्षीर लोकासि गाईं ॥ २५३ ॥

जनि ईछिल्यासारिखी मेघवृष्टी
  घडे काळ संव्हारिता सर्वसृष्टी ।
अयोध्यापुरिवासिया हात जोडि
  बळें बोलता पाव बाहेरि काढि ॥ २५४ ॥

दशशतदशकांचि वछरें बीस असि
  दशमित रघुनाथें राज्य केलें भुमीसी ।
बहुविध बहुयज्ञे धर्म वृधीसि नेला
  तदुपरि परिवारें ब्रम्हलोकासि गेला ॥ २५५ ॥

असी हे कथा अैकता दोष जाति
  मनि ईछिल्या कामना पुर्ण होति ।
म्हणोनि सदासर्वदा पाठ कीजे
  फळा मागुति आयका स्वस्त वोजें ॥ २५६ ॥

आयुष्यवृधी धनधान्यवृधी
  संतान्वृधी यषकीर्तिवृधी ।
आरोग्यवृधी बहुपुण्यवृधी
  सेखी नरु शाश्वत मुक्ति साधी ॥ २५७ ॥

Triplicane P.O., Madras

गौरीमयोरानिकटींच पाहो
  त्रिवंदुरिं माधववास्ति ते हो ।
कावेरजाउत्तरभागकांठी
  श्रीरामगेंहिं दिन नित्य लोटि ॥ २५८ ॥

आक्राभागें सर्वसासष्टी अक्रा
  संख्या ग्रंथीं नेमीलि पद्मचक्रा ।
पाठें याच्या थोर संतोष शक्रा
  दुष्टा नष्टा नावडे बुधिचक्रा ॥ २५९ ॥

ईति श्रीयुध्यकांडरामायेणे संपुर्णमस्तु ॥

श्रीरामार्पणमस्तु ॥

Govt. Oriental Mss. Library
Triplicane P.O., Madras

APPENDIX-1

टिपणें—Notes.

बालकांड

१६ ग्रह शिवानन उंच संख्या—पांच ग्रह उच्चस्थानीं होते (शिवानन = पांच)

२७ सीत-प्रत्यंचा, दोरी.

सैलथाटें-पर्वतसमूह.

२९ पालाणवी-बोलाविलें.

३० लेखा-गणती, मोजणी.

३३ निरज-धूळविरहित ; निरज करुनि-सांचलेली धूळ झटकून.

३९ पालसत्रें-पालांचा समुदाय (पाल-तंबू) सूर्यपत्रें-अबदागीर.

४१ टकमक जन तेणें तोषती आणि भीति-(नळे, हवाया, चिंचुद्र्या वगैरे पाहून) लोकांना एकीकडे आनंद होत होता व दुसरीकडे भीति वाटत होती.

४२ अडांत-ओरडत.

४४ धात्रीफळ-आंवळा.

४५ रसमस-गडबड.

५८ तळगवळण-तळलेले व इतर पदार्थ. घाऱ्या-घारगे.

६४ रथसप्ततीनी-सत्तर रथांतून.

६७ इति हारिनिजकांता-इति श्री. (हारिनिजकांता-लक्ष्मी-श्री)

अयोध्याकांड.

५ येकमुष्टी-एकदम.

१२ पैसे-पसरे.

२६ राघवाच्याण-राघवाची आण.

३३ सिवणा-निद्रिस्त.

उतडी-उतटी-फुगून फाटला, फुटला.

७२ झोरीं-झांक, आच्छाद, चोपड, माख.
७५ चीरजाळें-वल्कलें.
१२० दंडापरी-दंडकाप्रमाणें, शिरस्त्याप्रमाणें.
१५० दशरथपुरनामें-अयोध्या नांवाचें (कांड).

अरण्यकांड

२ मालभोई-माळभुई, माळजमीन.
७ विरी—वीर्य, शक्ति.
मेढे—खुंट, धनुष्य.
१८ तिंदुक—टेंभुरणी.
तित्रिण-तिंत्रिणी-चिंच.
किंशुक-पळस.
३६ पारश्वघातें-परशुघातें.
६० आद्या-ज्वाला, भग.
६४ साई-गोसावी, साधु.
७१ लुंची-ओरबाडी
खस्त-लढाईत घायाळ झालेला.
७४ पंचलेख-पंचवृक्ष, वृक्षविशेष.

किष्किंधाकांड

३४ इसाळ-ईर्ष्या.
९४ ज्या पौरीं सुग्रीवासि वस्ती, त्याचें
(किष्किंधा) नांव या कांडास आहे.

सुंदरकांड

७ चित्रमाळि-चित्रविचित्र माळ.
उमाळी-गर्दी, समुदाय.
८ जेगटें-जेंगटें-वाद्यविशेष.

१२ बिलाळापरी-बिडालाप्रमाणें, मांजराप्रमाणें
१३ झोंट-केंस, केंसांची बट.
४३ छत्रसाई-छत्राची सावली.
४६ सळे--सळ--अणकुचीदार तुकडा.
६६ शंखतीर्थें-बोंबा; शंखतीर्थें सेविती—बोंबा
मारतात
७३ असे चांगलें नाम याचें स्वभावें याचें
नांव सुंदरकांड.

युद्धकांड

३५ भीस-केंसाळ.
भिंगूळ--भयंकर.
४७ उसिणे-उसने-उट्टें काढण्याच्या दृष्टीनें
दिलेले, बदला.
६२ पौळी--तट, भिंत.
६८ होतसे प्रीत झोंटीं--शेंड्या, झुलपें
ओढणें यांतच (वीर) रमूं लागले.
७२ तपनगज--राक्षसविशेष.
८८ रणसौरा-रणशूर.
९६ चाचरी गेला--झोकांड्या खात गेला.
२४८ "नसे विसावा सत्त्वासि त्या रक्षण पाय-
गोवा" असें एक वाक्य घ्यावें लागतें.
(पायगोवा--संकट, गुंतागुंत.)
२४७ एकूण श्लोकांची संख्या (६६×११=७२६
अशी खुबीनें सांगितली आहे.

GOVERNMENT ORIENTAL MSS LIBRARY
17 JUL 1951
TRIPLICANE P.O., MADRAS

APPENDIX-2

शंकास्थळें

बालकांड

३ युद्धासाठीं पौरजन (रिक्रूट) मिळत नसत "नातुडे पौर युध्या" म्हणून अयोध्या नांव पडलें काय ?

५ नवल ऋषिश्रृंगासरिसिलें ?

७ देवरंगा ?

३५ सप्तवदना ?

६६ भर्तालागि धरी निघे झडकरी शत्रुघ्नही केसरी ?

अयोध्याकांड

१३ विगळिग--विगलित ?

२४ पुष्पशाळेसि--कोपशाळेसि ?

३७ समय रसिक जातो ?

१०४ ३ व ४ चरणांचा अर्थ स्पष्ट नाहीं.

अरण्यकांड

१७ पंचवटींत पोफळींचे वृक्ष कसे आले ?

२४ रघुपति निजजाया होय तुं निविच्यारी ?

७४ वनचर बळियाडे बैसले पंचलेखा ?

सुंदरकांड

४९ दळेंसीवाना ?

युद्धकांड

१०७ दुसऱ्या ओळीचा अर्थ ?

१७३ पिटी वक्रमें घोर ?

॥ श्रीः ॥

श्लोकबद्धरामायण.

शुद्धिपत्र

प्रस्तावना

पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध
८	७	त्यावसून	त्यावरून
९	१२	ओधांत	ओघांत
९	२१	२१	४१
११	१९	जुन्था	जुन्या
१२	१२	यांनीं हि	यांनींहि

बालकाण्ड

श्लोक	पाद	अशुद्ध	शुद्ध
४	४	(की ?) जे	किजे (कीजे)
८	१	अैकानि	अैकोनि
१२	२	पहां	पहा
१४	१	परिसुनि	परिस्नुनि
,,	३	उभय	उभया
१६	४	तेव्हाच	तेव्हांचि
१९	४	नृपाअंतरी	नृपा अंतरी
२०	१	प्रसगे	प्रसंगे
२२	१	सिधिसी	सिद्धिसी
,,	३	यांते	त्यांते
२४	३	पदी	पथी
३०	३	वहुछत्रें	बहुछत्रें

श्लोक	पाद	अशुद्ध	शुद्ध
३१	१	बहुसाल	बहुसाल
,,	३	कुरंगे	बुरंगे
३६	१	करनिया	करुनियां
४३	२	तेहि	तेहिं
५२	२	वोधें	बोधें
,,	३	लया	तया
५४	१	त्यासी	त्यांसी

अयोध्याकाण्ड

२	३	लाके	लोक
४	१	एसे	ऐसे
१०	३	सगुणा	सुगुणा
१४	२	हाई	होई
१७	२	वंदुनिया	वंदुनि राया
,,	३	ज्ञातिदासी	ज्ञाति दासी
२०	३	हेतें	हे तें
२९	३	लाजे	लागे
३१	४	स्वास्त	स्वस्त
३३	४	अतिचिंतेत उतडी	अतिचिंते तडतडी
३६	३	जागता	जागतां
३७	१	राधवालागी	राघवालागी
४१	२	सर्व	सर्वें
४२	४	मानसी	मनासी
४३	२	सार्वभोमा	सार्वभौमा
५०	३	जथे	जेथें
६६	१	सर्वथा हीं	सर्वथाहीं
,,	४	पडे	पडो
७०	३	चाचण	चांचण

Triplicane P.O.

श्लोक	पाद	अशुद्ध	शुद्ध
७७	३	कोठूनि	कोठुनि
८९	१	तपस्वीरुषी	तपस्वीरुपी
१०७	४	रुषी	रुषीचा
११३	३	तेव्हा	तेव्हां
११४	१	ढेळे	ढळे
१३१	१	पटे	पुढें
१३३	१	भरद्वाजाचिय	भरद्वाजाचिया
१३७	४	पणपटह	पणव पटह
१४१	२	छेदितो	छेदितों

अरण्यकाण्ड

१	२	कवियांते	कवित्यांते
२	३	मालभोई	माळभोई
,,	४	जाहळी	जाहली
१४	३	बोजे	वोजे
१७	४	तो	ते
२५	२	निविच्यारी	निर्विच्यारी
३१	२	वहत	वदत
३५	१	बाधला	बांधला
७२	२	दैन्यराणां	दैत्यराणा
,,	३	श्रमित	भ्रमित
८२	२	कालें	काळें

किष्किन्धा काण्ड

१	१	वंदुनिया	वंदुनियां
४	२	खडच्यापी	खड्ग च्यापी

श्लोक	पाद	अशुद्ध	शुद्ध
६	२	जाणोनिया	जाणोनियां
१३	२	आतां चि	आतांचि
२७	३	नाही	नाहीं
२९	४	बोलताहे	बोलताहे
३३	२	युध्यर्थ	युध्यार्थ
३७	१	याचा	त्याचा
३८	४	गाव	गांव
४४	३	राघवांसी	राघवासी
५५	४	भग्नं	भग्न
६८	२	सिंह्यासनी	सिंहासनी
८०	३	तळे	तळें
८२	४	पाववाले	पाववीले
९०	१	पुटे	पुढें

सुन्दर काण्ड

श्लोक	पाद	अशुद्ध	शुद्ध
१३	२	लंबवोंटे	लंबवोंठे
१७	३	दिवट्यांचे	दिवट्यांचे
२०	२	झेप	झेंप
२८	३	सांगता	सांगतां
२९	१	अर्पीली	अर्पिली
६०	२	तैलें चि	तैलेंचि
६२	२	झोबति	झोंबति
७२	१	होवानि	वाहोनि

युद्धकाण्ड

श्लोक	पाद	अशुद्ध	शुद्ध
७	२	येंईल	येईल
२६	३	तेणेंचि	तेणेंचि

श्लोक	पाद	अशुद्ध	शुद्ध
३५	२	भिंगुळ हिं	भिंगुळहि
४९	१	तळप्रहारें	तळप्रहारेंचि
„	३	बळें	बळें
५१	४	भागें	मागें
६२	३	दुंगपौळी	दुर्गपौळी
६३	१	पडिल्या	पाडिल्या
७९	१	बानरा	वानरा
९५	३	दात	दांत
१२५	३	येणेपरि	येणेरिती (परि)
१२७	४	नसें	नसे
१४७	१	रायासि जाणविलें	रायासि हे जाणविलें
१५०	२	माग	याग
१५३	१	सीघ्र	शीघ्र
१६२	३	मारितो	मारितों
१६९	४	क्रतांतु	कृतांतु
१७४	१	जिंकवे ना	जिंकवेना
„	२	आकळे ना	आकळेना
१९९	१	सैंन्ये	सैन्य
११२	२	श्रृष्टी	सृष्टी
२२६	३	नैरुत्यराजा	नैरुत्यभाजा
२२८	३	रामअज्ञें	राम आज्ञें
२३२	४	घड ना	घडना
२३४	३	वगें	वेगें
२४२	४	रात्रि	राति
२५६	१	अैकता	अैकतां
२५९	२	पद्मचक्रा	पद्मचक्रा